महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

# कृषि पणन योजना



कृषि पणन क्रांती, शेतकऱ्यांची प्रगती...!



# कृषि पणन योजना


## महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

प्लॉट नं. आर-७, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.
दूरध्वनी - (०२०) २४५२८१००, २४५२८२००
Web. : www.msamb.com

पणन टोल फ्री क्रमांक : 1800 233 0244

प्रकाशक :

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे**

प्लॉट नं. आर-७, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे ४११ ०३७.

किंमत : १५० रूपये



• केवळ खाजगी वितरणासाठी

• Copyright © 2014 All rights are reserved.



सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# शुभसंदेश

राज्यातील शेतकरी पावसाच्या अनियमितते बरोबरच लहरी हवामानामुळे सातत्याने अनिश्चिततेस सामोरा जात आहे. नैसर्गिक आपत्ती जसे आग, वीज कोसळणे, गारपीट, चक्रीवादळ, दुष्काळ, पूर, कीड व रोग इत्यादींमुळे शेतकऱ्यांचे वारंवार होणारे नुकसान टाळण्यासाठी राज्यात खरिपासाठी १६ पिकांकरिता 'राष्ट्रीय पीक विमा योजना' लागू केली आहे. त्यामध्ये भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, तूर, मूग, उडीद, कारळे, भुईमूग, तीळ, सोयाबीन, सुर्यफूल, कापूस, कांदा आणि ऊस या पिकांचा समावेश आहे. तसेच हवामान आधारित पीक विमा योजनेमध्ये १२ जिल्ह्यांचा समावेश केला आहे. कमी व्याजदरातील कर्ज पुरवठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यास सरकार यशस्वी झाले आहे. हवामान बदलांना सक्षमरित्या सामोरे जाण्यासाठी शासनाचे सर्व विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहे. यासाठी कृषिसल्ला व सेवा बळकट करण्यावर भर देण्यात येत आहे. एसएमएस व टोल फ्री क्रमांकाचा वापर करून शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात येत आहे. कृषि प्रक्रियेद्वारे शेतमालाचे मूल्यवर्धन करण्यासोबत निर्यातीस चालना देण्यासाठी मुंबईतील वाशी व गोरेगावसह राज्याच्या विविध भागात आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतमालाला अधिकचा बाजारभाव मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. जलयुक्त शिवार योजने सोबतच ठिबक सिंचन, हरितगृह, शेडनेट राबविण्यास मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. कठिण परिस्थितीत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे आहे.

'कृषि पणन योजना' या पुस्तिकेच्या प्रकाशनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांपर्यंत पणन विषयक योजना पोहोचण्यास अधिक गती मिळणार आहे. त्यातून अनेक प्रकल्प नजिकच्या भविष्यात राज्यात उभे राहण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या या अभिनव उपक्रमास माझ्या हार्दिक शुभेच्छा...!

**देवेंद्र फडणवीस,**

**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**



सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# शुभसंदेश

राज्यातील शेतकरी वर्ग यंदा कमी पाऊस झाल्यामुळे चिंताग्रस्त आहे. या काळात शासनाचा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासनाच्या इतर विभागांच्यासह शेतकऱ्यांच्या पाठिशी ठामपणे उभा आहे. राज्यातील ऊस, धान, सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. पिकांना योग्यवेळी वित्त पुरवठा व्हावा यासाठी शासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या आंबा व काजू मंडळाच्या कार्याला गती देण्याचे काम करण्यात आले आहे. यामुळे कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्याच्या मालाला योग्य बाजार भाव मिळण्यास मदत होणार आहे. यासोबतच राज्यातील गुळ उत्पादनाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नरत आहे.

राज्यातील कृषि पणन क्षेत्राचा कणा असणाऱ्या बाजार समित्यांमध्ये शेतकरी केंद्रबिंदू आहे. हे लक्षात घेऊन पायाभूत सुविधा यात ईको-फ्रेंडली टॉयलेट, शेतकरी निवास, आर.ओ ड्रिंकिंग वॉटर (शुद्धपाणी) उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय शेतकऱ्याच्या शेतमालाचे मूल्यवर्धन व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या सहाय्याने राज्यात ४३ आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र कार्यरत असून या केंद्रामार्फत राज्यातील मोठ्या प्रमाणात भाजीपाला व फळे निर्यात करण्यात येत आहेत.

राज्याच्या कृषि, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातंर्गत शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या विविध योजना / कार्यक्रम क्षेत्रिय कार्यालयांमार्फत राबविले जातात. कृषि विद्यापीठे तसेच इतर शासकीय व निमशासकीय महामंडळे आणि अशासकीय संस्था या सर्वांमार्फत या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविला जातो. कृषि विषयक कामकाजातील आवश्यक असलेल्या एकाच घटकासाठी विविध योजनांमधून लाभ देण्यात येतो. परंतु याबाबत बहुतेक शेतकरी अनभिज्ञ असतात. शेतकऱ्यांना विशिष्ट घटकासाठी कोणकोणत्या योजनांमधून अर्थसहाय्य मिळू शकते, त्यासाठी अनुदान मर्यादा काय आहेत, यासाठी संपर्क कोठे करावा. तसेच अधिक सुस्पष्ट आणि सुलभरित्या माहिती मिळावी, याकरिता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात येणारी 'कृषि पणन योजना' ही पुस्तिका शेतकरी बांधवांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास आहे.

पणन मंडळाच्या या नवीन उपक्रमास माझ्या हार्दिक शुभेच्छा...!

C.B.Patil

**चंद्रकांत (दादा) पाटील**

मंत्री, सहकार, पणन, आणि वस्त्रोद्योग,
सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून),
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.



सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# शुभसंदेश

महाराष्ट्र हे देशातील फळे व भाजीपाल्याच्या उत्पादनासाठी महत्त्वाचे राज्य आहे. संपूर्ण देशात द्राक्ष, डाळिंब, हापूस आंबा, काजू, केळी, पपई, संत्रा इत्यादी फळांच्या उत्पादनात तसेच कांद्याच्या उत्पादनात राज्य अग्रेसर आहे. कृषि मालाच्या निर्यातीमध्येही महाराष्ट्र राज्य अग्रेसर असून द्राक्ष, डाळिंब व कांद्याच्या निर्यातीत राज्याचा प्रमुख वाटा आहे. हवामान आणि पाऊस या बाबतच्या प्रतिकूल परिस्थितीत तसेच सिंचनाखाली असलेले मर्यादित क्षेत्र लक्षात घेता राज्यातील शेतकऱ्यांनी मिळवलेले यश स्पृहनिय आहे.

राज्यातील शेतकरी हा केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांच्या तसेच विविध नवनवीन उपक्रमांच्या अंमलबजावणीत अग्रेसर असून यामध्ये सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहचवण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ राज्यामध्ये निर्यातीला चालना देण्यासाठी प्रयत्नशील असून देशांतर्गत कृषि व्यापार विकासाला चालना, सुगीपश्चात होणार नुकसान टाळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. कृषि आणि पणन संबंधीत योजनांची एकत्रित माहिती या प्रयत्नाचा एक भाग म्हणून कृषि पणन योजना हे पुस्तक प्रकाशित करीत आहोत. शेतकऱ्यांसाठीच्या या स्तुत्य उपक्रमास हार्दिक शुभेच्छा...!

**राम शिंदे**

राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), पणन,
सार्वजनिक आरोग्य, पर्यटन, कृषी आणि फलोत्पादन
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | पणन संचालनालय | ०९ - १५ |
| २. | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ | १६ - ३६ |
| ३. | राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था | ३७ - ४० |
| ४. | पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय | ४१ - ४४ |
| ५. | महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प | ४५ - ५२ |
| ६. | आशिया विकास बँक (ADB) प्रकल्प | ५३ - ५६ |
| ७. | समन्वयीत कृषि विकास योजना | ५७ - ६३ |
| ८. | महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ | ६५ - ६७ |
| ९. | महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित | ६८ - ६८ |
| १०. | महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ | ६९ - ७२ |
| ११. | विपणन व निरीक्षण संचालनालय | ७३ - ७६ |
| १२. | महाराष्ट्र राज्य छोट्या शेतक-यांच्या कृषि व्यापार संघ (SFAC) | ७७ - ८० |
| १३. | राष्ट्रीय शितसाखळी विकास केंद्र (एन.सी.सी.डी.) | ८१ - ८४ |
| १४. | विदेश व्यापार संचालनालय, भारत सरकार | ८५ - ८७ |
| १५. | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान | ८९ - ९२ |
| १६. | अपेडा | ९३ -१०१ |
| १७. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान | १०३ - ११८ |

# पणन संचालनालय



- थेट पणन
- खाजगी बाजार
- शेतकरी ग्राहक बाजार
- एक परवाना पध्दत
- स्पेशल कमॉडिटी मार्केट (विशेष वस्तू बाजार)
- कराराची शेती/कंत्राटी शेती
- कृषी प्रक्रीया सहकारी संस्थांकरीता शासन अर्थसहाय्य योजना
- किमान आधारभूत किंमत खरेदी योजना
- फळे व भाजीपाला सहकारी संस्थाना आर्थिक सहाय्य योजना

# पणन संचालनालय

### महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम १९६३ मधील तरतुदी :

जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेस तोंड देण्यासाठी तसेच प्रचलित पणन व्यवस्थेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी केंद्राने मॉडेल ॲक्ट २००३ साली तयार केला होता. मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी राज्यांनी स्विकारून बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी नविन पर्याय निर्माण करणे, एकाधिकाराच्या ऐवजी पणन व्यवस्थेत अनेक पर्याय निर्माण करणे हे मुख्य उद्दिष्ट यामध्ये होते. महाराष्ट्रामध्ये राज्यातील पणन व्यवस्थेस अनुरूप व स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम १९६३ मध्ये २००६ साली काही बदल करण्यात आलेले आहेत. अस्तित्वात असलेल्या बाजार समित्या व सर्व बाजार घटकांच्या हिताला कोणतीही हानी पोहोचणार नाही, या दृष्टीनेच कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम १९६३ मध्ये समाविष्ट केलेल्या तरतुदी;

### थेट पणन :

सदर तरतुदीखाली कृषि माल बाजार समिती आवारामध्ये न जाता, शेतक-यांचा माल त्यांच्या शेतावरून थेट खरेदी करता येतो. यामध्ये शेतमालाची कमी हाताळणी होत असल्याकारणास्तव प्रक्रियादार व निर्यातदारांना अधिक चांगल्या दर्जाचा माल विकत घेता येतो. तसेच मध्यस्थ व वाहतुकीसाठी लागणारा खर्च न द्यावा लागल्याने शेतक-यांच्या मालाला रास्त भाव मिळतो.

### लायसनसाठी पणन संचालकांकडे सादर करावयाचे आवश्यक दस्तऐवज :

१. विहीत नमुन्यातील अर्ज, २.अर्जदाराची संपूर्ण माहिती (नोंदणी, नावे व पत्ते), ३.बँक गॅरंटी, ४.सॉल्वंसी सर्टिफिकेट, ५.डिक्लरेशन.

लायसन्स फी - एका विभागासाठी रू.१५,०००/- व संपूर्ण राज्यासाठी रू.५०,०००/-

बँक गॅरंटी - एका विभागासाठी रू.१० लाख व संपूर्ण राज्यासाठी किंवा एकापेक्षा अधिक विभागांसाठी रू.१५ लाख.

- शासकीय संघटना व स्थानिक प्राधिकरणे यांना सूट,
- थेट पणनाच्या लायसनसाठी अर्ज सादर करताना अर्जदारास तो खरेदी केंद्रे कोणकोणत्या ठिकाणी सुरू करणार, कोणता कृषि माल खरेदी करणार आणि त्या मालासाठी कोणकोणत्या अनुषंगीक सुविधा उभारणार याचा तपशील सादर करावा लागेल. अनुषंगीक सुविधांमध्ये शेड, गोदाम, शितगृह, वजन काटे, प्रतवारी यंत्रणा, पॅक हाऊस, प्रक्रिया सुविधा, रायपनिंग चेंबर, धान्य चाळण व स्वच्छता यंत्र, प्रोजेक्शन टि.व्ही. इ.चा समावेश राहील.
- खरेदी केंद्रांची तपासणी करण्याचा अधिकार संचालक अथवा त्यांचा प्रतिनिधी यांना असेल. थेट पणन लायसनधारकास संचालक अथवा त्यांचा प्रतिनिधी मागणी करेल त्यानुसार खरेदी केंद्र आणि थेट पणन लायसन अंतर्गत केलेल्या व्यवसाय संबंधिची कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी लागतील.

### खाजगी बाजार :

सदर तरतुदीखाली कुणालाही कृषिमाल खरेदी विक्रीसाठी खालिल नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून खाजगी बाजार उभारता येतो. शेतक-याला आपला माल विकण्यासाठी  हा एक नवीन पर्याय उपलब्ध करून दिलेला आहे.

- जमिन - महानगरपालिका असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी किमान १० एकर जमिनीवर अन्य ठिकाणी किमान ५ एकर जमिनीवर बाजाराची स्थापना.
- गुंतवणूक - महानगरपालिका असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी जमिनीच्या किंमतीसह किमान रू.५.०० कोटी, इतर जिल्ह्याच्या ठिकाणी जमिनीच्या किंमतीसह किमान रू. २.०० कोटी, इतर ठिकाणी जमिनीच्या किंमतीसह किमान रू.१.०० कोटी.
- सुविधा - लिलावगृह, शेड, गोदाम, शितगृह, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, अंतर्गत रस्ते, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृहे.
- लायसन्स फी - महानगरपालिका असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी रू.५०,०००/- व इतर ठिकाणी रू.२५,०००/-

- बँक गॅरंटी - महानगरपालिका असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी रू.२० लाख, इतर ठिकाणी रू.५.०० लाख.
- शासकीय संघटना व स्थानिक प्राधिकरणे यांना सूट
- अर्जाची तसेच पायाभूत सुविधांची तपासणी केल्यानंतर अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत लायसन देण्यात येईल.
- वायदा बाजार आयोग अंतर्गत नोंदणी केलेल्या वस्तू विनिमय केंद्रास खाजगी बाजाराचे लायन घेता येईल. विहीत केलेल्या बाजार फीच्या ७५ टक्के रक्कम संबंधित बाजार समितीस अदा करावी लागेल व २५ टक्के रक्कम सुविधांचा विकास आणि देखभालीसाठी वापरता येईल.
- थेट पणन लायसनधारकास खाजगी बाजार स्थापन करण्यासाठी लायसन घेता येणार नाही.

**सादर करावयाची कागदपत्रे :**

१) विहीत नमुन्यातील अर्ज.

२) कंपनी, सहकारी संस्था, न्यास, महामंडळ, भागिदार इ. बाबतचे विधी संस्थापन किंवा नोंदणी प्रमाणपत्र.

३) व्यवहार व कामकाजाविषयक मार्गदर्शक तत्वे.

४) सर्व संचालक व मालक, भागिदार इ.ची नावे पत्ता, दूरध्वनी क्रमांक.

५) जमिनीची किंमत धरून खर्चाच्या विभागणींसह पायाभूत सुविधांचा तपशील.

६) खाजगी बाजार आणि शेजारच्या बाजार समितीचे मुख्य किंवा उपबाजार यांच्यामधील सरळ रेषीय अंतराबाबतचे सनदी अभियंता किंवा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे प्रमाणपत्र.

७) स्थळाचा नकाशा, ७/१२ चा उतारा, क्षेत्र, हक्क याबाबतचे जमिनीशी संबंधित दस्तऐवज.

८) बँक हमी, वचनपत्र, शपथपत्र.

**शेतकरी ग्राहक बाजार :**

सदर तरतुदीखाली कुणालाही कृषिमाल खरेदी विक्रीसाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून शेतकरी ग्राहक बाजार उभारता येतो. त्यासाठी पणन संचालकांकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

- मुंबई बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतकरी-ग्राहक बाजारास लायसन नाही.
- जमिन - किमान १ एकर
- गुंतवणूक - किमान रू.१०.०० लाख
- सुविधा - ओटे, शेड, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, अंतर्गत रस्ते इ.
- लायसन फी - रू.१०,०००/-
- बँक हमी - रू.१ लाख
- शासकीय संघटना आणि स्थानिक प्राधिकरणे यांना बँक हमीतून सूट
- संचालक अर्ज आणि निर्माण केलेल्या सुविधांची तपासणी करून ३० दिवसांच्या कालावधीत लायसन देणेबाबतचा निर्णय घेतील,
- शेतमालाची विक्री - एका ग्राहकाला जास्तीत जास्त १० किलो फळे व भाजीपाला आणि जास्तीत जास्त ५० किलो अन्नधान्याच्या विक्रीची परवानगी,
- शेतकरी ग्राहक बाजार लायसनधारकास थेट पणनाचे लायसन देण्यात येणार नाही.

**एक परवाना पध्दत :**

सदर अनुज्ञाप्ती बाजार समितीमधील व्यापा-यांस एक किंवा एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रात कृषि मालाच्या व्यापारासाठी तसेच एक जिल्हा किंवा पूर्ण राज्यामध्ये व्यवहार करण्यासाठी दिली जाते.

- एकापेक्षा अधिक बाजार क्षेत्रात व्यापार करण्याची इच्छा असलेला व्यापारी प्रत्येक बाजार क्षेत्राकरिता रू.५०० ची लायसन फी यासह अर्ज संचालकांकडे सादर करेल.
- लायसनधारक बाजारक्षेत्रात कामधंदा सुरू करण्याच्या दिनांकाची माहिती संबंधित बाजार समितीला कळवेल.
- लायसनधारक संबंधित बाजार क्षेत्रामध्ये खरेदी केलेल्या कृषि उत्पन्नावरील बाजार फी व पर्यवेक्षण खर्च संबंधित बाजार समितीकडे भरेल.
- लायसन मिळविण्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे :

१) विहीत नमुन्यातील अर्ज

२) पतदारी प्रमाणपत्र

३) बँक हमी

४) प्रतिज्ञापत्र

## स्पेशल कमॉडिटी मार्केट (विशेष वस्तू बाजार) :

कांदा, बटाटा, संत्रा, केळी, गुळ, हळद इत्यादींसाठी शासन विशेष वस्तू बाजार घोषित करू शकेल. विशेष वस्तू बाजारामध्ये त्या विशिष्ट शेतमालाची खरेदी-विक्री, साठवणूक यासाठी अद्ययावत सुविधांची उभारणी होण्यास मदत होईल. विशेष बाजाराच्या दर्जामुळे राज्य शासन/केंद्र शासन/जागतिक स्तरावरील वित्तीय संस्थांच्या अर्थसहाय्य व अनुदान योजनांचा लाभ मिळून इन्फ्रास्ट्रक्चर निर्मितीस चालना मिळेल.

थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार, एक परवाना पध्दत व स्पेशल कमॉडिटी मार्केट (विशेष वस्तू बाजार) यांच्या परवाना व माहितीसाठी पणन संचलनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ कार्यालयाशी संपर्क साधावा.

## कराराची शेती/कंत्राटी शेती :

या कायद्याअंतर्गत शेतकरी खरेदीदाराला/कंपनीला लागणाऱ्या प्रतीचा माल ठरलेल्या दरानुसार उत्पादित करुन देईल. यामुळे निर्यातदारांना त्यांना लागणाऱ्या प्रतीचा माल उपलब्ध होईल, प्रक्रियादारांना त्यांना लागणाऱ्या प्रतिचा/ जातीचा माल त्यांना लागणाऱ्या वेळेत उपलब्ध होण्यास मदत होईल. करार शेतीमध्ये शेतीतुन माल थेट खरेदीदारापर्यंत जाणार असल्याने मालाची हाताळणी कमी होऊन सुगीपश्चात नुकसान घटण्यास मोठी मदत होईल. यामध्ये उत्पादित शेतीमाल बाजार समितीत नेण्याची आवश्यकता नसल्यामुळे बाजार खर्च मोठया प्रमाणात कमी होतील. त्यामुळे शेतमाल विक्री खर्चात मोठया प्रमाणात घट होईल व शेतकऱ्याला आपला माल विकण्यासाठी फक्त बाजार समितीवर अवलंबून न रहाता इतर सक्षम पर्याय उपलब्ध राहतील, इ. फायदे कराराच्या शेतीमध्ये शेतकऱ्याला मिळू शकतात.

सदर तरतुदीखाली शेतकरी एखाद्या प्रायोजकाला ठरावीक प्रतीचा माल आधी ठरलेल्या किंमतीमध्ये विकू शकतो व त्यासाठी खालिलप्रमाणे अटी व शर्ती आहेत ;

१. कंत्राटी शेती नोंदणी - जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे कोषागारात चलनाद्वारे भरलेल्या रू.५००/- फीसह विहीत केलेल्या कागदपत्रांसहीत अर्ज सादर करणे.

२. अर्ज स्विकारण्यात आल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीत अर्जावर निर्णय.

३. कंत्राटी शेती उत्पादक व कंत्राटी शेती पुरस्कर्ता यांना कंत्राटी शेती विषयक कराराच्या अटी व शर्ती निश्चित करण्याची मुभा.

४. कंत्राटी शेती करण्यासाठी केलेल्या करारातून वाद उद्भवल्यास तो मिटविण्यासाठी रू.२०/- च्या कोर्ट फी स्टॅम्पसह जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे.

५. संबंधित पक्षांना म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर ३० दिवसांच्या कालावधीत त्यावर निर्णय.

६. मा. कृषि आयुक्त, यांचेकडे अपिलाची तरतूद व अपिल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत निर्णय.

७. मा. कृषि आयुक्त, यांनी दिलेला निर्णय अंतिम

८. कंत्राटी शेती पुरस्कर्ता शासनाने अधिसुचित केलेल्या दराने शासनास देखरेख खर्च प्रदान करेल.

९. कंत्राटी शेती कराराखाली खरेदी केलेले कृषि उत्पन्न पुरस्कर्त्यास कोणत्याही ठिकाणी विकण्याची मुभा,

१०. कंत्राटी शेती पुरस्कर्त्यास कंत्राटी शेती उत्पादकाच्या जमिनीवर कोणत्याही प्रकारच्या कायमस्वरूपी पायाभूत सुविधा उभारता येणार नाहीत किंवा त्या जागेच्या भाडेपट्ट्याचा किंवा कोणत्याही स्वरूपाचा अधिकार धारण करता येणार नाही.

११. कंत्राटी शेती पुरस्कर्ता केवळ कृषि उत्पन्नाची खरेदी करण्यासाठी कंत्राटी शेती उत्पादकाशी कंत्राटी शेती करण्यासाठीचा करार करील,

१२. कराराचा कालावधी हा कमीत कमी एका हंगामापुरता आणि जास्तीत जास्त ३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

१३. कंत्राटी शेती उत्पादकास पुरस्कर्त्याने दिलेले कर्ज किंवा आगाऊ रक्कम यांची वसूली पुरस्कर्ता कृषि उत्पन्नातून वसूल करेल.

१४. ज्या जमिनीच्या संबंधात कंत्राटी शेती करण्यासाठीचा करार करण्यात आला असेल त्या जमिनीची विक्री किंवा मालकी/हक्क किंवा अधिकार किंवा तिची मालकी किंवा ताबा हस्तांतरीत, अन्यसंक्रामीत (llenated) अथवा निहीत (Vested) करता येणार नाही.

**कंत्राटी शेती पुरस्कर्ता नोंदणीसाठी कागदपत्रे :**

**१. विहीत नमुन्यातील अर्ज,**

**२. पतदारी प्रमाणपत्र,**

**३. बँक हमी,**

**४. कंपनी/भागीदारी संस्था/अशासकीय संघटना/सहकारी संस्था/शासकीय संस्था इ.च्या नोंदणीविषयक** दस्तऐवजांचा तपशील आणि संचालक व भागीदार इ.ची **नावे व पत्ते,**

**५. कंत्राटाखाली येणाऱ्या** कृषि उत्पन्नाचा तपशील.

**कृषी प्रक्रीया सहकारी संस्थांकरीता शासन अर्थसहाय्य योजना :**

**राज्यातील शेतक-यांनी** उत्पादित केलेल्या कृषि मालाला योग्य भाव मिळावा **यासाठी सहकारी** तत्वावरील कृषि प्रक्रिया संस्थांना शासनाकडून दि.१२.१०.२००७ **चे शासन निर्णयानुसार** १:९ या प्रमाणात शासकीय भागभांडवल व शासन हमीवर **रा.स.वि.निगम अथवा** इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज या स्वरुपात अर्थसहाय्य देण्यात **येते. दिनांक** १२.१०.२०१० शासन निर्णयानुसार कापूस या पिकाचा समावेश केला **आहे.**

दि.१२.१०.२००७ चे शासन निर्णयाप्रमाणे अर्थसहाय्याचा आकृतीबंध-

**१. संस्थेचे स्वभाग** भांडवल -प्रकल्प किंमतीच्या ४ %

**२. राज्य शासनाचे** भागभांडवल - प्रकल्प किंमतीच्या ३६%

**३. राज्य शासनाचे** हमीवर रासविनि किंवा इतर वित्तीय संस्थेचे कर्ज - **प्रकल्प किंमतीच्या** ६०%

*** कमाल रुपये** ५.०० कोटी पर्यत प्रकल्प किंमतीत अर्थसहाय्य

**किमान आधारभूत किंमत खरेदी योजना :**

**किमान** आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत केंद्र शासनाने ज्वारी, बाजरी, मका व **धान या भरड** धान्याची खरेदी करण्यासाठी -

अ) महाराष्ट्र राज्यामध्ये केंद्र शासनाची नोडल एजंसी म्हणून भारतीय अन्न महामंडळ (FCI) यांची नियुक्ती केली आहे.

ब) प्रत्यक्ष खरेदीची प्रक्रिया बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य को. ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लि, मुंबई व आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या अभिकर्त्यामार्फत पार पाडली जाते.

क) कापूस खरेदी : हंगाम २००८-०९ पासून राज्यशासनाच्या निर्देशानुसार प्राईज सपोर्ट स्किम योजनेअंतर्गत नाफेडचे सबएंजट म्हणून कापूस पणन महासंघ राज्यात हमीदरावर कापूस खरेदी करीत आहे. हंगाम २०१४-१५ पासून सी.सी.आय. या संस्थेचे उपअभिकर्ता म्हणून कापूस पणन महासंघ कापूस खरीदी करीत आहे.

**फळे व भाजीपाला सहकारी संस्थाना आर्थिक सहाय्य योजना :**

फळे व भाजीपाला संस्थांना उद्योग धंद्याच्या वाढीसाठी व भाग भांडवल पायाबळकट करण्यासाठी निवडक पणन संस्थांना भागभांडवल स्वरुपात आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. सदरहू आर्थिक सहाय्य मंजूरीच्यावेळी संस्थेजवळउपलब्ध असलेला पैसा,उद्योग,विकासाचा आराखडा इ. गोष्टी विचारात घेतल्या जातात.

१) राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत निवडक व कमकुवत सहकारी संस्थांना भाग भांडवल अंशदान योजना ही योजना दिनांक १९ मे १९६४ पासून चालू झाली या योजने अंतर्गत निवडक पणन संस्थांना आर्थिक उलाढाल रु. २०.०० लाख असेल तर भाग भांडवल अंशदान व्यवसाय वाढीसाठी रु. ५०.०० लाख मंजूर करण्यात येते. वार्षिक उलाढाल रु. २०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास त्यापटींमध्ये भाग भांडवली अंशदान मंजूर करण्यांत येते. तसेच आर्थिक दृष्टया कमकुवत परंतु व्यवसाय वाढीसाठी वाव आहे अशा संस्थांना रु. २.०० लाख ते रु. ५.०० लाखा पर्यन्त भाग भांडवल अशंदान मंजूर करण्यांत येते.

२) राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत योजनेअंतर्गत फळे व भाजीपाला सहकारी संस्थांना प्रिकुलिंग व कोल्ड स्टोरेज बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य. :-

ही योजना दिनांक ५/९/१९९१ पासून चालू असून फळे व भाजीपाला चांगल्या अवस्थेत राहण्यासाठी व विक्री ठिकाणी पोहचे पर्यन्त ती सुस्थितीत राहण्यासाठी कोल्डस्टोरेज बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य मंजुर केले जाते.

या योजने अंतर्गत राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडून राज्य शासनास प्रकल्प किंमतीच्या ९०% कर्ज दिले जाते. ते कर्ज राज्य शासनाकडून संस्थेसखालील प्रमाणे वितरीत करण्यात येते.

अ) कर्ज-४०%

ब) भाग भंडवल -५०%

क) संस्थेचा स्वभाग - १०%

३) राष्ट्रीय सहकारी विकास निगम व राष्ट्रीय बागवानी बोर्ड योजनेअंतर्गत फळे व भाजीपाला सहकारी संस्थांना अर्थ सहाय्य ( कर्ज व अनुदान) ही योजना दिनांक १६/३/१९९१ पासुन चालू झालेली असून उत्पादक शेतक-यांना मालाला योग्य भाव मिळावा व ग्राहकांना कमीतकमी किंमतीत फळे व भाजीपाला उपलब्ध व्हावा हा या योजनेचा हेतू होता.

या योजनेअंतर्गत फळे व भाजीपाला सहकारी संस्थांना एका युनिटसाठी रु. ८.०० लाख आर्थिकसहाय्य प्राप्त होते. त्यापैकी ५०% रक्कम म्हणजे रु. ४.०० लाख राष्ट्रीय बागवानी बोर्ड यांचे कडून अनुदान स्वरुपात मान्य केले जाते.

एका संस्थेत जास्ती जास्त चार युनिटसाठी रु. १५.०० लाख कर्ज रु. १५.०० लाख अनुदान दिले जाते.सदरची रक्कम ही खालील बाबींसाठी दिले जाते.

| अ.क्र. | बाब | रक्कम रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | ग्रेडिंग पॅकिंग शेड | १.०० |
| २. | किरकोळ विक्री केद्र (१०) | २.०० |
| ३. | पाच मे.टन क्षमतेचे वाहन (१) | २.०० |
| ४. | १० मे.टन वॉकिंग कुलर | २.०० |
| ५. | प्लास्टिक क्रेट्स | १.०० |
| | एकूण : | ८.०० |

या सर्व योजनेअंतर्गत अर्थसहाय्याबाबतचे विहीत अर्ज जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांचेकडुन उपलब्ध करुन त्यांचेमार्फत विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,पणन संचालनालय यांचेकडुन मंजुरीसाठी शासनस्तरावर सादर करुन शासनाकडुन राष्ट्रीय सहकारी विकास निगमची मंजुरी येवुन नंतरच संस्थेला अर्थसहाय्य मंजुर करण्यात येते.

पणन संचालनालयामार्फत थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार, एक परवाना पद्धत या अंतर्गत परवाना धारकांची यादी www.msamb.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**संपर्क :**

**संचालक (पणन),**
**पणन संचालनालय,**
मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
फोन नं. ०२० - २६१२३९८५
dirmktms@gmail.com

**कार्यकारी संचालक,**
**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,**
प्लॅट नं. आर-७, गुलटेकडी,
मार्केट यार्ड, पुणे - ४११ ०३७
फोन - ०२० - २४५२८१०० / २४५२८२००.
फॅक्स - ०२० - २४५२८२९९
Email - md@msamb.com.



● साई प्रवरा ॲग्रो प्रोसेसिंग इंडस्ट्री, खडकेवाके ता. रहाता जि. अहमदनगर




● व्हेजिटेबल प्रोसेसींग फॅसिलीटी, वाशी, नवी मुंबई.



# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

- शेतमाल तारण कर्ज योजना
- शहरी भागासाठी थेट भाजीपाला विक्री योजना (मुंबई, नागपुर)
- फळ महोत्सव अनूदान योजना
- बाजार समित्यांसाठी व्यवसाय विकास आराखडा
- बाजार समित्यांना विकसनशील कामांसाठी कमी व्याजदराने कर्ज योजना
- कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संगणक चालकांना प्रोत्साहन भत्ता (DMI मार्फत)
- कृषि उत्पन्न बाजार समिती टॅली सॉफ्टवेअर प्रशिक्षण अनुदान
- शेतकरी ते ग्राहक शेतमाल विक्रीसाठी शेतकरी आठवडे बाजार
- कृषि पणन मित्र मासिक
- पणन टोल फ्री क्र. १८०० २३३ ०२४४
- निर्याती विषयक कामकाज
- प्रकल्प सल्ला सेवा
- प्रशिक्षण
- टर्मिनल मार्केट
- महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने उभारलेल्या कृषिमाल निर्यात सुविधा
- पणन मंडळ कार्यालयीन पत्ते व अधिकारी संपर्क

# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

## १) शेतमाल तारण कर्ज योजना :

शेतकऱ्याला असलेल्या आर्थिक गरजेपोटी तसेच स्थानिकपातळीवर शेतमाल साठवणुकीच्या पुरेशा सुविधा नसल्यामुळे शेतीमालाचे काढणी हंगामात मोठ्या प्रमाणात शेतीमाल बाजार पेठेत विक्रीसाठी येतो. साहजीकच शेतमालाचे बाजार भाव खाली येतात. सदर शेतमाल साठवणूक करुन काही कालावधीनंतर बाजारपेठेत विक्रीसाठी आणल्यास त्या शेतमालास जादा बाजार भाव मिळू शकतो. तेव्हा शेतकऱ्यांना त्याच्या शेतमालासाठी योग्य भाव मिळावा या दृष्टीकोनातून कृषि पणन मंडळ सन १९९०-९१ पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबवित आहे. या योजनेमध्ये तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सुर्यफूल, चना, भात (धान), करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, काजू बी, बेदाणा व हळद या शेतमालाचा समावेश करण्यात आलेला असुन या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना बाजार समितीच्या गोदामात तारणात ठेवलेल्या शेतमालाच्या एकुण किंमतीच्या ७५ टक्के पर्यंत रक्कम ६ महिने कालावधीसाठी ६ टक्के व्याज दराने तारण कर्ज देण्यात येते. सदर योजना बाजार समित्यांमार्फत राबविली जात असुन सहा महिन्यांचे आत तारण कर्जाची परतफेड करणाऱ्या बाजार समित्यांना ३ टक्के व्याज सवलत देण्यात येते.

### शेतमालाचे प्रकारानुसार तारण कर्जाची मर्यादा, मुदत व व्याजदर :

कृषि पणन मंडळाच्या या योजनेचे लाभार्थी उत्पादक शेतकरी असुन योजने अंतर्गत शेतकऱ्यांना बाजार समितीच्या गोदामात तारणात ठेवलेल्या शेतमालाच्या एकुण किंमतीच्या ७५ टक्के पर्यंत रक्कम ६ महिने कालावधीसाठी ६ टक्के व्याज दराने तारण कर्ज देण्यात येते.

| अ.क्र | शेतमाल प्रकार | कर्ज वाटपाची मर्यादा |
|---|---|---|
| १ | सोयाबीन, तुर, मुग, उडिद, चना, भात (धान) करडई, सुर्यफूल, हळद | एकूण किंमतीच्या ७५% रक्कम. |
| २ | ज्वारी, बाजरी, मका व गहू | एकुण किंमतीच्या ५०% रक्कम. (किमान आधारभूत किंमत किंवा प्रचलित बाजार भाव प्रती क्वि. यापैकी कमी असणारी रक्कम) |
| ३ | काजू बी | एकूण किंमतीच्या ७५% रक्कम. (रु.५० प्रति किलो अथवा प्रत्यक्ष बाजार भावाची किंमत यापैकी कमी असेल ती रक्कम) |
| ४ | बेदाणा | एकुण किंमतीच्या कमाल ५०% किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- प्रति मे.टन यातील कमी असणारी रक्कम. |

### शेतमाल तारण कर्ज योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये, अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१. शेतमाल तारण कर्ज योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचाच शेतीमाल स्विकारला जातो. व्यापाऱ्यांचा शेतीमाल या योजनेअंतर्गत स्विकारला जात नाही.
२. प्रत्यक्षात तारण ठेवलेल्या शेतमालाची किमंत ही त्यादिवसाचे बाजारभाव किंवा शासनाने जाहीर केलेली खरेदी किंमत यापैकी जी कमी असेल ती ठरविण्यात येते.
३. तारण कर्जाची मुदत ६ महिने (१८० दिवस) असुन तारण कर्जास व्याजाचा दर ६% आहे.

४. बाजार समितीकडून कृषि पणन मंडळास ३% प्रमाणे कर्ज व्याजाची परतफेड. (उर्वरीत ३% व्याज बाजार समितीस प्रोत्साहनपर अनुदान). मुदतीत कर्ज परतफेड न केल्यास व्याज सवलात नाही.
५. ६ महिने (१८० दिवस) मुदतीनंतर सहा महिन्यापर्यंत ८ टक्के व्याज दर व त्याचे पुढील सहा महिन्याकरिता १२ टक्के व्याज दर आकारणी केली जाते.
६. तारण ठेवलेल्या शेतमालाची साठवणुक, देखरेख व सुरक्षा बाजार समिती विनामुल्य करते.
७. तारणातील शेतमालाचा विमा उतरविण्याची जबाबदारी संबंधीत बाजार समितीची राहते.

### २) शहरी भागासाठी थेट भाजीपाला विक्री योजना (मुंबई, नागपुर) :

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअतर्गत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या माध्यमातुन शहरी भागासाठी भाजीपाला पुरवठा योजना कार्यान्वीत झालेली आहे. या योजने अंतर्गत विक्री व्यवस्थापन घटकातील ०४ बाबी राबविणेसाठी कृषि पणन मंडळाकेड दिलेल्या आहेत. सदर योजना हि मुंबई, नागपुर या दोन शहरांसाठी लागू आहे

**पात्र लाभार्थी :**

भाजीपाला उत्पादक शेतकरी गट, शेतकरी उत्पादक समुह, भाजीपाला उत्पादक गटाचे वतीने पुरस्कृत केलेला लघु विक्री व्यावसायीक, ग्रीगेटर म्हणुन मान्यता प्राप्त व्यक्ती / संस्था, सहकारी संस्था, खाजगी फर्म, विश्वस्थ संस्था, स्वयंसहाय्यता गट, सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या.

**सदर विक्री व्यवस्थापन घटकांतर्गत खालील बाबींचा समावेष आहे :**

**अ) संकलन व प्रतवारी केंद्र उभारणी :**

**अर्थसहाय्याचे स्वरूप :**

प्रकल्प खर्च रू.०८ लाख गृहित धरून त्याचे ५० टक्के अथवा जास्तीत जास्त रू.०४ लाख अनुदान देय.

**उभारवायच्या सुविधा :**

संकलन व प्रतवारी केंद्राचे बांधकाम, प्लॅस्टिक क्रेट, वजन काटे, पॅकिंग मशिन, ग्रेडिंग मशिन, वॉशिंग टब्स, टेबल्स, ड्राईंग फॅन्स, कटींग मशिन, ताडपत्री, संगणक व प्रिंटर, विद्युतीकरण इ.

**ब) वातावरण नियंत्रित भाजीपाला विक्री केंद्र :**

**अर्थसहाय्याचे स्वरूप :**

प्रकल्प खर्च रू.०८ लाख गृहित धरून त्याचे ५० टक्के अथवा जास्तीत जास्त रू.०४ लाख अनुदान देय.

**उभारावयाच्या सुविधा :**

दुकानाचे बांधकाम, फर्निचर, वातानुकूलीत सुविधा, प्लॅस्टिक क्रेट, इलेक्ट्रॉनिक वजन काटे, वातावरण नियंत्रीत बॉक्स, रॅक्स, बिलिंग मशिन, संगणक व प्रिंटर, विद्युतीकरण इ.

**क) मोटाराईज्ड व्हेंडीग कार्ट :**

**अर्थसहाय्याचे स्वरूप :**

प्रकल्प खर्च मर्यादा रू.०४ लाख गृहित धरून, त्याचे ५० टक्के अथवा जास्तीत जास्त रू.०२ लाख इतके अनुदान देय.

**उभारावयाच्या सुविधा :**

शटर, रॅक्स, प्लॅस्टिक क्रेट, इलेक्ट्रॉनिक वजन काटे, आवश्यकते नुसार वातानुकूलीत यंत्रणा, बिलिंग मशिन, विद्युतीकरण इ.

**ड) स्थाई / फिरते विक्री केंद्र :**

अर्थसहाय्याचे स्वरूप -प्रकल्प खर्च मर्यादा रू.३०,०००/- गृहित धरून, त्याचे ५० टक्के अथवा जास्तात जास्त रू.१५,०००/- लाख इतके अनुदान देय.

उभारावयाच्या सुविधा - रॅक्स / विक्री कट्टा / ट्रॉली / हातगाडी, प्लॅस्टिक क्रेट, वजन काटे, पॅकिंग मशीन, बिलिंग मशिन इ.

### ३) फळ महोत्सव अनूदान योजना :

**उद्देश :**

शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेला माल थेट ग्राहकांना विक्री करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे. उत्पादक ते ग्राहक थेट कृषि मालाची विक्री यामध्ये प्रामुख्याने फळांचा समावेश.

**अटी व शर्ती :**

- फळ महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवस.
- फळ महोत्सवास प्रतिस्टॉल रु.१,०००/- याप्रमाणे अर्थसहाय्य.

- फळ महोत्सवातील जाहिरात व प्रसिध्दीकरिता महानगर पालिकेच्या शहरांसाठी रु.१०,०००/- तर इतर शहरांसाठी रु.५,०००/- अर्थसहाय्य. (अनुदान - एकूण खर्चाच्या ५०% किंवा कमाल रु.६०,०००/-)
- फळ महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय.
- फळ महोत्सव आयोजन करण्यापुर्वी कृषि पणन मंडळाची पुर्वसंमती घेणे आवश्यक.
- फळ महोत्सव आयोजन आर्थिक वर्षात एक वेळा.

**लाभार्थी :**

उत्पादकांच्या नोंदणीकृत सहकारी संस्था / संघ / बाजार समित्या / बचत गट / कृषि व पणनशी संबंधीत असलेल्या संस्था.

### ४) बाजार समित्यांसाठी व्यवसाय विकास आराखडा :

महाराष्ट्र राज्यात ३०६ बाजार समित्या कार्यरत असुन ६०२ एवढे उपबाजार कार्यरत आहेत. या बाजार समित्यांची सन २०१३-१४ ची एकुण वार्षिक उलाढाल रक्कम रु. ४६८५८.५२ कोटी एवढी आहे. राज्यातील ३०६ बाजार समित्यांपैकी २९८ बाजार समित्यांचे बीडीपी तयार करुन मंजुरी देण्यात आली आहे. सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या पाच वर्षांसाठी तयार करण्यात आलेल्या व्यवसाय विकास आराखडयांची एकुण रक्कम रु.८८६१.८५ कोटी एवढी आहे.कायद्यात झालेल्या सुधारणांनंतर थेट पणन, खाजगी बाजार, कंत्राटी शेती या माध्यमातून पर्यायी पणन व्यवस्था निर्माण होत असल्याने भविष्यात बाजार समित्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील बाजार फीच्या उत्पन्नापासून वंचित रहावे लागण्याची शक्यता आहे. भविष्यात बाजार समित्यांदेखील सक्षम व्हाव्या आणि शेतकऱ्यांच्या शेतमालामध्ये मुल्यवृद्धी व्हावी यासाठी राज्यात स्मार्ट बाजार समित्या निर्माण होण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

राज्यातील शेतक-याच्या कृषिमालाला योग्य भाव मिळण्यासाठी, कृषिमालाची साठवणूक, मूल्यवृध्दी होण्याच्या दृष्टीने, खरेदीदाराला योग्य भावात मिळावा इत्यादी मुद्दे विचारात घेता आवश्यक त्या सुविधाची निंमीती करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या धोरणाप्रमाणे बाजार समित्यांनी शेतकऱ्यांच्या कृषि मालाच्या विपणनाच्या दृष्टीने कायद्यातील तरतुदींचा विचार करता विशेष वस्तु बाजार प्रक्रिया उद्योग, व मूल्यवृध्दी होण्याच्या दृष्टीने बाजार समितीमध्ये लिलाव शेड, गोदामे, धान्य चाळण यंत्रणा, कोल्ड स्टोरेज, रायपनींग चेंबर पॅक हाऊस, प्रक्रिया उद्योग आदी बाबी प्रत्यक्ष कार्यान्वित होतील अशा पध्दतीने नियोजन करण्याबाबत बाजार समित्यांचे व्यवसाय विकास आराखडे तयार करुन घेण्यात आले आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद या शहरांशी निगडीत असणाऱ्या बाजार समित्या स्मार्ट बाजार समितीअंतर्गत विकास व्यवसाय विकास आराखडयाअंतर्गत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे राज्यातील रक्कम रु.५ कोटींचे उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्यांचा स्मार्ट बाजार समितीअंतर्गत विकास करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. व्यवसाय विकास आराखडयाअंतर्गत राज्यात ज्या बाजार समितीमध्ये एकाच पिकाचे मोठया प्रमाणावर उत्पन्न येते अशा बाजार समित्यांमध्ये विशेष वस्तु बाजाराची स्थापना करुन संबंधीत शेतमालासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा, मूल्यवर्धीत सुविधा व त्याच्याशी निगडीत प्रक्रिया उद्योग उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### ५) बाजार समित्यांना विकसनशील कामांसाठी कमी व्याजदराने कर्ज योजना :

**पात्र लाभार्थी :**

महाराष्ट्रातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

कर्ज रुपाने अल्प, मध्यम व दिर्घ मुदती कर्ज

**अंतरिम कर्ज :**

कृषि उत्पन्न बाजार समित्यांना व्यापारी गाळे (कमर्शियल कॉम्प्लेक्स) बांधकाम १ वर्ष मुदतीचे १० टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध.

**दिर्घ मुदती कर्ज :**

१) आडतगाळे बांधकामसाठी ५ वर्षे मुदतीसाठी ८ व्याजदराने (आदिवासी व कोकण विभागातील बाजार समित्यांसाठी ६ टक्के व्याजदर)

२) विकसन कामे : जमिन संपादन, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यांवर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे, कांदा चाळ बांधकाम, इ. बांधकामासाठी (मुदत १० वर्षे, व्याजदर ८ टक्के व आदिवासी व कोकण विभागातील बाजार समित्यांसाठी ६ टक्के व्याजदर )

### उभारावयाच्या सुविधा :

यामध्ये प्रामुख्याने जमिन संपादन, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यांवर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे, शेतकरी बाजार, कांदा चाळ बांधकाम, तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामाचा समावेश होतो.

## ६) कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संगणक चालकांना प्रोत्साहन भत्ता (DMI मार्फत) :

डि.एम.आय भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research Information Network Scheme अंतर्गत ऍगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणाऱ्या बाजार समित्यांच्या कर्मचाऱ्यास रु. १०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डि.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहन भत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पणन मंडळामार्फत पाठविण्यात येतात. डी.एम.आय. यांच्या कडून प्राप्त निधी बाजार समित्यांच्या संगणक चालकांस वाटप करण्यात येतो.

## ७) कृषि उत्पन्न बाजार समिती टॅली सॉफ्टवेअर प्रशिक्षण अनुदान :

राज्यातील सर्व बाजार समित्यांना कॉमन अकाऊंटीग सिस्टिम कार्यरत करणेबाबत एम.ए.सी.पी. प्रकल्पामधून कार्यवाही सुरु आहे. या योजनेतून सर्व बाजार समित्यांना सॉफ्टवेअर देण्यात आलेले आहे. सदर सॉफ्टवेअर वापरल्यानंतर सर्व बाजार समित्यांची आर्थिकपत्रके संगणकीकृत होऊन ती बिनचूक व समानता येण्यास मदत होईल.

### पात्र लाभार्थी :

बाजार समित्यांमध्ये अकाऊंट चे कामकाज टॅली सॉफ्टवेअरद्वारे होण्यासाठी व ते ऑपरेट करण्यासाठी बाजार समितीचे अकाऊंटंट किंवा लेखा विभागाशी कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्याने टॅली सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

### अनुदानाचे स्वरुप :

टॅली सॉफ्टवेअर सर्टिफिकेट कोर्स करिता प्रत्यक्ष भरणा केलेली फी ची रक्कम परंतू जास्तीत जास्त रु.५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदान रक्कम महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत म्हणून देय होईल.

## ८) शेतकरी ते ग्राहक शेतमाल विक्रीसाठी शेतकरी आठवडे बाजार :

### उद्देश :

शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांना आपला उत्पादित कृषी माल थेट ग्राहकांना विक्रीसाठी शेतकरी आठवडे बाजार सुरु करण्यात येत आहेत. यामुळे ग्राहकांना ताजा व स्वच्छ भाजीपाला वाजवी दरात राहण्याच्या जागेजवळ उपलब्ध होत आहे. यामुळे शेतक-यांच्या विक्री खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होते तसेच थेट विक्रीची संपुर्ण रक्कम रोख स्वरुपात शेतक-यास प्राप्त होतो.

शेतकरी बाजारांमध्ये सध्या सुमारे ३५ ते ४० गटांमार्फत शेतमालाची विक्री होत असून सुमारे ३५ ते ४० मे. टन शेतमालाची विक्री थेट ग्राहकांना होते. ज्यादा दराचा फायदा थेट शेतक-यांना होत असून फळे, भाजीपाल्या बरोबरच दुग्धजन्य पदार्थ आणि महिला बचत गटांच्या मालांची विक्री येथे करण्यात येते.

### आयोजक :

शेतकरी गट / समूह, शेतकरी उत्पादक कंपनी, बचत गट, स्वंयसेवी संस्था, सहकारी संस्था इ.

### आयोजन :

सद्यस्थितीत पुणे शहरात कात्रज -बुधवार, बालेवाडी - गुरुवार, बाणेर - शनिवार, आणि कोथरुड - रविवार येथे बाजारांचे आयोजन.

### उद्दीष्ट :

पुणे शहरात ७ ठिकाणी आणि राज्यात जिल्ह्याच्या ठिकाणी प्रत्येकी किमान एक शेतकरी आठवडे बाजार सुरु करण्याचा प्रयत्न.

## ९) कृषि पणन मित्र मासिक :

कृषि मालाचे उत्पादनोत्तर तंत्रज्ञान, ग्रेडींग, पॅकिंग, हाताळणी, विक्री व्यवस्था, विविध शासकीय योजना, बाजारभाव, कृषि पणन मंडळाचे विविध उपक्रम आदी माहितीसाठी कृषि पणन मंडळामार्फत प्रकाशित होणारे मासिक 'कृषि पणन मित्र'

- मासिकाची वर्गणीदार संख्या २०,०००
- वार्षिक वर्गणी रु. १५०/-
- सभासद होण्यासाठी ऑनलाईन सुविधा.

- मंडळाच्या www.msamb.com संकेतस्थळावर मागील अंक उपलब्ध.
- मासिकात तज्ज्ञ लेखकांचे उपयुक्त लेख.
- International Standard Serial Number (ISSN) प्राप्त झालेले एकमेव मराठीतील मासिक.
- १ लाख वर्गणीदार आणि १० लाख वाचक करण्याचे उद्दिष्ट.

**१०) पणन टोल फ्री क्र. १८०० २३३ ०२४४ :**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव मिळावा, बाजार आवारात कृषि मालाच्या विक्रीत होणा-या गैरप्रकारांबाबतच्या तक्रारींवर तात्काळ कारवाई व्हावी तसेच राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजाबाबत तक्रारीसाठी कृषि पणन मंडळाचा उपक्रम.

- पणन मंडळाच्या या टोल फ्री सुविधेवर प्रतिदिन १०० कॉल.
- तक्रार व सुचनांसाठी स्वतंत्र सेल.
- तक्रार दाखल झाल्यानंतर तात्काळ कार्यवाही यंत्रणा.
- बाजारभाव व तक्रार निवारणासाठी पणन मंडळाचे नवे पाऊल.
- कृषि उत्पन्न बाजार समित्यांना टोल फ्री क्रमांकाचे फ्लेक्स बाजार आवारात लावणेबाबत सुचना.
- टोल फ्री सुविधा कार्यक्षम होण्यासाठी संगणक प्रणालीची निर्मीती.

**११) निर्याती विषयक कामकाज :**

**अ) आयात निर्यात परवाना काढून देणे :**

**योजनेची माहिती :**

भारतातून कृषिमालाच्या निर्यातीसाठी आयात-निर्यात परवाना आवश्यक आहे. प्रोप्रायटरी संस्थेव्यतिरीक्त इतर अर्जासाठी संस्थेचे नावाचे पॅनकार्ड लागते. सदर परवाना सहसंचालक, विदेश व्यापार, वाणिज्य मंत्रालय यांचे पुणे, नागपूर व मुंबई कार्यालयांमधून प्राप्त होतो. त्यासाठी NF2 या प्रारूपातील अर्ज वापरला जातो. हा अर्ज वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर परवाना काढण्यासाठी शेतकऱ्यांसाठी रू.५००/-, सहकारी संस्थेसाठी रू.१,०००/- व खाजगी निर्यातदारांसाठी रू.२,०००/- अधिक लागू सेवाकर यानुसार शुल्क आकारून पणन मंडळ मार्गदर्शन करते.

**योजनेचे लाभार्थी :**

सदर परवाना वैयक्तिक नावाने, प्रोप्रायटरी संस्था, पार्टनरशिप कंपनी, प्राईव्हेट लिमीटेड कंपनी, प्रोड्यूसर कंपनी, ट्रस्ट, सहकारी संस्था यांना प्राप्त करता येतो. शेतकरी आपल्या स्वतःच्या नावाने किंवा प्रोप्रायटरी फर्मच्या नावाने अर्ज करू शकतो.

**ब) अपेडा रजिस्ट्रेशन करून देणे :**

**योजनेची माहिती :**

निर्यात परवाना प्राप्त झाल्यानंतर व्यावसायीकाचा निर्यातदार होतो. असा निर्यातदार हा भारत सरकारने परवानगी दिलेल्या सर्व उत्पादनांच्या आयात व निर्यातीसाठी सक्षम होतो. तथापि भारत सरकारच्या निर्देशानुसार होतकरू निर्यातदाराला किमान एका एक्सपोर्ट प्रमोशन एजन्सीची नोंदणी क्रमप्राप्त आहे. आपण कृषिमालाच्या निर्यातीचे काम करीत असल्यामुळे अपेडा या संस्थेची नोंदणी आपल्याला अनिवार्य आहे. सदर नोंदणीचे अर्ज www.apeda.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. तसेच पणन मंडळाकडे मागणी केल्यास अर्ज उपलब्ध होऊ शकतात. नोंदणीसाठी अपेडा रू.५,०००/- एवढे शुल्क आकारते. अपेडा नोंदणीचा कालावधी ५ वर्षांचा असून त्यानंतर नुतनीकरण करावे लागते.

**योजनेचे लाभार्थी :**

कृषिमालाच्या आयात किंवा निर्यातीचे काम करण्यास इच्छूक सर्व आयात-निर्यातदाराला अपेडा या संस्थेची नोंदणी अनिवार्य आहे. सदर नोंदणीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी पणन मंडळ रू.५००/- अधिक सेवाकर एवढे शुल्क आकारते.

**क) ग्लोबल गॅप प्रमाणिकरण अनुदान योजना :**

**योजनेची माहिती :**

युरोपीय देशांना कृषिमालाची निर्यात वाढण्यासाठी त्या देशांचे कडक गुणवत्ता निकष पाळले जावेत या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत ग्लोबलगॅप प्रमाणिकरण अनुदान योजना राबविण्यात येते. सदर योजना हापूस आंबा, केसर आंबा व डाळींब फळपिकांच्या युरोपियन देशांच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठीची योजना आहे. सदर योजना संपुर्णपणे पणन मंडळाचे स्वनिधीतून राबविण्यात येते. तसेच यावर्षी युरोपीयन देशांना आंबा निर्यातीसाठी हॉट वॉटर व व्हेपर हीट ट्रिटमेंट प्रक्रिया

लागू केल्यानुसार ग्लोबलगॅप प्रमाणिकरणाची अट शिथील केलेली आहे. ग्लोबलगॅप प्रमाणिकरण अनुदान योजना, २०१५ साठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत रू. १५/- लाख एवढी तरतूद करण्यात आली असून त्यानुसार सुमारे २०० फळ उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान योजनेचा लाभ देता येऊ शकेल.

**योजनेचे लाभार्थी :**

युरोपीय देशांना ताज्या कृषिमालाचे उत्पादन निर्यात करण्यास इच्छूक उत्पादक शेतकरी.

### ड) निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी प्रशिक्षण योजना :

**योजनेची माहिती :**

केळीच्या निर्यातीला चालना देण्यासाठी तसेच केळीच्या निर्यातीस असलेला वाव व जागतीक बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातुन केळी क्लस्टर मध्ये शेतक-यांना निर्यातक्षम मालाचे उत्पादन व निर्यातवृद्धी वाढीसाठी अपेडा व कृषि विभाग यांचे मदतीने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने प्रथमता केळी पिकासाठी निर्यातक्षम मालाचे उत्पादन व निर्यात या अनुषंगाने विभागस्तरावरुन एक दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेबाबत ठरविलेले आहे. याकरीता पुणे, कोल्हापुर, सोलापुर, जळगाव, नांदेड या जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. केळी उत्पादक शेतकरी, शेतकरी गट हे योजनेच्या केंद्रस्थानी ठेवुन त्यांना निर्यातक्षम केळी उत्पादन तंत्रज्ञान व निर्यात प्रशिक्षणाद्वारे तज्ञांमार्फत मार्गदर्शन करणे. काढणीपुर्व व काढणीपश्चात तंत्रज्ञानाबद्दल शेतक-यांना अवगत करणे व मार्केट लिंकेजच्या दृष्टीने प्रयत्न करणे. उपरोक्त जिल्ह्यांमधे सद्यस्थितीत एकूण १८ प्रशिक्षण सत्रांचे नियोजन करण्यात येत असून त्यासाठी रू.४.५०/- लाख एवढ्या रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

**योजनेचे लाभार्थी :**

पुणे, कोल्हापुर, सोलापुर, जळगाव, नांदेड या जिल्ह्यातील प्रगतशील केळी उत्पादक शेतकरी, शेतकरी गट, फार्मर प्रोड्यूसर ऑर्गनायझेशन्स इ.

### इ) युरोपीय देशांसाठी कांदा निर्यात वाहतुक अनुदान योजना :

**योजनेची माहिती :**

युरोपियन देशामध्ये भारतीय कांदा निर्यातीस वाव लक्षात घेता व युरोपियन देशामध्ये निर्यातीस जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळावे यासाठी सहकारी संस्थांसाठी कांदा निर्यात वाहतूक अनुदान योजना पणन मंडळामार्फत घोषित केलेली होती. राज्यातून परंपरेने बहुतांश कांदा निर्यात मुख्यत्वे आखाती देश, मलेशिया, सिंगापुर, श्रीलंका , बांगलादेश इ. देशात केली जाते. भारतातून युरोपियन देशात अल्प प्रमाणात कांद्यांची निर्यात केली जाते . परंतु युरोपियन देशात भारतातील कांदा निर्यातीस प्रंचड मागणी आहे. खाजगी निर्यातदार तसेच सहकारी संस्था यांना कांदा निर्यातीस प्रोत्साहन देणेकरिता कांदा निर्यात अनुदान वाहतूक योजना पणन मंडळामार्फत सहकारी संस्थांसाठी घोषित केलेली होती. ही योजना सन २००६-२००७ पासून घोषित केलेली होती. त्या अंतर्गत रु. ५,०००/- (पाच हजार फक्त ) प्रति रेफर कंटेनर अनुदानाची महत्तम मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. एका निर्यातदारास एका आर्थीक वर्षात जास्तीत जास्त रु. २,००,०००/-(रुपये दोन लाख फक्त ) अनुदान देय आहे.

**योजनेचे लाभार्थी :**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडे कांदा निर्यातीसाठी कॅनलायझींग एजन्सी अधिकार असताना ज्या निर्यातदारांनी पणन मंडळाकडून निर्यातीसाठीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले असेल अशाच निर्यातदारांना सदर अनुदानाचा लाभ देण्यात येत होता.

### १२)प्रकल्प सल्ला सेवा :

**योजनेचा उद्देश :**

राज्यातील शेतक-यांनी उत्पादीत केलेल्या शेतीमालावर प्रक्रिया, अन्न प्रक्रिया, सुगी पश्चात व्यवस्थापन, योग्य भाव मिळावा व त्याअनुषंगाने रोजगार निमिती व्हावी या उद्देशाने राज्यातील कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना विविध वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य मंजूर करणेकरिता तसेच बाजार समित्या, खाजगी उद्योग यांना प्रकल्प अहवाल तयार करुन देणे, मार्गदर्शन करणे, तांत्रिक सल्ला देणे, आर्थिक नियोजन तसेच प्रकल्प उभारणीसाठी सल्ला देणे.

पणन संचालनालयाकडून प्राप्त झालेल्या प्रकल्प प्रस्तावांवर अभिप्राय देणे.

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन देणे त्याकरिता खालीलप्रमाणे फी आकारण्यात येते.

| अ.क्र | तपशील | सुधारीत सेवाशुल्क |
|---|---|---|
| १. | रु. ५ कोटी पर्यंत | रु. २ कोटी पर्यंत - ०.४ टक्के + सेवाकर<br>रु.२ कोटी ते ५ कोटी - रु. १.०० लाख + सेवाकर |
| २. | रु. ५ कोटी पेक्षा जास्त परंतू १० कोटी पेक्षा कमी | रु. ५ कोटी ते १० कोटी पर्यंत - रु. १.५० लाख + सेवाकर<br>रु. १५ कोटी ते २५ कोटी पर्यंत - रु. २.५० लाख + सेवाकर<br>रु.२५ कोटी पेक्षा जास्त - रु.३.०० लाख + सेवाकर |
| ३. | रु. १० कोटी पेक्षा जास्त | रु. १० कोटी ते १५ कोटीपर्यंत - रु. २.०० लाख + सेवाकर |
| ४. | विशेष घटक योजनेअंतर्गत (विघयो) प्रकल्प अहवाल तयार करणे | विशेष घटकांना (मागासवर्गीय /आदिवासी संस्था) वरील (अ.क्र.१ ते ३) प्रस्तावित सुधारीत फीच्या ५० टक्के + सेवाकर या प्रमाणात फी |

पणन संचालनालयाकडील प्राप्त प्रस्तावांवर अभिप्राय अहवाल देणे या सारख्या सेवा पुरविण्यात येतात.

| तपशील | | सेवाशुल्क |
|---|---|---|
| प्रकल्प खर्च १ कोटी पेक्षा कमी | - | रु.१०,०००/- |
| प्रकल्प खर्च १ कोटी ते ७.४९ कोटी | - | रु.२०,०००/- |
| प्रकल्प खर्च ७.५ कोटी ते १४.९९ कोटी | - | रु.३०,०००/- |
| प्रकल्प खर्च १५ कोटी ते ३९.९९ कोटी | - | रु.४०,०००/- |
| प्रकल्प खर्च ४० कोटी पेक्षा जास्त | - | रु.५०,०००/- |

## १३) प्रशिक्षण :

भारत सरकारतर्फे स्थापन करण्यात आलेल्या खालिल संस्थांमध्ये विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत करण्यात येतात.

अ) राष्ट्रीय कृषी विपणन संस्था, जयपुर.

ब) मॅनेज, हैद्राबाद

क) राष्ट्रीय शितसाखळी विकास केंद्र, नवी दिल्ली.

ड) इंडियन इन्स्टिट्युट ऑफ फॉरेन ट्रेड, नवी दिल्ली.

सदर संस्थांमध्ये प्रशिक्षण विनामुल्य असून प्रशिक्षणासाठी जाणे व येणेसाठीचा खर्च प्रशिक्षणार्थींनी करावयाचा असतो. या संस्थांमध्ये कृषि पणन मंडळ आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी व अधिका-यांसाठी विनामुल्य प्रशिक्षण व्यवस्था करण्यात येत आहे.

## १४) टर्मिनल मार्केट (Terminal Markets)

**उद्देश :**

फळे व भाजीपाल्याच्या प्रतवारी, गुणवत्ता प्रमाणिकरण यांना चालना देवून शेतकऱ्यांना आपल्या फलोत्पादीत उत्पादनासाठी किफायतशीर दर मिळवून देणे. उत्पादक, ग्राहक, उद्योजक, पणन साखळीत समाविष्ट होणारे इतर मध्यस्त यांना कृषि पणन अनुषंगिक आवश्यक उपाययोजना व पध्दती बाबत जागृती निर्माण करणे.

**नोडल एजन्सी :** पणन मंडळ.

**शहरे :** मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर.

**पात्रता :** सार्वजनिक खाजगी भागीदारीतुन उभारणी.

**अनुदान :** प्रकल्प खर्चाच्या २५ ते ४० टक्के, जास्तीत जास्त रु.५०.०० कोटी

**निवडीचे निकष :** खाजगी भागीदार निवड २ टप्यात करणेत येते - Request For Qualification (RFQ) and Request For Proposal (RFP). RFQ मध्ये पात्र ठरलेला जो खाजगी भागीदार कमीत कमी अनुदानाची मागणी करेल त्याची प्रकल्पासाठी निवड.

प्रकल्पातंर्गत पणन सुविधांचा विकास- फलोत्पादीत मालाचे संकलन, वाळविणे, निवड, प्रतवारी, प्रमाणीकरण, लेबलिंग, पॅकींग, रायपनिंग चेंबर्स, शितगृह, किरकोळ/ घाऊक विक्री सुविधा. शेतकरी निवास, बँक, पोस्ट ऑफिस, इंटरनेट, दूरध्वनी सुविधा.

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने उभारलेल्या कृषिमाल निर्यात सुविधा :**

**१) व्हेपर हीट ट्रिटमेंट :** राज्यामध्ये ही एकमेव सुविधा आंबा हंगाम, २०१५ मध्ये आजमितीस पणन मंडळाची युरोप येथे आंबा निर्यातीसाठी प्रमाणित झालेली आहे.

- व्हि.एच.टी. १.५ मे. टन/तास
- प्रशितकरण ५ मे. टन / ६ तास
- शितगृह ५० मे. टन
- हाताळणी यंत्रणा १.५ मे.टन / तास

**२) आंबा, फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, गोरेगाव (पूर्व), मुंबई- युरोप येथे आंबा निर्यातीसाठी कृषिउद्योग परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथे सुविधेची उभारणी पूर्ण :**

- प्रि-कुलींग सुविधा - ५ मे. टन / बॅच
- कोल्ड स्टोअरेज - ५० मे. टन ु २ चेंबर्स
- हॉट वॉटर ट्रिटमेंट सुविधा- २.५ मे. टन / बॅच
- ग्रेडींग व पॅकींग लाईन- ३ मे. टन / तास
- रायपनिंग चेंबर- ११ मे. टन / बॅच

**३) इर्रॅडिएशन फॅसिलीटी सेंटर, वाशी. आंबा, बटाटा, धान्ये व कडधान्ये, प्रक्रिया उत्पादने, मसाले व फळे यांवर विकीरण प्रक्रिया सुविधा उपलब्ध**

- कोबाल्ट - ६० चा वापर करून रेडीएशन
- आंबा व मसाल्यांचे डोजीमेट्री पूर्ण
- AERB व DAE चा परवाना प्राप्त
- २५ मे. टन कोल्ड स्टोअरेजची सुविधा
- डाळींबाची डोसमॅपींग करून अमेरीकेला निर्यात शक्य
- अमेरिकन क्वारंटाईन इन्स्पेक्शन टीमची प्रमाणिकरणासाठी भेट.

**४) व्हेजिटेबल प्रोसेसींग फॅसिलीटी, वाशी, नवी मुंबई. युरोप येथे निर्यात होणाऱ्या भाजीपाल्याचे आदर्श पद्धतीने हाताळणी व पॅकींग होण्यासाठी सुविधेची निर्मिती. पुढीलप्रमाणे सुविधा उपलब्ध :**

- हॉट वॉटर ट्रिटमेंट सुविधा- १ मे. टन / तास
- प्रिकुलींग व कोल्ड स्टोअरेज सुविधा
- प्रिकुलींग सुविधा - ५ मे. टन / बॅच
- कोल्ड स्टोअरेज - ६० मे. टन - एक
- कोल्ड स्टोअरेज - ९० मे. टन - एक
- भाजीपाला निवडणे व हाताळणीसाठी सुविधा
    - भेंडी : २ मे. टन / तास
    - वांगी : ०.५ मे. टन / तास
    - हिरव्या मिरच्या : ०.५ मे. टन / तास
    - भाजीपाला : ०.५ मे. टन / तास

**५) साई प्रवरा अॅग्रो प्रोसेसिंग इंडस्ट्री, खडकेवाके ता. रहाता जि. अहमदनगर**

फळे आणि भाजीपाल्याचे निर्जलीकरण करून त्याचे रेडी टू इट पदार्थांमध्ये वापर करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच निर्जलीकरण केलेल्या पदार्थांना परदेशात असलेली मागणी विचारात घेऊन कृषि पणन मंडळाच्या सहाय्याने अत्याधुनिक डिहायड्रेशन प्लँटची उभारणी करण्यात आली आहे या ठिकाणी :

- निर्जलीकरण क्षमता : ४ मे.टन. प्रतीदिन.
- फळे भाजीपाला प्रतवारी व हाताळणी : ४० मे.टन. प्रतीदिन.
- प्रशितकरण : ५ मे.टन. प्रती बॅच.
- शितगृह : १५० मे.टन. (एकूण ४ चेंबर).
- प्रवरा ग्रिन्स या ब्रँड अंतर्गत बाजार पेठेत विक्री.

ग्रामीण भागात उत्पादन क्षेत्रातच फळे, भाजीपाल्यावर निर्जलीकरण प्रक्रिया तसेच संकलन, प्रतवारी व पॅकेजिंग संदर्भातून उभारण्यात आलेला राज्यातील पाहिलाच अत्याधुनिक प्रकल्प.

## कृषि पणन मंडळाची निर्यात सुविधा केंद्रे व आधुनिक फळे व भाजीपाला पणन सुविधा केंद्रे

### निर्यात सुविधा केंद्र :

| क्र. | निर्यात सुविधा केंद्र | तपशिल | क्षमता |
|---|---|---|---|
| १. | व्हेपर हिट ट्रिटमेंट सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई | व्हि.एच.टी. | १.५ मे. टन/तास |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास |
| २. | हापूस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे जि. रत्नागिरी | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | २५ मे. टन |
| | | रायपनिंग चेंबर | ५ मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास |
| ३. | हापूस आंबा निर्यात सुविधा केंद्र, जामसंडे जि. सिंधुदूर्ग | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | २५ मे. टन |
| | | रायपनिंग चेंबर | ५ मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास |
| ४. | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना, जि. जालना | प्रशितकरण | ५ मे. टन / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | रायपनिंग चेंबर | ५ मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास |
| ५. | शेतमाल (कांदा) निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर जि. पुणे | हाताळणी यंत्रणा | १० मे. टन / तास |
| | | कांदा साठवणूक सुविधा | ५०० मे. टन |
| ६. | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर जि. पुणे | प्रशितकरण | ५ मे. टन / ६ तास |
| | | शितगृह | १२० मे. टन |

| क्र. | निर्यात सुविधा केंद्र | तपशिल | क्षमता |
|---|---|---|---|
| ७. | डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, बारामती जि. पुणे | प्रशितकरण | ५ मे. टन / ६ तास |
| | | शितगृह | ६० मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे. टन / ६ तास |
| ८. | केळी निर्यात सुविधा केंद्र, बसमतनगर जि. हिंगोली | प्रशितकरण | ५ मे.टन / ६ तास |
| | | शितगृह | २५ मे. टन |
| | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास |
| ९. | केळी निर्यात सुविधा केंद्र, रावेर जि. जळगाव | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | २५ मे. टन. |
| | | रायपनिंग चेंबर | २५ मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे. टन / तास |
| १०. | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, (आष्टी जि. वर्धा) | प्रशितकरण | ५ मे. टन. / तास |
| | | शितगृह | २५ मे. टन. |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास |
| ११. | केशर आंबा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, लातूर. | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | १०० मे. टन |
| | | रायपनिंग चेंबर | ५ मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास |
| १२. | डाळिंब, द्राक्षे व कांदा निर्यात सुविधा केंद्र कळवण, जि. नासिक | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास |
| | | कांदा साठवणूक | ५०० मे. टन. |

| क्र. | निर्यात सुविधा केंद्र | तपशिल | क्षमता |
|---|---|---|---|
| १३. | निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव, जि. पुणे. | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन. |
| | | पॅक हाउस | ८०० स्क्वे. फुट |
| १४. | आईस मेकींग युनिट, इंदापूर, जिल्हा पुणे. | शितगृह | २५ मे. टन |
| | | आईस क्युब | ४० प्रती दिवस |
| १५. | डाळिंब व द्राक्षे निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि. सांगली | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन. |
| | | पॅक हाउस | २००० स्क्वे.फुट |
| १६. | केळी निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर, जि. पुणे | फार्मपॅकहाउस | संख्या - ३ |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | २५ मे. टन |
| | | रायपनींग चेंबर | २५ मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | २ मे. टन / तास |
| १७. | कांदा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, चांदवड, जि. नाशिक | प्रशितकरण | ५ मे. टन / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | कांदा चाळी व कांदा प्रतावरी यंत्रणा | |
| १८. | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, खडकेवाके, ता. रहाता, जि. अहमदनगर | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | १५० मे. टन |
| १९. | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, बीड, जि.बीड | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | रायपनींग चेंबर | ५ मे. टन |
| | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन. / ६ तास |
| | | पॅकहाउस | २००० स्क्वे. फुट |

| क्र. | निर्यात सुविधा केंद्र | तपशिल | क्षमता |
|---|---|---|---|
| २०. | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरूड, जि. अमरावती | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह | ५० मे. टन. |
| २१. | विकिरण सुविधा केंद्र, वाशी, नवि मुंबई | पॅकहाउस | २००० स्क्वे. फुट |
| | | शितगृह | ५० मे. टन. |
| | | विकिरण आंबा | ५ मे. टन प्रतितास |
| | | विकिरण तृणधान्ये व कडधान्ये | १० मे. टन प्रतितास |
| | | विकिरण मसाले | १.१ मे. टन प्रतितास |
| २२. | भाजीपाला सुविधा केंद्र, वाशी, नवि मुंबई | भाजीपाला ग्रेडींग लाईन्स | कारली, भेंडी, मिरची, वांगी व इतर भाजीपाला. |
| | | हॉट वॉटर ट्रिटमेन्ट | १ मे. टन प्रती तास |
| | | शितगृह | ५० मे. टन |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| २३. | आंबा, इतर फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, गोरेगाव, मुंबई | शितगृह | ३५ मे. टन |
| | | प्रशितकरण | ५ मे. टन. / ६ तास |
| | | हॉट वॉटर ट्रिटमेन्ट | २ मे. टन प्रती तास |
| | | हाताळणी यंत्रणा | ३ मे. टन / तास. |

# फळे व भाजीपाल्याकरिता मॉडर्न मार्केटिंग सुविधा

| क्र. | मॉडर्न मार्केटिंग | सुविधा |
|---|---|---|
| १. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, ठाणगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक | ■ कोल्ड स्टोरेज २५ मे.टन.<br>■ प्रिकुलिंग ५ मे. टन प्रतिबॅच<br>■ अँन्टीचेंबर, प्लँटरूम, ऑफिस, स्टोअर रूम<br>■ पॅक हाऊस एरिया : १५०० स्क्वे.फुट<br>■ लॅबोरेटरी |
| २. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, लोणी, ता. रहाता, जि.अहमदनगर | |
| ३. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, शिरपूर, जि. धुळे | |
| ४. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, यावल, जि. जळगाव | |
| ५. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, पालघर, जि. ठाणे | |
| ६. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, शेल पिंपळगाव, ता.खेड, जि. पुणे | |
| ७. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, मसूर, ता. कराड, जि. सातारा | |
| ८. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, म्हसवड, जि. सातारा | |
| ९. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, बार्शी, जि. सोलापूर | |
| १०. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, तळसंदे जि. कोल्हापूर | |
| ११. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, करमाड, जि. औरंगाबाद | |
| १२. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, घनसावंगी, जि. जालना | |
| १३. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, कळमनुरी, जि. हिंगोली | |
| १४. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, अर्धापूर, जि. नांदेड | |
| १५. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, माजलगाव, जि. अमरावती | |
| १६. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, चांदूररेल्वे, जि. अमरावती | |
| १७. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, देऊळगावराजा, जि. बुलढाणा | |
| १८. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, भिवापूर, जि. नागपूर | |
| १९. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, मोहाडी, ता. तुमसर, जि. भंडारा | |
| २०. | आधुनिक फळे व भाजिपाला सुविधा केंद्र, पुलगाव, जि. वर्धा | |

# फुले मॉडर्न मार्केटिंग सुविधा

| क्र. | निर्यात सुविधा केंद्र | तपशिल | क्षमता |
|---|---|---|---|
| १. | फुले निर्यात सुविधा, केंद्र, तळेगाव, जि. पुणे | प्रशितकरण (२) | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह (४) | २५ मे.टन X ४ = १०० मे.टन |
| २. | फुले निर्यात सुविधा केंद्र, सातारा, जि. सातारा | प्रशितकरण (२) | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह (४) | २५ मे. टन. X ४ = १०० मे.टन. |
| ३. | फुले निर्यात सुविधा केंद्र, दिंडोरी, जि. नाशिक | प्रशितकरण (२) | ५ मे. टन. / ६ तास |
| | | शितगृह (४) | २५ मे. टन X ४ = १०० मे. टन |

संपर्क :

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,**

प्लॉट नं. आर-७, मार्केट यार्ड, गुलटेकडी,
पुणे - ४११ ०३७.
दूरध्वनी - (०२०) २४५२८१००, २४५२८२००
Web. : www.msamb.com
पणन टोल फ्री क्रमांक : १८०० २३३ ०२४४

# पणन मंडळ अधिकारी वर्ग

१. श्री.मिलिंद आकरे,
कार्यकारी संचालक
मो.नं. ९३७१८१०००२
ई-मेल : md@msamb.com
genman@msamb.com

२. श्रीमती पुनम मेहता,
उपसरव्यवस्थापक (प्रशासन)
मो.नं. ९८२३३३८२४८
ई-मेल : dgmadmin@msamb.com

३. श्री.जितेंद्र कोळंबे,
उपसरव्यवस्थापक (वित्त व लेखा)
मो.नं. ९८५००६२९६३
ई-मेल : dgmfinance@msamb.com

४. श्री.ओ.व्ही. निला,
उपसरव्यवस्थापक (अभियांत्रिकी)
मो.नं. ८८८८८०४८९९
ई-मेल : dgmcivil@msamb.com

५. डॉ.पी.एस.सोनवणे,
उपसरव्यवस्थापक (बाजार समिती)
मो.नं. ९४२२०११७०७
ई-मेल : apmc@msamb.com

६. डॉ. भास्कर नारायण पाटील,
सहाय्यक सरव्यवस्थापक
(कृषि व्यापार विकास / जनसंपर्क व प्रसिध्दी)
मो.नं. ९४२३००४७९६
ई-मेल: domestic@msamb.com /
prp@msamb.com

७. श्री. महेंद्र लक्ष्मण लोखंडे,
सहाय्यक सरव्यवस्थापक, (संगणक)
मो.नं. ९८५०८८७८०३
ई-मेल : computer@msamb.com

८. श्री.एन.बी.पाटील,
सहाय्यक सरव्यवस्थापक (प्रकल्प)
मो.नं. ९४२३००७०४०
ई-मेल : project@msamb.com

९. श्री.एम.पी.पवार,
सहाय्यक सरव्यवस्थापक (बी.डी.पी-बाजार समिती)
मो.नं. ९८५०५०३३००
ई-मेल : apmcbdp@msamb.com

१०. श्री.डी.एम. साबळे,
सहाय्यक सरव्यवस्थापक (निर्यात)
मो.नं. ९४२३००६९२८
ई-मेल : export@msamb.com

११. श्रीमती स्वाती आण्णाराव तांभाळे,
विधी अधिकारी
मो.नं. ९७६७९६९८५९
ई-मेल : lawdept@msamb.com

१२. श्री. बाळासाहेब गंगाधर कातोरे,
व्यवस्थापक, (बाजार समिती)
मो.नं. ८८८८८८९८५३
ई-मेल : apmc@msamb.com

१३. श्री. एस.पी.बाजारे,
व्यवस्थापक (रा.कृ.वि.यो)
मो.नं. ९०४९९९६१२६
ई-मेल : rkvycell@msamb.com

१४. श्री. दत्तात्रय सुखदेव पाटील,
व्यवस्थापक (बीडीपी - बा.स.)
मो.नं. ९४२२५१००३७
ई-मेल : apmcbdp@msamb.com

१५. श्री.ए.ए.औताडे,
व्यवस्थापक (शे.ता.क.योजना)
मो.नं. ९४२२६१५०२१
ई-मेल : msp@msamb.com

१६. श्री.व्ही.व्ही.जगदाळे,
व्यवस्थापक (डेटाबेस)
मो.नं. ९४२२५२०९२३
ई-मेल : computer@msamb.com

१७.श्री.के.एल.फटांगरे,
व्यवस्थापक (हार्डवेअर - संगणक)
मो.नं. ८८०५५५५९३१
ई-मेल : computer@msamb.com

१८. श्री.जे.एम.कोकणे,
व्यवस्थापक (वित्त व लेखा),
मो.नं. ९४२३५७४१४५
ई-मेल : accounts@msamb.com

१९. श्री.पी.डी.टेकाळे,
प्र.व्यवस्थापक (प्रशासन)
मो.नं. ९९६०६२७१३०
ई-मेल : admin@msamb.com

# पणन मंडळाचे विभागीय अधिकारी

१) विभागीय कार्यालय, नागपूर
श्री.एस.डी. घोडके, उपसरव्यवस्थापक,
मो.नं. ९४२३४३०१४५
ई -मेल : divnag@msamb.com

२) विभागीय कार्यालय, लातूर
श्री.एम.डी.बरडे, उपसरव्यवस्थापक
मो.नं. ८३९०६१५०१५
ई -मेल : divltr@msamb.com

३) विभागीय कार्यालय, औरंगाबाद
श्री.मंगेश बाबासाहेब सुरवसे, उपसरव्यवस्थापक
मो. नं. ८४८३०२०६५९
ई -मेल : divabad@msamb.com

४) विभागीय कार्यालय, कोल्हापूर
श्री.सुभाष एस.घुले, उपसरव्यवस्थापक
मो. नं. ९४२२०८०९४४
ई -मेल : divkol@msamb.com

५) विभागीय कार्यालय, पुणे
श्री.डी.डी.देशमुख, उपसरव्यवस्थापक
मो. नं. ९४२३५६७१६९
ई -मेल : divpun@msamb.com

६) विभागीय कार्यालय, रत्नागिरी
श्रीमती पर्णिता धोंडीराम बुरांडे, उपसरव्यवस्थापक
मो.नं. ८८८२७४८५५
ई -मेल : divrtn@msamb.com

७) विभागीय कार्यालय, अमरावती
श्री.ए.जे.विरकर, उपसरव्यवस्थापक
मो.नं. ९८६०९६७५५१
ई -मेल : divawati@msamb.com

८) विभागीय कार्यालय, नाशिक
श्री.चंद्रशेखर एम. बारी, उपसरव्यवस्थापक
मो. नं. ७५८८५५१७२४
ई -मेल : divnsk@msamb.com

९) व्ही.एच.टी., वाशी, नवी मुंबई
श्री.अभिमन्यू माने, (HDO)
मो. नं. ७५८८०२३७३२
ई -मेल : vht@msamb.com

१०) विकीरण सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई
श्री.मंगेश कदम (एंटॉकॉलॉजिस्ट)
मो. नं. ७५८८०२२२०१
ई -मेल : ifc@msamb.com

# जिल्हा पणन अधिकारी

| अ.क्रं | वि. कार्या. | जिल्हा कार्यालय | नाव | मोबाईल क्र. | Email |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पुणे | पुणे | श्री. ए. जे. कुदळे | 9422234653 | damo_pune@msamb.com |
| | | सोलापूर | श्री.एस. डी. वाघमोडे | 9850228586 | Damo_solapur@msamb.com |
| | | अहमदनगर | श्री. जे.जे.जाधव | 9049996123 | damo_ahmednagar@msamb.com |
| 2. | कोल्हापूर | कोल्हापूर | श्री. ए. जे. पवार | 9730578949 | damo_kolhapur@msamb.com |
| | | सांगली | श्री. टी. एस. नांगरे | 9423566776 | damo_sangali@msamb.com |
| | | सातारा | श्री.ए.बी.हेशी | 9850011470 | damo_satara@msamb.com |
| 3. | रत्नागिरी | ठाणे/रायगड/पालघर | श्री.एम.डी.गंभिरराव | 8879465453 | damo_thane@msamb.com |
| | | रत्नागिरी/ सिंधुदूर्ग | श्री. एम. के. फळे | 9850408683 | damo_ratanagari@msamb.com |
| 4. | नाशिक | नाशिक | श्री. जे.बी. जगताप | 8698765975 | damo_nashik@msamb.com |
| | | धुळे | श्री. एस. एस. पाटील | 9823127147 | damo_dhule@msamb.com |
| | | नंदुरबार | श्री.एस.एस.सोनावणे | 9420696978 | damo_nandurbar@msamb.com |
| | | जळगाव | श्री. जे. एन. शिंदे | 9823264569 | damo_jalgaon@msamb.com |
| 5. | औरंगाबाद | औरंगाबाद | श्री. जी. सी. वाघ | 9422346971 | damo_aurangabad@msamb.com |
| | | जालना | श्री. ए. के. नादरे | 9960841348 | damo_jalana@msamb.com |
| | | बीड | श्री. एस. एस. जाधव | 9822269598 | damo_beed@msamb.com |
| 6. | लातूर | हिंगोली | श्री.जे.बी.राखोंडे | 9860393134 | damo_hingoli@msamb.com |
| | | परभणी | श्री. जे. बी. राखोंडे | 9860393134 | damo_parbhani@msamb.com |
| | | लातूर | श्री. एस. टी. शेळके | 9422466089 | damo_latur@msamb.com |
| | | उस्मानाबाद | श्री. जी. डी. पाटील | 9822022809 | damo_osmanabad@msamb.com |
| | | नांदेड | श्री.एफएफ. सिद्दीकी | 9421086086 | damo_nanded@msamb.com |
| 7. | अमरावती | अमरावती | श्री. ए. जे. वीरकर | 9860967551 | damo_amrawati@msamb.com |
| | | बुलढाणा | श्री. आर.के.जुनघरे | 9922796908 | damo_buldhana@msamb.com |
| | | यवतमाळ | श्री.डी.एम.डागा | 9850423244 | damo_Yeotmal@msamb.com |
| | | अकोला/ वाशिम | श्री.ए.पी.पाटील | 7588021705 | damo_washim@msamb.com |
| 8. | नागपूर | नागपूर | श्री. एस. पी. काळे | 9423520077 | damo_nagpur@msamb.com |
| | | वर्धा | श्री.बी.सी.देशमुख | 9423006926 | damo_wardha@msamb.com |
| | | भंडारा / गोंदिया | रिक्त | | damo_bhandara@msamb.com |
| | | गडचिरोली | श्री. एस. पी. काळे | 9423520077 | damo_gadchiroli@msamb.com |
| | | चंद्रपूर | श्री. एस. एस. गवळे | 9405973734 | damo_chandrapur@msamb.com |

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था



- पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम
- तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम
- इंडो–डच कृती आराखडयातंर्गत फुले गुणवत्ता केंद्र प्रकल्प

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे अधिनस्त राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटरची स्थापना तळेगांव दाभाडे, जिल्हा पुणे या ठिकाणी देशातील पुष्प व्यवसायात दिशा देण्याकरिता सन २००२ मध्ये नेदरलॅण्ड सरकारच्या प्रॅक्टीकल ट्रेनिंग सेंटर यांच्या तांत्रिक व FMO च्या आर्थिक सहाय्याने उभारणी. जागतिक बाजारपेठेच्या दृष्टीकोनातुन फुले, फळे व भाजीपाला पिकांचे उत्पादन मुल्यवर्धीत तंत्रज्ञान, पीक उत्पादकता वाढविणे यांचे उच्च तंत्रज्ञान प्रसारित करणे हे संस्थेचे मुख्य ध्येय असुन प्रात्यक्षिकातुन प्रशिक्षण या संकल्पनेतुन राज्यातील तसेच देशाच्या अन्य राज्यातील व परिसरातील अदयाप पर्यंत ३५००० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण दिलेले आहे.

**सुविधा :**

प्रशिक्षणासाठी लागणा-या सर्व पायाभुत सुविधा जसे विविध प्रकारची हरितगृहे, यंत्रसामुग्री, सुसज्ज प्रयोगशाळा, अत्याधुनिक प्लान्ट टिश्यु कल्चर लॅब, दृकश्राव्य सुविधा असलेले भव्य क्लासरुम, आणि राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय प्रकाशकांच्या कृषिविषयक ग्रंथसंपदेने सज्ज असलेले उत्तम ग्रंथालय सुविधा येथे येणा-या प्रत्येक प्रशिक्षाणार्थीसाठी उपलब्ध आहेत. हवामान केंद्र, माती पाणी परिक्षण प्रयोगशाळा, टोमॅटीक फर्टीगेशन सिस्टीम, प्री कुलींग तसेच कोल्ड स्टोअरेज आणि ग्रेडींग पॅकेजींग यंत्रणा येथे उपलब्ध आहेत.

**संस्थेमधे घेण्यात येणारे विविध ५ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम :**

१. हरितगृह व्यवस्थापन
२. भाजीपाला व फुलपिकांची खुल्या क्षेत्रावरील लागवड
३. रोपांची अभिवृद्धी व रोपवाटीका व्यवस्थापन
४. पिक निहाय अभ्यासक्रम (गुलाब, जरबेरा, कार्नेशन, अन्थ्युरिअम, आर्किड व भाजीपाला लागवड
५. पणन व्यवस्थापन (फळे, फुले व भाजीपाला)
६. लॅन्डस्केपिंग
७. ऊती संवर्धन
८. सेंद्रीय शेती

**तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम :**

१. फळे, फुले व भाजीपाला पिकांचे सुगी पश्चात हाताळणी
२. पुरवठा साखळी व्यवस्थापन
३. पब्लिक प्रायवेट पार्टनरशीप इन ग्रीकल्चर मार्केटिंग
४. शीत साखळी व्यवस्थापन
५. ड्राय फ्लॉवर्स आणि प्लान्ट पार्टस
६. फ्लॉवर रेंजमेंट व डेकोरेशन
७. रोपवाटीका नियमन व प्रमाणीकरण
८. ग्लोबल गॅप

**एक महिन्याचे प्रशिक्षण कार्यक्रम :** उद्योजकता विकास कार्यक्रम तसेच आवश्यक्तेप्रमाणे ऑनसाईट प्रशिक्षण देण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.

**इंडो-डच कृती आराखडयातंर्गत फुले गुणवत्ता केंद्र प्रकल्प :**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, जि. पुणे या संस्थेची फुले गुणवत्ता केंद्र उभारणीसाठी निवड करण्यात आलेली आहे. सदरील रक्कम रू.९४७.३० लाख किंमतीच्या या प्रकल्पास केंद्र शासन व राज्यशासन यांची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्पाच्या उभारणीसाठी नेदरलॅण्ड (डच) सरकारकडील पम एक्सपर्टस् (PUM EXPERTS) यांचे तांत्रिक सहाय्य मिळणार आहे. सदर प्रकल्पाचा कालावधी तीन वर्षाचा असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, नवी दिल्ली अंतर्गत महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे, नेदरलॅण्डस दूतावास, नवी दिल्ली, पम एक्सपर्टस् (PUM Experts), व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, जि. पुणे या संस्थांचा समावेश आहे. सदर

प्रकल्पास एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, नवी दिल्ली यांचेकडून रू. ६०४.०१ लाख आर्थिक सहाय्य प्राप्त होणार असून रू. १४८.५० लाख महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे, यांचेकडून मनुष्यबळ विकास घटकांतर्गत उपलब्ध होणार आहेत. या प्रकल्पामध्ये पायाभूत सुविधा अंतर्गत डच तंत्रज्ञानावर आधारीत हरीतगृह, स्वंयचलित उपकरणे, आधुनिक पिक पद्धती आदी आधुनिक बाबींचा वापर करून प्रति स्केअर मीटर फुलांच्या उत्पादनात वाढ करण्यात येणार आहे. तसेच या तंत्रज्ञानाचा राज्यभर प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रसार करण्यात येणार आहे.

### सदर प्रकल्पाची उद्दिष्टे :

अ) किफायत खर्चामध्ये प्रमुख फुलझाडांची उत्पादकता वाढविणे.

ब) हरीतगृहामध्ये उच्च तंत्रज्ञानाधारीत फुलपिकांच्या लागवडीसंदर्भात खालीलप्रमाणे प्रात्याक्षिक आयोजित करणे.

- विविध प्रकारची फुलपिके व त्यांच्या विविध जातींची लागवड.
- स्वंयचलीत पध्दतीने पाणी व खते यांचा कार्यक्षम वापर.
- आदर्श कृषि पध्दतीचा अवलंब.

क) शेतकरी व शेतकरी समूह (cluster), कृषि व संलग्न विभागाचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था व खाजगी उद्योजक यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे.

ड) काढणी पश्चात होणारे नुकसान कमी करणे.

इ) एकात्मिक किड व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर करणे.

फ) शेतकरी व शेतकरी समूह (Cluster), अधिकारी, व व्यावसायिक यांची फुले गुणवत्ता केंद्राशी साखळी विकसित करणे.

### संपर्क :

श्री. संजय पारडे,
प्राचार्य,
राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था
सर्व्हे नं. ३९८-४००, पुणे मुंबई हायवे, सी.आर.पी.एफ. शेजारी,
तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे ४१०५०७
ईमेल : htc_td@yahoo.co.in
फोन नं. - ०२११४ - २२३९८०
मो.नं. - ९४२३०१५०९६
फॅक्स - ०२११४ - २२६०८७





# पद्व्यूत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय

## • एम.बी.ए. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन)

# पद्व्यूत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय

## M.B.A. (Agri. Business Management)

- महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद (MCAER) मान्यताप्राप्त व महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी शी संलग्न (Affiliation)
- विना अनुदानित तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१३ –१४ पासुन सुरूवात
- **प्रवेश क्षमता** : ३० विद्यार्थी, पात्रता – कृषि व तत्सम शास्त्र विषयाची पदवी
- **प्रवेश पद्धत** : महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी घेतलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीय पद्धतीने.

प्रगती

- शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये ३० व २०१४–१५ मध्ये ३० असे एकूण ६० प्रवेशित
- चालू वर्षी पहिल्या बॅचने अभ्यासक्रम पूर्ण केला असून एकूण उत्तीर्ण झालेल्या २९ विद्यार्थी पैकी ३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तसेच २६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झालेले आहेत.
- महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेल अंतर्गत एकूण २७ विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यामध्ये चांगल्या वेतनावर प्लेसमेंट करण्यात आले आहे.

संपर्क :

डॉ. भास्कर ना. पाटील,
प्राचार्य,
पद्व्यूत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय
द्वारा. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था
सर्व्हे नं. ३९८–४००, पुणे मुंबई हायवे, सी.आर.पी.एफ. शेजारी,
तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे ४१०५०७
ईमेल – cabmt2013@gmail.com
मो.नं. – ९४२३००४७९६.



पद्व्यूत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना ना. चंद्रकांत (दादा) पाटील व इतर छायाचित्रात महाविद्यालयातील परिसर.





# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प



- बाजारपेठेत मागणी असलेल्या शेतमालाचे उत्पादन घेणे
- जिल्ह्यांचा पणन आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे
- कृषी व्यवसाय प्रोत्साहन यंत्रणा
- बाजार माहिती सेवा
- शेतकऱ्यांचा बाजारपेठेतील सहभाग वाढविणे
- बाजार समित्यांचे आधुनिकीकरण करणे
- शेतकरी सामुहिक सेवा केंद्राच्या माध्यमातून शेतमालाचे एकत्रीकरण
- शेतमाल साठवणूक व धान्य तारण कर्ज
- आठवडी  बाजार
- इ-ट्रेडींग प्लॅटफॉर्म सुरु करणे

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प

## १. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश :

प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतीची उत्पादन क्षमता वाढविणे, शेतमालास किफायतशीर भाव मिळवून देणे व बाजारपेठांमध्ये नविन सुविधा निर्माण करुन शेतकऱ्यांचा सहभाग हा आहे.

## २. प्रकल्पाचा केंद्रबिंदू :

या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणारे अत्यंत कमी उपक्रम आहेत. तथापि प्रकल्पातील सर्वच उपक्रम शेती सुधारणा, बाजारपेठांमध्ये सुधारणा, शेतकऱ्यांना संघटित करण्यासाठी शेतकरी गटांची व शेतकऱ्यांच्या संस्थांची निर्मिती करणे यादृष्टीने असल्याने साहजिकच प्रकल्पाचा केंद्रबिंदू शेतकरी आहे. तसेच प्रकल्पातील सर्व कामे ही शेती सुधारणा व बाजारपेठांमध्ये सुधारणा या बाबींशी संबंधित असल्याने अप्रत्यक्षरित्या शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

## ३. प्रकल्पाची वैशिष्टे :

### अ. प्रकल्प अंमलबजावणी कार्यपध्दती :

या प्रकल्पातून बाजारपेठांमध्ये करावयाच्या सुधारणा व अन्य कामे ही संबंधीत गावातील किंवा गाव समुहातील लोकांच्या मागणीवर आधारीत असतील. आठवडी बाजार, बाजार समित्या, जनावरांचे बाजार, शेतकरी सामुहिक सेवा केंद्र यामध्ये बांधकामे करीत असतांना लोकांना कोणत्या सुविधा आवश्यक आहेत याबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेतले जातील. म्हणजेच सर्वसामान्य लोक व बाजारांमध्ये सहभागी होणारे अन्य घटक यांच्या मागणीचा यामध्ये निश्चित विचार केला जाईल. तसेच प्रकल्पातील सर्वच उपक्रमांमध्ये अन्य घटकांसोबतच अल्प व अत्यल्पभूधारक, महिला, मागासवर्गीय जाती जमाती इ. घटकांचा सहभाग घेतला जाईल.

### ब. खाजगी क्षेत्राचा सहभाग :

शेतमालास किफायतशीर भाव मिळण्यासाठी बाजारपेठांमध्ये स्पर्धात्मक परिस्थिती निर्माण होणे आवश्यक असून त्यादृष्टीने विविध उपक्रम राबविले जातील. शेती, पशुसंवर्धन व फलोत्पादन क्षेत्रांमध्ये खाजगी क्षेत्रास प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. प्रकल्पातून देखील खाजगी उद्योजक, खाजगी संस्था, कंपन्या यांचा सहभाग वाढावा यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

### क. टप्पा निहाय प्रकल्पाची अंमलबजावणी :

प्रकल्प अंमलबजावणीचा आराखडा तयार करीत असतांना प्रकल्पाचा कालावधी सहा वर्षाचा ठरविण्यात आला. तसेच प्रकल्प अंमलबजावणी तीन टप्प्यात केली जात असून प्रत्येक टप्प्यासाठी दोन वर्षे कालावधी होता. पहिल्या टप्प्यात १० जिल्हे दुसऱ्या टप्प्यात ११ जिल्हे व तिसऱ्या टप्प्यात १२ जिल्ह्यांचा समावेश आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी जानेवारी २०११ पासून सुरु असून सध्या सर्व ३३ जिल्ह्यांमध्ये बहुतेक उपक्रम प्रगतीपथावर आहेत.

## ४. प्रकल्पामधील प्रमुख घटक:

**बाजारपेठेत मागणी असलेल्या शेतमालाचे उत्पादन घेणे :**

- नविन तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे:
- बाजारात मागणी आहे अशी पीके तसेच फळे व भाजीपाल्यांचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना आत्मा मार्फत मार्गदर्शन करणे
- शासकिय अधिकारी, शेतकरी यांची क्षमता बांधणी करण्यासाठी विविध कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- प्रकल्पामध्ये शेतकरी, शेतीवर आधारीत उद्योग व्यवसाय करणारे लोक यांना योग्य ते मार्गदर्शन होवून राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात उलाढाल वाढावी यासाठी कृषी व्यवसाय प्रोत्साहन यंत्रणा निर्माण केली आहे. या यंत्रणेमार्फत शेती व शेतीपूरक व्यवसायांसंबंधी अभ्यास करणे, नविन प्रस्ताव तयार करणे, बँकाना सादर करावयाचे प्रस्ताव तयार करणे इ. कामे केली जात आहेत.

**जिल्ह्यांचा पणन आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे :**

- प्रत्येक जिल्ह्याचा संशोधन व विस्तार कार्य आराखडा (SREP) शासनाने तयार केलेला असून त्यामध्ये संबंधीत जिल्ह्यातील पीके, भाजीपाला, फळे, पशुधन इ.

बाबतच्या उत्पादनाची माहिती समाविष्ट आहे. त्याचा उपयोग जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करुन शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी होईल.

- प्रकल्पाच्या दृष्टीने आवश्यक पणन आराखडा (MSS) तयार करणेसाठी आत्माच्या मार्गदर्शनाखाली टिम तयार करुन जिल्ह्याची भौगोलिक स्थितीनुसार विभागणी करुन माहिती जमा केली जाईल. या आराखड्याचा उपयोग जिल्ह्यांमध्ये कृषी विषयक उपक्रम राबविण्यासाठी होईल.

**कृषी व्यवसाय प्रोत्साहन यंत्रणा (Agri Business Promotion Facility - ABPF)**

प्रकल्पांतर्गत ही एक स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असून यांचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे. सर्वच जिल्ह्यांमध्ये कृषी व कृषी पूरक व्यवसायांची वाढ व्हावी या उद्देशाने ही यंत्रणा काम करीत आहे. आवश्यकतेनुसार राज्यातील अन्य विभागांमध्ये या यंत्रणेच्या शाखा सुरु केल्या जातील. या यंत्रणेमार्फत शेतमाल विक्रीसंबंधीचे माहितीचे संकलन करणे, विशिष्ट विषयांवर संशोधनपर अभ्यास हाती घेणे व शेती व पूरक व्यवसाय वृध्दीसाठी आवश्यक ते सर्व सहाय्य करणे यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. यंत्रणेच्या कामाचे स्वरुप साधारणपणे खालीलप्रमाणे आहे.

- शेतीसाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे यासाठी शासन धोरणांचे मुल्यांकनाचे काम हाती घेणे, व आवश्यक ते बदल व सुधारणा सुचविणे.
- शेतमाल विक्री संबंधी अभ्यास, बाजारभाव ठरविण्याच्या प्रक्रियेचे मुल्यमापन आणि दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागांशी संबंधीत अभ्यास करणे.
- शेती व शेती पूरक व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु व्हावेत यासाठी शेतकरी गट, शेतकऱ्यांच्या संस्था, खाजगी उद्योजक यांना बँकांकडून सहाय्य मिळण्यासाठी प्रयत्न करणे.
- खाजगी संस्था, विविध कंपन्या यांचा सहभाग वाढावा यासाठी त्यांची क्षमता बांधणी करणे. त्यादृष्टीने गरजेनुसार कार्यशाळा, परिसंवाद इ. कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- प्रकल्पांतर्गत सहभागी शेतकरी, छोटे उद्योजक, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक संघांना शेतमाल विक्रीच्या दृष्टीने तांत्रिक सहाय्य उपलब्ध करणे.

**बाजार माहिती सेवा :**

शेतकऱ्यांना शेती व शेतीशी संबंधीत बाबींची माहिती व्हावी यासाठी खालील सुविधा निर्माण करुन देणे आवश्यक असून यापैकी बहुतेक कामांची सुरुवात झाली आहे.

- प्रकल्पाचे स्वतंत्र संकेतस्थळ (वेबसाईट) तयार करणे.
- इ-ट्रेडिंग पध्दतीने बाजार समित्यांमध्ये येणाऱ्या शेतमालाची विक्री करणे तसेच अन्य बाजार समित्यांमध्येदेखील शेतमालाची विक्री व्हावी यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून बाजार समित्या जोडणे.
- बाजार समित्यांमध्ये डिसप्ले बोर्ड/ एलसीडी- टीव्ही / अन्य माध्यमातून शेतमालाची आवक, शेतमालाच्या दैनंदिन किंमती इ. बाबतची माहिती उपलब्ध करुन देणे.
- मोबाईल एसएमएस द्वारे शेतकऱ्यांना बाजारभाव, हवामान इ. बाबतचे तांत्रिक मार्गदर्शन करणे, जेणेकरुन त्यांचा शेतमाल योग्य त्या भावामध्ये विक्री करण्यास मदत होईल. तसेच खतांचा व किटकनाशकांचा वापर, सुगी पश्चात करावयाची कामे इ. माहिती उपलब्ध होऊ शकेल.

**पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून राबविले जाणारे प्रकल्पातील उपक्रम**

- राज्यातील निवडक जिल्ह्यांमध्ये शेळी मेंढी पालक शेतकऱ्यांचे गट तयार करणे व अशा गटांना एकत्र करुन तालुका/ जिल्हा स्तरावर फेडरेशनची स्थापना करणे.
- प्रकल्पांतर्गत निवडलेल्या जनावरांच्या बाजारांच्या कार्यक्षेत्रामध्ये जनावरांची शिबीरे घेवून प्रथमोपचार, रोगराई प्रतिबंध, जादा उत्पादन देणाऱ्या चा-याची लागवड इ. बाबत माहिती देणे, तसेच जनावरांच्या व शेळ्या-मेंढ्यांच्या विक्रीसाठी मार्गदर्शन करणे.
- शेळी पालन हा एक फायदेशीर व्यवसाय असून त्यादृष्टीने शेतकऱ्यांचे गट स्थापन करणे तसेच शेळीपालन प्रात्यक्षिकांची उभारणी करुन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे. या उपक्रमातून जास्तीतजास्त शेतकरी शेळीपालनाकडे वळतील अशी अपेक्षा आहे.

**शेतकऱ्यांचा बाजारपेठेतील सहभाग वाढविणे :**

- गावागावात शेतकऱ्यांचे गट स्थापन करणे व अशा गटांना एकत्र करुन शेतकऱ्यांच्या संस्था स्थापन करण्याचे महत्वाचे काम या प्रकल्पातून केले जात आहे. चार-पाच गावातील २०-२५ गटांचा गाव समुह स्तरावर (क्लस्टर) एकत्र करुन एकूण ४००

संस्था स्थापन केल्या जातील व या संस्थांची नोंदणी कंपनी कायद्यांतर्गत करण्यात येईल. अशा संस्थांमार्फत शेतमालाचे एकत्रीकरण, काढणी पश्चात प्रक्रिया व विक्री यासाठी प्रकल्पामधून शेतकरी सामुहिक सेवा केंद्रे सुरु करण्यासाठी सहाय्य उपलब्ध करुन दिले जाईल. शेतकऱ्यांच्या संस्थांमार्फत त्यांच्या गरजांवर आधारित व शेतमालावर आधारित कोणत्या सोई सुविधा आवश्यक आहेत याबाबतचा प्रस्ताव प्रकल्पास प्राप्त झाल्यानंतर त्याची पडताळणी करुन सहाय्य करण्यात येईल. अशा प्रकारची सुविधा गाव स्तरावर निर्माणझाल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची स्वच्छता, वर्गवारी या सारखी प्राथमिक प्रक्रिया करुन माल विक्रीसाठी पाठविण्यासाठी मदत होईल. यादृष्टीने शेतकऱ्यांचे गट स्थापन करणे व स्थापन केलेल्या गटांना एकत्र करुन त्यांच्या संस्था निर्माण करण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थांच्या नेमणूक केली जाते. सध्या हे काम सर्व जिल्ह्यांमध्ये प्रगतीपथावर आहे.

- दरवर्षी सुगीनंतर तीन-चार महिन्यांनी बाजारपेठेमध्ये शेतमालाचा भाव वाढतो असा नेहमीचा अनुभव आहे. या वाढीव दराचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा यासाठी राज्यातील वखार महामंडळाच्या निवडक गोदामांमध्ये सुविधा निर्माण केल्या जातील. याशिवाय प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी देखील सहाय्य केले जाते. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा दर्जा व त्यामध्ये असलेल्या ओलाव्याचे प्रमाण समजण्यास मदत होते. प्रकल्पांतर्गत स्थापन केलेल्या शेतकरी गटांच्या माध्यमातून गोदामांमध्ये शेतकऱ्याचा शेतमाल साठवणूकीस चालना देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमाल साठवणूकीस व धान्य तारण कर्ज योजनेस मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. वखार महामंडळाचा काही राष्ट्रीयीकृत बँकांशी यादृष्टीने समन्वय असून शेतकऱ्यांनी साठवणूक केलेल्या शेतमालाच्या किंमतीच्या ७५% पर्यंतची रक्कम शेतकऱ्यांना अल्पव्याज दराने कर्ज उपलब्ध केले जाते. शेतकरी या योजनेचा फायदा घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत असा अनुभव आहे.
- राज्यामध्ये एकूण ३५०० आठवडी बाजार असून त्यापैकी ४०० बाजारांची निवड या प्रकल्पामध्ये केली आहे. या बाजारांमध्ये प्राथमिक सुविधा निर्माण करुन दिल्या जातात. सध्या अशा बाजारातून कोणत्याही प्रकारच्या सोई-सुविधा नाहीत. प्रकल्पांतर्गत बाजारामध्ये अंतर्गत रस्ते, ओटे, स्वच्छतागृह इ. आवश्यक सुविधा निर्माण केल्या जातात. प्रकल्पाच्या माध्यमातून पहिल्यांदा किमान काही सुविधा निर्माण करुन देण्याचा प्रयत्न होत आहे. या सुविधांमुळे विक्रेते व ग्राहक यांच्यासाठी किमान काही सोई उपलब्ध होतील तसेच ग्रामपंचायतींचे वार्षिक उत्पन्न बाजारओट्यांच्या लिलावातून वाढण्यासाठी मदत होणार आहे.
- शेतकऱ्यांनी शेतमाल वाहनांने बाजार समितीमध्ये न नेता केवळ एक-दोन किलो नमूना नेल्यास ई-ट्रेडींग पध्दतीने विक्री केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचा वाहतूक, बाजार समिती फी इ. खर्च वाचतो, तसेच स्पर्धात्मक पध्दतीमुळे शेतमालास वाढीव भाव मिळण्यास मदत होते. त्यासाठी कर्नाटक राज्याच्या धर्तीवर ही सुविधा निर्माण करुन दिली जाते. याशिवाय बाजार समित्यांमध्ये काही निवडक सुविधा निर्माण केल्या जात आहेत.

**बाजार समित्यांचे आधुनिकीकरण करणे.**

- शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल विक्रीसाठी जवळच्या बाजार समितीमध्ये न्यावा लागतो व हे एकमेव माध्यम आहे. राज्यामध्ये ३०५ पेक्षा अधिक बाजार समित्या असून त्यापैकी या प्रकल्पामध्ये १०० बाजार समित्या निवडल्या जातील. या बाजार समित्यांमध्ये काही धोरणात्मक बदल व्हावेत, त्यांच्या कामकाजात सुधारणा व्हावी व शेतकऱ्याच्या मालासाठी योग्य भाव मिळावा यासाठी तसेच काही प्राथमिक व उत्पादक सुविधा निर्माण करुन दिल्या जातात. त्यामध्ये गोदामांचे बांधकाम, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, शेतमाल आवक नोंद, सर्व बाजार समित्यांची सारखी हिशोब पध्दती यासारख्या बाबींचा समावेश आहे.
- राज्यातील २० जनावरांचे बाजार व ४ शेळ्या-मेंढ्यांचे बाजारामध्ये देखील किमान आवश्यक सुविधा निर्माण करुन पशुपालकांना त्यांच्या जनावरांना योग्य किंमत मिळेल यासाठी प्रयत्न केले जातात. सध्या बहुतांश बाजारांमध्ये कोणत्याही सुविधा नाहीत असे चित्र आहे. त्यादृष्टीने बाजार आवारात झाडांची लागवड करणे, जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेळ्या-मेंढ्यांची विक्री वजनावर व्हावी यासाठी वजनकाटा, दुभत्या जनावरांची विक्री दुधाच्या प्रमाणावर व्हावी यासाठी दूध काढण्यासाठी स्वतंत्र शेड, जनावरांना वाहनांमध्ये चढविणे व उतरविणे यासाठी रॅम्प्स इ. किमान सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून होत आहे.

**शेतकरी सामुहिक सेवा केंद्राच्या माध्यमातून शेतमालाचे एकत्रीकरण**

शेतमालाची साठवणूक, स्वच्छता, प्रतवारी करणेसाठीच्या कोणत्याच सुविधा गाव पातळीवर उपलब्ध नाहीत. त्यामुळे बहुतेक शेतकऱ्यांच्या मालाची विक्री शेतावरच केली जाते. स्थानिक व्यापारी खरेदी करतात, मालाची स्वच्छता, प्रतवारी करतात व मोठ्या प्रमाणात फायदा घेऊन विक्री करतात, अशी परिस्थिती आहे. ज्या शेतकऱ्यांचे उत्पादन जास्त आहे, ते जवळच्या बाजार समितीमध्ये विक्री करतात. बाजार समितीमध्ये त्या दिवशी जो भाव असेल त्या भावात विकावा लागतो. आपणच उत्पादित केलेल्या मालाचा भाव ठरविण्याचा कोणताही अधिकार शेतकऱ्यास नाही. जे अल्प व अत्यल्प भूधारक आहेत, त्याना आपला माल बाजार समितीमध्ये नेणेदेखील परवडत नाही, त्यामुळे त्यांना शेतावरच विकावा लागतो. राज्यातील बहुतांश शेती पावसावरच अवलंबून असल्याने दरवर्षी जमीन पिकेल याची देखील खात्री नसते. त्यामुळे अशा प्रकार दुहेरी कात्रीत शेतकरी सापडला आहे.

या परिस्थितीमध्ये प्रकल्पातून गाव स्तरावर किमान काही सुविधा शेतकरी सामुहिक सेवा केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रकल्पातून प्रत्येक जिल्ह्यात शेतमालावर आधारित (धान्ये- तेलबिया व फळे-भाजीपाला) अनुक्रमे २०० याप्रमाणे सुमारे ४०० शेतकरी गट स्थापन केले जात आहेत. या गटांना एकत्र करुन २० ते २५ गटांसाठी एक कंपनी याप्रमाणे जिल्ह्यात १२ ते १४ शेतकऱ्यांच्या कंपन्या स्थापन होतील. या कंपन्यांनी किमान १० गुंठे जागा उपलब्ध करुन दिल्यास या जागेवर शेतकरी सामुहिक सेवा केंद्र सुरु करण्यासाठीचे आर्थिक सहाय्य प्रकल्पातून केले जाते. जागेशिवाय प्रकल्प खर्चाच्या मर्यादित २५% पर्यंतची रक्कम गुंतविण्याची क्षमता देखील या कंपनीमध्ये असणे आवश्यक आहे. या केंद्रामध्ये शेतमालाची स्वच्छता, प्रतवारी व साठवणूक यासारख्या सुविधा निर्माण करुन दिल्या जातील.

**शेतमाल साठवणूक व धान्य तारण कर्ज**

राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची गोदामे असून त्यामधून शेतमाल (मुख्यत: धान्य) मोठ्या प्रमाणात साठवणूक केला जातो. याचबरोबर साठवणूक केलेल्या शेतमालाच्या किंमतीच्या ७०% ते ७५% रक्कम अल्प मुदतीचे कर्ज बँकांकडून दिले जाते. सुगीच्या वेळी शेतकऱ्यांकडे जेव्हा शेतमाल उपलब्ध होतो, त्यावेळी बाजारामध्ये भाव पडलेले असतात, व्यापारी शेतकऱ्यांकडून माल घेऊन त्याची स्वच्छता, वर्गवारी करतात, साठवणूक करतात व बाजारामध्ये जेव्हा भाव वाढतात, त्यावेळी विक्री करतात. त्यामुळे साहजिकच व्यापाऱ्यांना वाढीव भावाचा मोठ्या प्रमाणात लाभ होतो असे चित्र आहे. वखार महामंडळाच्या गोदामांमधून शेतकऱ्यांनी शेतमालाची साठवणूक केल्यास धान्य तारण कर्ज योजनेसह वाढीव भावाचा लाभ देखील शेतकऱ्यांना घेता येईल.

प्रकल्पामधून वखार महामंडळाच्या एकंदर ११२ गोदामांची निवड केली असून धान्य प्रत तपासणी प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक स्पॉट एक्स्चेंजच्या माध्यमातून शेतमालाची विक्री साठी प्रोत्साहन यासारख्या सुविधा निर्माण केल्या आहेत. जिल्ह्यातील कृषी विभागाशी संबंधीत आत्मा संस्थेमार्फत शेतकऱ्यांच्या व शेतकरी गटांच्या माध्यमातून शेतमालाची साठवणूक व्हावी यादृष्टीने प्रयत्न केले जात असून शेतकरी मोठ्या प्रमाणात पुढे येतांना दिसत आहेत.

**आठवडी बाजार** :

राज्यात एकूण ३५०० आठवडी बाजार असून बहुतांश आठवडी बाजारामध्ये कोणत्याही प्रकारच्या सोई- सुविधा उपलब्ध नाहीत, त्यामुळे ग्राहकांना रस्त्यावर विकला जाणारा, अस्वच्छ वातावरणातील माल खरेदी करावा लागतो. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह यासारख्या प्राथमिक सुविधा देखील नाहीत, त्यामुळे बाजारात येणाऱ्या सर्वांनाच व विशेषत: महिलांना गैरसोईंना तोंड द्यावे लागते. आठवडी बाजारांचे व्यवस्थापन स्थानिक ग्रामपंचायतीकडे असते. या बाजाराच्या लिलावातून दरवर्षी ग्रामपंचायतींना लाखो रुपये मिळतात, तथापि या बाजारांच्या देखभाल, स्वच्छता व अन्य व्यवस्थापन याकडे ग्रामपंचायती गांभिर्याने पाहात नाहीत. तसेच या बाजारांच्या देखभालीसाठी पुरेशी रक्कम खर्च करण्याची देखील ग्रामपंचायतीची तयारी दिसून येत नाही.

प्रकल्पामध्ये राज्यातील सुमारे ४०० आठवडी बाजारांची काही निकषांवर आधारित निवड केली असून या बाजारातून काही सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. अंतर्गत रस्ते, ओटे, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, झाडांची लागवड, आवश्यकतेनुसार वीजजोडणी यासारख्या सुविधा निर्माण करुन दिल्या जातात. यामुळे

साहजिकच काही प्रमाणात बाजारातील उलाढाल वाढण्यास व शहरी ग्राहकांचा सहभाग वाढण्यास होणार आहे. या सुविधा निर्माण केल्यानंतर त्यांची देखभाल, बाजाराचे व्यवस्थापन योग्य प्रकारे केल्यास दरवर्षी हमखास उत्पन्न मिळवून देणारे एक प्रभावी माध्यम हे आठवडी बाजार ठरतील अशी अपेक्षा आहे. राज्यामध्ये पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रकल्पाच्या माध्यमातून हे काम होत आहे.

या उपप्रकल्पामध्ये सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतीना रु. २५ लक्ष रक्कमेच्या प्रकल्प मर्यादेत अनुदान दिले जाते. तथापि ग्रामपंचायतीने २५% रक्कम स्वहिस्सा म्हणून प्रत्यक्ष खर्च करणे आवश्यक आहे. प्रकल्पातील मंजूर रक्कम ग्रामपंचायतीचा स्वहिस्सा खर्च झाल्यानंतर टप्प्याटप्याने अदा केली जाते.

**इ-ट्रेडींग प्लॅटफॉर्म सुरु करणे :**

सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सर्वच क्षेत्रांमध्ये नवनविन माहिती व तंत्रज्ञानाचा वापर होवू शकतो. नजिकच्या कर्नाटक राज्याने हा प्रयोग यशस्वी केला असून त्या पध्दतीने आपल्या राज्यामध्ये देखील काम करावयाचे आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांनी सर्व माल (उदा. सोयाबीन, ज्वारी इ.) बाजार समितीमध्ये न आणता एक-दोन किलोची सँपल आणावी. ही सँपल दररोज किंवा ठरलेल्या दिवशी बाजार समितीने निवडलेल्या हॉलमध्ये टेबलवर मांडली जातील. त्या बाजार समितीमध्ये कार्यरत व्यापारी त्या त्या मालाचा दर्जा पाहून त्याची किंमत हॉलमधील संगणकांवर नोंद करतील. दररोज ठरलेल्या वेळी विकलेल्या शेतमालाच्या किंमती जाहीर केल्या जातील. या सर्व प्रक्रियेमध्ये संबंधीत शेतकरी उपस्थित नसले तरी त्यांच्या शेतमालाची विक्री पारदर्शकपणे होईल व त्यांच्या मालास मिळालेली किंमत इंटरनेट सुविधेव्दारे त्यांच्या गावात देखील कळू शकेल. ही सुविधा राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये करणे प्रस्तावित असून त्यादृष्टीने वाटचाल सुरु आहे. या उपक्रमाची शेतकऱ्यांनी माहिती घेवून बाजार समित्यांना सहकार्य करणे अपेक्षित आहे. या सुविधेमुळे स्पर्धात्मक वातावरण निर्माण होईल व शेतमालास योग्य व सध्यापेक्षा वाढीव भाव मिळण्यास मदत होईल याची खात्री वाटते.

**प्रकल्प अंमलबजावणी व प्रकल्पाचे व्यवस्थापन**

- प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य प्रकारे व्हावी यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आल्या आहेत. तसेच प्रकल्पाची एकंदर व्याप्ती ध्यानात घेवून कृषी, कृषी पणन व पशुसंवर्धन या तीन शासन विभागांचे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष तसेच प्रकल्प समन्वय कक्ष यांचे संयुक्त कार्यालय पुणे येथे कार्यरत आहे. हे सर्व कक्ष मा. प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करीत आहेत.
- पर्यावरण विषयक बाबींची योग्य प्रकारे अंमलबजावणी व्हावी तसेच महिला, आदिवासी, मागास जाती-जमाती व अन्य वंचित घटकांचा सहभाग प्रकल्पामध्ये व्हावा यादृष्टीने प्रकल्प समन्वय कक्षामध्ये पर्यावरण तज्ञ व समाज विकास तज्ञ कार्यरत आहेत. तसेच तीनही प्रकल्प अंमलबजावणी कक्षांमध्ये पर्यावरण संवर्धन व सामाजिक व्यवस्थापनाचे कामकाजासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे.
- जागतिक बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्पातील विविध बांधकामे, साहित्य/ साधने यांची खरेदी व सेवा पुरवठादारांची नेमणूक केली जाते. तसेच शेतकऱ्यांचे गट स्थापन करणे, शेतकऱ्यांच्या संस्था स्थापन करुन त्यांची कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी करणे, शेळी-मेंढी पालकांचे गट स्थापन करुन फेडरेशनची निर्मिती करणे, शेळी-मेंढी पालनाची प्रात्यक्षिके स्थापन करणे इत्यादी कामांसाठी सेवा पुरवठादार संस्थांची नेमणूक केली जाते.
- जागतिक बँकेच्या वित्तिय मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्पाच्या निधीचा योग्य वापर व व्यवस्थापन केले जाते.

प्रकल्पातील विविध उपक्रमांना वेळोवेळी भेटी देवून संनियंत्रण व मुल्यमापन केले जाते. तसेच सर्व उपक्रम पारदर्शकपणे व उत्तम पध्दतीने राबविले जातील याची खात्री केली जाते. त्यादृष्टीने स्वतंत्र यंत्रणा प्रकल्प समन्वय कक्षामध्ये कार्यरत आहे.


**संपर्क :**

Maharashtra Agricultural Competitiveness Project,
Plot. No. F/E/78, First Floor, LDB Trg. Center Building,
Market Yard, Gultekadi, Pune - 411037
Web. : http://macp.gov.in
Phone : 020-24270315/16
FAX : 020-24270322.




महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या लिलाव शेड.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या लिलाव शेडचे आतील दृश्य.





# आशिया विकास बँक (ADB) प्रकल्प



आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (AIDIP) निवडण्यात आलेल्या शेतकऱ्यांची प्रक्षेत्र भेट.

# आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत
# कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (AIDIP)

- **कार्यकारी यंत्रणा** – सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन
- **अंमलबजावणी यंत्रणा** – महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे.

प्रकल्पाचे मुख्य घटक

- सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर एकात्मिक मुल्य साखळ्यांची निर्मिती
- शेतक-यांचा क्षमता विकास
- संस्थात्मक विकास आणि प्रकल्प व्यवस्थापन
- सन २०१७ पर्यंत राज्यात साधारणत: १३-१५ मूल्य साखळ्या उभारणे प्रस्तावित आहेत.

**प्रकल्प अंमलबजावणीची रुपरेषा :**

| बाब | तपशिल |
|---|---|
| प्रकल्पासाठी जमीन | प्राधान्याने शासकिय / कृषि उत्पन्न बाजार समिती / सहकारी संस्था / खरेदी-विक्री संघ इ. ची अथवा खाजगी मालकीची |
| भांडवली गुंतवणूक | **शासकिय जमीन**, गुंतवणूकदार किमान ६० टक्के, राज्य शासन कमाल ४० टक्के रक्कम अनुदान स्वरूपात देणार.<br>**खाजगी जमीन,** गुंतवणूकदार किमान ६५ टक्के, राज्य शासन कमाल ३५ टक्के रक्कम अनुदान स्वरूपात देणार. |
| महसूलाची विभागणी | २५ वर्षांपर्यंत संपुर्ण उत्पन्न खाजगी गुंतवणूकदाराने घ्यावे.<br>संबंधीत संस्थेला जमीनीचे भाडे द्यावे.<br>२५ वर्षांनी प्रकल्प राज्य शासनाला परत करावा.<br>खाजगी जमीनीवरील प्रकल्प शासनास परत करण्याची आवश्यकता नाही. |
| निवडीचा निकष | स्पर्धात्मक निविदा प्रक्रीयेद्वारे तांत्रिक मुल्यमापनामध्ये पात्र निविदाधारकांपैकी सर्वात कमी अनुदानाची मागणी करणा-याची निवड |

**मूल्यसाखळीत उभारावयाच्या पायाभूत सुविधा**

| कृषि व्यापारविषयक सुविधा (Agribusiness Infra.) | मुलभूत सुविधा (Basic Infra) |
|---|---|
| पॅकहाऊस<br>मालाची साफसफाई व प्रतवारी यंत्रणा<br>पुर्वशितकरण सुविधा<br>शितगृहे<br>रायपनिंग चेंबर्स<br>गोदामे, इत्यादी | अंतर्गत रस्ते<br>विजपुरवठा<br>पाणीपुरवठा<br>वाहनतळ<br>नॉलेज सेंटर<br>घनकचरा व्यवस्थापन इत्यादी. |

**टप्पा १ व टप्पा २ मध्ये काम सुरु करण्यात आलेल्या मूल्यसाखळ्या**

| मूल्यसाखळी क्रमांक | समाविष्ट जिल्हे | प्रमुख पिके | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर, नाशिक व जळगाव | द्राक्ष, डाळींब, केळी, कांदा, टोमॅटो | प्रकल्प आराखड्यात आवश्यक ते बदल करण्यास राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेनुसार बीड डॉक्युमेंटचा मसूदा तयार करण्यात आलेला असून खाजगी गुंतवणुकदार निवडीसाठी लवकरच नव्याने निविदा मागविण्यात येतील. |
| २. | औरंगाबाद, जालना, बुलढाणा, अकोला व अमरावती | केशर आंबा, मोसंबी, संत्रा, केळी. | |
| ३. | सोलापूर व सांगली | द्राक्ष, डाळींब, केळी. | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार. प्रकल्प आराखड्यात आवश्यक ते बदल करण्यास राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेनुसार बीड डॉक्युमेंटचा मसूदा तयार करण्यात येत आहे. खाजगी गुंतवणुकदार निवडीसाठी लवकरच निविदा मागविण्यात येतील. |
| ४. | नागपूर व अमरावती | संत्रा, मिरची | |
| ५. | लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली व बीड | केळी,मिरची,तृणधान्य,कडधान्य | |
| ६. | नाशिक, धुळे व जळगाव | केळी, डाळींब, कांदा | |

**संपर्क** : प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, प्लॉट नं.एफ/ई/७८, मार्केटयार्ड, गुलटेकडी,पुणे - ४११०३७. फोन- ०२०-२४२६ ०५७४/५,
ईमेल:- projectadb@msamb.com

# समन्वयीत कृषि विकास प्रकल्प



- दुग्धव्यवसाय
- शेळीपालन
- जनावरांसाठी शेड
- परसबागेतील कुक्कुटपालन
- व्यावसायिक कुक्कुटपालन
- मिनी दाल मिल
- स्पायरल सेपरेटर
- ग्रेडींग आणि बी-बियाणे निमिर्ती
- शेती अवजारे - ट्रॅक्टर जोडणी अवजारे
- नेट हाऊस
- स्मॉल प्रोडयुसर ऍग्रीकल्चर रिर्सोस सेंटर
- बेबीकॉर्न प्रोडक्शन
- बी-बियाणे निर्मिती
- मृद व जलसंधारण
- बायोमास पॅलेट युनिट
- ग्रामीण गोदाम
- LCD Projector, Speaker आणि स्टॅबलायझर खरेदी
- एकत्रिक निविष्ठा खरेदी (Phospo Gypsum)
- एकत्रिक निविष्ठा खरेदी (SSP)
- एकत्रिक निविष्ठा खरेदी (बी-बियाणे निर्मिती)

# समन्वयीत कृषि विकास प्रकल्प

## उद्देश :

पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा, वाशिम व यवतमाळ या सहा जिल्ह्यांमध्ये कृषिक्षेत्रामध्ये शासनामार्फत सध्या राबवण्यात येत असलेल्या सर्व योजनांमध्येच समन्वय साधून कृषि विकास.

## प्रकल्प लाभार्थी :

- सुमारे १२०० गावांचा सहभाग.
- गावांचा मृद आणि जलसंधारण तसेच सेंद्रिय शेतीच्या प्रात्यक्षिकांमध्ये गावातील प्रत्येक कुटुंबाचा सहभाग.
- दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती, जमाती व अल्प, अत्यल्प भूधारक व भूमिहीन कुटुंबाना लाभ.
- प्रकल्प क्षेत्रातील सुमारे ३ लाख कुटुंबाना व २० लाख लोकांना फायदा. बाजार पेठेतील जोखमींमुळे दारिद्रय व नैराश्याच्या परिस्थितीत न जाता कुटुंबामध्ये जोखमींना तोंड देण्याची क्षमता निर्माण करणे.

## प्रकल्पातील सहभागी विभाग :

- सहकार व पणन विभाग समन्वयक.
- कृषि व पदुम विभाग
- ग्राम विकास व जलसंधारण विभाग
- महिला व बाल विकास विभाग
- वित्त व नियोजन विभाग

## प्रकल्पाचे व्यवस्थापन :

- महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
- अतिरिक्त अमरावती विभागीय आयुक्तांचा अधिपत्याखाली प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा
- ६ जिल्ह्यातील मुख्य 'आत्मा' अधिकारी यांच्या अधिपत्याखाली 'प्रकल्प व्यवस्थापन मंडळ'
- सर रतन टाटा ट्रस्ट यांचे आर्थिक योगदान, आय. टी.सी., टाटा केमिकल्स, अरविंद मिल्स्, जयंत मिल्स्, प्राज इंडस्ट्रिज, रिलायन्स, बँका, नाबार्ड, नागरी सहकारी बँका, तसेच नामांकीत स्वयंसेवित संस्थांचा सहभाग.

An end to end approach to agriculture

## प्रकल्पाचे मुख्य घटक :

- विविध खाजगी, सेवाभावी व शासकीय संस्थामध्ये भागीदारी निर्मिती आणि या संस्थांचा क्षमता विकास.
- महिलांचे सक्षमीकरण व कुटुंबाना सुस्थितीमध्ये पुर्नस्थापित होण्याची क्षमता निर्माण करणे.
- उत्पादन पणन व्यवस्थेपर्यंत बाजार जाळ्यांद्वारे समन्वय साधने आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन.
- गरिब शेतकऱ्यांच्या हिताचा 'बाजार जाळ्यांची' व 'मुल्य साखळींची' निर्मिती करणे.

## संपर्क :

प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा
विभागीय आयुक्त कार्यालय, कॅम्प, अमरावती
फोन : ०७२१ - २५५२४७५
Email : caim_pmu@msamb.com

# विविध योजना :

| अ.क्र. | योजना | पात्र लाभार्थी | युनिटची किंमत (कमाल) | प्रकल्प हिस्सा | लाभार्थी/बँक हिस्सा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | दुग्धव्यवसाय | प्रकल्पाचे लाभार्थी महिला स्वयंसहाय्यता गट (SHG) अथवा संयुक्त दायित्व गट (JLG) सदस्य युनिट - प्रत्येकी दोन दुभती जनावरे | रू.१,३०,०००/- (जनावराची किंमत,विमा, वाहतुक, गोठा विकास, प्राथमिक खाद्य इ. मिळून.) | युनिट किंमतीच्या २५% (जास्तीत जास्त रू. २५,०००/- पर्यंत) (जनावराची किंमत, विमा, वाहतुकसाठी) | लाभार्थी हिस्सा - किमान १०% बँक हिस्सा - ९०% | प्रकल्पाद्वारे थेट योजनेत सहभाग घेणाऱ्या बँकांना रक्कम अदा केली जाईल. |
| | | गोठा विकास, प्राथमिक खाद्याची किंमत | मर्यादा नाही. | २५% गोठा किंमतीच्या आणि जनावराचे प्राथमिक खाद्य यासाठी रु.१०,०००/- पेक्षा जास्त नाही. | वरील प्रमाणे | |
| २. | शेळीपालन | प्रकल्पाचे लाभार्थी कुटुंबे युनिट- जास्तीत जास्त १० पशु संख्या (९ शेळी व १ बोकड याप्रमाणे) | रू. ४००००/- | युनिट किंमतीच्या ३०% (जनावराची किंमत, विमा, वाहतुकसाठी) रु. १२,०००/- पेक्षा अधिक नाही. | लाभार्थी हिस्सा - शेळीपालनासाठीचे शेड व १०% रक्कम बँक / बचतगट हिस्सा - जास्तीत जास्त ९०% | प्रकल्पाद्वारे थेट योजनेत सहभाग घेणाऱ्या बँकांना रक्कम अदा केली जाईल |
| ३. | जनावरांसाठी शेड | | मर्यादा नाही. | जनांवरांसाठीच्या शेडच्या किंमतीच्या २५% रु. ५,०००/- पेक्षा जास्त नाही. | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ४. | परसबागेतील कुक्कुटपालन | प्रकल्पाचे लाभार्थी महिला स्वंयसहाय्यता गट (SHG) ज्यांना परसबागेतील कुक्कुटपालनाचे अनुभव आहेत. युनिट - जास्तीत जास्त १०० पक्षी | रु. १०,०००/- | युनिट किंमतीच्या ५०% जर युनिटमधील पक्षी संख्या २५ पेक्षा कमी असेल तर आणि युनिट किंमतीच्या ३०% जर युनिट मधील पक्षी संख्या २५ पेक्षा जास्त असेल तर परंतु दोन्ही मध्ये कमाल रु. | लाभार्थी हिस्सा - कुक्कुटपालनासाठीचे शेड बँक / बचतगट हिस्सा - कमाल ६०% | |

| अ.क्र. | योजना | पात्र लाभार्थी | युनिटची किंमत (कमाल) | प्रकल्प हिस्सा | लाभार्थी/बँक हिस्सा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | व्यावसायिक कुक्कुटपालन | प्रकल्पाचे लाभार्थी<br>युनिट - किमान १००० ते कमाल ४००० पक्षी संख्या | रु. ३,००,००० ते रु. ८,००,०००/- (पिल्ले व खाद्य यांसाठी) | युनिट किंमतीच्या ३०% परंतु रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त नाही. | लाभार्थी हिस्सा - ३०%<br>बँक हिस्सा - ७०% | |
| ६. | मिनी दाल मिल | उत्पादक गटातील प्रकल्पाचे लाभार्थी किंवा लोक संशोधित साधन केंद्र किंवा शेतीगट किंवा महिला स्वयंसहाय्यता बचत गट | रु. ३,५०,०००/- | युनिट किंमतीच्या ३०% परंतु कमाल रु. १,००,०००/- पेक्षा जास्त नाही. (मशीन, वीजजोडणी, वाहतुक, मशीन जोडणी / स्थापना करणे) | लाभार्थी आणि बँक हिस्सा - ७०% शासनाच्या इतर कोणत्याही योजनेद्वारे मदत घेता येणार नाही. | |
| ७. | स्पायरल सेपरेटर | प्रकल्पाचे लाभार्थी महिला स्वंयसहाय्यता बचत गट आणि उत्पादक गट | रु. १२,०००/- | युनिट किंमतीच्या ३०% परंतु रु.४,०००/- पेक्षा जास्त नाही | ७०% | लाभार्थी हिस्सा ७०% (असे स्वयंसहाय्यता बचत गट सोडुन ज्यांना लोक संचलित साधन केंद्राच्या महिलांचे काबाडकष्ट कमी करणे या अंतर्गत फंड मिळतो.) |
| ८. | ग्रेडींग आणि बी-बियाणे निमिर्ती | लघु व अतिलघु उद्योगधंदे | रु. २५,००,०००/- | ३०% रु. ७,५०,०००/- पेक्षा जास्त नाही. | | |
| ९. | शेती अवजारे - ट्रॅक्टर जोडणी अवजारे | लोक संचलित साधन केंद्र किंवा शेतकरी फेडरेशन मागील दोन वर्षाच्या अनुभवासहित | रु. १०,००,०००/- | युनिट किंमतीच्या ४०% रु. ४,००,०००/- पेक्षा जास्त नाही | कमीत कमी लाभार्थी हिस्सा किंवा बँक कर्ज ६०% | |
| १०. | नेट हाऊस | लक्ष्य लाभार्थी - उत्पादक गट<br>युनिट - ०.१ हे. | रु. ४,००,०००/- युनिट - ०.१ हे. साठी | ६५% जर लाभार्थी इतरत्र कोणत्याही शासनाच्या योजनेचा लाभ घेत नसेल तर परंतु रु. २,००,०००/- पेक्षा जास्त नाही. १५% जर लाभार्थी इतरत्र कोणत्याही शासनाच्या योजनेचा लाभ घेत असेल तर परंतु रु. ६०,०००/- | लाभार्थी - ३५% | |

| अ.क्र. | योजना | पात्र लाभार्थी | युनिटची किंमत (कमाल) | प्रकल्प हिस्सा | लाभार्थी/बँक हिस्सा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ११. | स्मॉल प्रोडयुसर ॲग्रीकल्चर रिर्सोस सेंटर | महिला स्वयंसहाय्यता बचत गट, उत्पादक गट, संयुक्त दायित्व गट | रु. ३,००,०००/- | युनिट किंमतीच्या ३०% किंवा कमाल रु. ९०,०००/- पेक्षा जास्त नाही. | कमाल ७०% | |
| १२. | बेबीकॉर्न प्रोडक्शन | उत्पादक गट - युनिट - १ हे. | रु.३८,०००/- हे. | युनिट किंमतीच्या ३०% रक्कम परंतु रु. १२,०००/- पेक्षा जास्त नाही | लाभार्थी हिस्सा - ७०% | |
| १३. | बी-बियाणे निर्मिती | उत्पादक गट, महिला स्वंयसहाय्यता बचत गट युनिट ०.१ हे. | रु. ७०,०००/- प्रति ०.१ हे. | गुंतवणुक किंमतीच्या ३०% परंतु कमाल रु.२१,०००/- पेक्षा जास्त नाही प्रति ०.१ हे. | लाभार्थी हिस्सा ७०% | महिला स्वंयसहाय्यता बचत गट ज्यांना डेब्थ रिडंम्शन फंड साठी मदत केली जाते. |
| १४. | मृद व जलसंधारण<br>१. शेततळे<br>२. नविन सिमेंट नाला बांध<br>३. नाला खोलीकरण आणि विस्तारीकरण<br>४. जुने नाले सरळीकरण / खोलीकरण<br>५. विहीर पुर्नभरण<br>६. मुळस्थळी जलसंधारण | प्रकल्पाचे लाभार्थी, गाव विकास समिती मार्फत कामास मंजुरी मिळेल | शासन निर्ण क्र. जलसं२०१२/प्र. क्र २३/जल-७/दिनांक १ जुन २०१२ आणि क्र. मृदसं/मृद-६/मशीन दर सूची/१७३६/१२ दि. १० जुलै २०१२. तांत्रिक व आर्थिक संदर्भासाठी गाईडलाईन | ९०% | लाभार्थी हिस्सा - १०% | तांत्रिक मंजुरी तालुका कृषी अधिकाऱ्या कडुन घेणे बंधन कारक, मापन पुस्तक नोंदणी, कार्यपुर्ती अहवाल बंधनकारक |
| १५. | बायोमास पॅलेट युनिट | प्रकल्प लाभार्थी लोकसंचलित साधन केंद्र, संयुक्त दायित्व गट, उत्पादक गट | रु. ८,५०,०००/- | रु. ८,५०,०००/-युनिट किंमतीच्या ३०% परंतु रु. २,५५,०००/- प्रति युनिट पेक्षा जास्त नाही. | लाभार्थी हिस्सा किंवा बँक कर्ज ७०% | इतरत्र कोणतेही सहाय्य यासाठी घेतलेले नसावे. |

| अ.क्र. | योजना | पात्र लाभार्थी | युनिटची किंमत (कमाल) | प्रकल्प हिस्सा | लाभार्थी/बँक हिस्सा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १६. | ग्रामीण गोदाम | सुक्ष्म-उद्योग आणि लघु व मध्यम उद्योग (शेती आधारित बी-बियाणे निर्मिती - १००० MT) | रु. ३५,००,०००/- | ३०% | | |
| १७. | LCD Projector, Speaker आणि स्टॅबलायझर खरेदी | प्रत्येक गाव विकास समिती | रु. २८,०००/- | रु. १०,०००/- | लोक संचलित साधन केंद्र रु. १०,०००/- आणि गाव विकास समिती रु. ८,०००/- | लोक संचलित साधन केंद्राची मालकी. |
| १८. | एकत्रिक निविष्ठा खरेदी (Phospo Gypsum) | प्रकल्पाचे लाभार्थी, महिला स्वंयसहाय्यता बचत गट, संयुक्त दायित्व गट, शेतकरी फेडरेशन युनिट - एक हेक्टरसाठी लागणारे Phospo Gypsum / लाभार्थी | एक हेक्टर / शेतकरी | ५०% | लाभार्थी ५०% | गाव विकास समिती, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, संयुक्त दायित्व गट, लोकसंचलित साधन केंद्र, शेतकरी फेडरेशन, उत्पादक गट यांचे द्वारे. |
| १९. | एकत्रिक निविष्ठा खरेदी (SSP) | प्रकल्पाचे लाभार्थी, महिला स्वंयसहाय्यता बचत गट, संयुक्त दायित्व गट, शेतकरी फेडरेशन युनिट - एक हेक्टरसाठी लागणारे SSP / लाभार्थी | एक हेक्टर / शेतकरी | ५% | लाभार्थी ९५% | गाव विकास समिती, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, संयुक्त दायित्व गट, लोकसंचलित साधन केंद्र, शेतकरी फेडरेशन, उत्पादक गट यांचे द्वारे. |
| २०. | एकत्रिक निविष्ठा खरेदी (बी-बियाणे निर्मिती) | प्रकल्पाचे लाभार्थी, महिला स्वंयसहाय्यता बचत गट, संयुक्त दायित्व गट, शेतकरी फेडरेशन युनिट - एक हेक्टरसाठी लागणारे / लाभार्थी | एक हेक्टर / शेतकरी | बी-बियाणे कंपनीद्वारे बाजारातील बियाणांची किंमत व बियाणांची आधारभुत किंमत यातील फरकाची १००% रक्कम १००% दोन्ही बाजुचा वाहतुक खर्च १००% बियाणे पॅकिंगसाठीचा खर्च | याउपरोक्त आणखी काही रक्कम लागवडीसाठी लागल्यास | गाव विकास समिती, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, संयुक्त दायित्व गट, लोकसंचलित साधन केंद्र, शेतकरी फेडरेशन, उत्पादक गट यांचे द्वारे. |

# महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई



- किमान आधारभूत किंमत खरेदी योजना

# महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई

## किमान आधारभूत किंमत खरेदी योजना

प्रत्येक वर्षी केंद्र शासनामार्फत भरडधान्य व कडधान्य, तेलबिया, कापूस यांच्या आधारभूत किंमती खरिप व रब्बी हंगामासाठी निश्चीत करण्यात येतात. राज्यामध्ये कडधान्ये व तेलबिया यांची खरेदी करणेसाठी नाफेड या संस्थेची प्रमुख अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात येते. मात्र ज्वारी, बाजरी, मका व धान या धान्याची खरेदी भारतीय अन्न महामंळाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत करण्यात येते व अन्न नागरीपुरवठा विभागाने बिगर आदिवासी क्षेत्रात मार्केटींग फेडरेशन व आदिवासी क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळाकडे सदर धान्य खरेदीचे काम दिले असून त्यासाठी प्रमुख अभिकर्ता म्हणून त्यांची नियुक्ती केलेली आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजनेची संक्षिप्त माहीती खालीलप्रमाणे :

**१) आधारभूत किंमती** : केंद्र शासनाने सन २०१५-१६ खरीप हंगामासाठी भरडधान्याच्या आधारभूत किंमती खालीलप्रमाणे निश्चीत केलेल्या आहेत.

| अ.क्र. | धान्य | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|
| १. | धान (अ श्रेणी) | १४०० | १४५० |
| २. | धान सर्वसाधारण | १३६० | १४१० |
| ३. | ज्वारी हायब्रीड | १५३० | १५७० |
| ४. | ज्वारी मालदांडी | १५५० | १५९० |
| ५. | बाजरी | १२५० | १२७५ |
| ६. | मका | १३१० | १३२५ |
| ७. | तूर | ४३५० | ४६२५ |
| ८. | उडिद | ४३५० | ४६२५ |
| ९. | मुग | ४६०० | ४८५० |
| १०. | भुईमुग शेंग | ४००० | ४०३० |
| ११. | सोयबीन | २५६० | २६०० |
| १२. | सुर्यफुल | ३७५० | ३८०० |
| १३. | कापूस (मध्यम धागा) | ३७५० | ३८०० |
| १४. | कापूस (लांब धागा) | ४०५० | ४१०० |

या योजनेअंतर्गत ज्वारी, बाजरी, मका व धान खरेदीसाठी जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने सर्व जिल्ह्यात धान्य खरेदी केंद्रे उघडण्यात येतात. प्रत्येक जिल्ह्यात धान खरेदीसाठी मार्केटींग फेडरेशनच्या अ' वर्ग सभासद संस्थेची उपअभिकर्ता म्हणून नियुक्ती करुन त्यांचे मार्फत खरेदी करण्यात येते. ज्वारी, बाजरी, मका या भरड धान्याची दैनंदिन होणारी खरेदी त्याच दिवशी शासनाच्या प्रतिनीधीच्या ताब्यात दिली जाते. केंद्र शासनाच्या नियमानुसार जो धान खरेदी करण्यात येतो त्याचे केंद्र / राज्य शासनाच्या सुचनेनुसार भरडाई / मिलींग करुन त्याचा तांदुळ भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करावा लागतो. शेतकरी बांधवांनी शेतमालाची चाळणी करून माल विक्री साठी आणावा. त्यांच्या चांगल्या प्रतीच्या मालास (FAQ quality) बाजारात विक्री करीता आणल्यावर जर त्यास हमीभावापेक्षा कमी दर मिळत असेल तर त्याची विक्री व्यापाऱ्याकडे न करता मार्केटींग फेडरेशनचे केंद्रावर करावी जेणेकरून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही. परंतू सदर खरेदी केंद्रावर फक्त केंद्र शासनाने निर्धारीत केलेल्या एफ. ए. क्यू. दर्जाचा माल हमी भावाच्या दराने खरेदी होणे अपेक्षित आहे. एफ. ए. क्यू दर्जाचा माल कसा असावा याचे मार्गदर्शन प्रत्येक बाजार समितीमध्ये उपलब्ध आहे.

संपर्क :

**श्री. अनिल देशमुख,**
महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई
कनमूर हाऊस, नरसीनाथा रोड, मज्जीर स्टेशन जवळ
पो.बॉ.नं. ५०८०, मुंबई - ४००००९
फोन नं. ०२२ - २३७५२२९४ / २३७५२२९५
वेबसाईट : www.mahamarkfed.org

# महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, नागपूर

## राज्यात कापूस एकाधिकार खरेदी योजना

एकाधिकार कापूस खरेदी योजनेपुर्वी राज्यातील कापूस बाजारपेठ शहरी विभागात केंद्रित होती. मात्र एकाधिकार कापूस खरेदी योजने अंतर्गत कमीत कमी परीघामध्ये शेतक-यांचे सोयीसाठी कापूस खरेदी केंद्र उघडल्याने ग्रामीण भागात कापूस खरेदी विक्रीचे व्यवहार होवू शकले व त्या माध्यमातून पैसा हा ग्रामीण भागातच राहीला. ग्रामीण स्तरावर राष्ट्रीय बँकेचे व इतर सहकारी बँकेच्या शाखा उघडण्यांत आल्या. बँक,जि.प्रे.उद्योग, ऑईल मिल व इतर उद्योग ग्रामीण भागात सुरु झाले. परिणामत: विविध वित्तीय संस्था व उद्योगाचे जाळे ग्रामीण भागात पसरुन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली. शेतक-यांचा कापूस वाहतूकीचा खर्च व इतर कामाकरिता शहराकडे वळण्याची प्रवृत्ती बंद झाली व शेतकरी सुजाण झाला. सदर योजनेच्या माध्यमातून विदर्भ, मराठवाडा व जळगांव खानदेश या कापूस पिकविणा-या प्रभागात कापसाशी संलग्न सूत गिरणी उद्योग भरभराटीस आले.

कापूस उत्पादकांचे हिताकरिता राज्य शासनाद्वारे सुरु करण्यांत आलेली एकाधिकार कापूस खरेदी योजना राबविणे करिता राज्य शासनाने प्रथमत: महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. या सहकारी संस्थेला मुख्य अभिकर्ता म्हणून नियुक्त केले.

### प्रमुख कार्य :

१) किमान आधारभूत योजने अंतर्गत हंगाम २००८-०९ ते २०१३-१४ पर्यंत नाफेड या संस्थेस सबएजंट म्हणून कार्यरत.
२) हंगाम २०१४-१५ मध्ये सीसीआय या संस्थेचे उपअभिकर्ता म्हणून कार्यरत.
३) हंगाम नसतांना आर्थिक स्त्रोत निर्माण करण्याकरिता महाकॉट या ब्रॅन्डनेम खाली शासनाने निर्धारीत केलेल्या दरानुसार सरकी बियाणे विक्री.
४) खाजगी संस्थाकडून कापूस नमुन्यांचे प्रयोगशाळेत परिक्षण माफक दरात करुन देणे.
५) माफक दरात संस्थेची गोदामे भाड्याने देणे.

### कापूस पणन महासंघाचे भाग भांडवलधारक खालीलप्रमाणे आहेत.

१) खरेदी विक्री संघ - १५६
२) सहकारी जि.प्रे.संस्था - १४३
३) सहकारी सूत गिरण्या - ०३०
एकूण - ३२९

### योजनेची ठळक उद्दिष्टे पुढील प्रमाणे.

१) राज्यातील कापूस उत्पादकांना रास्त व किफायतशीर भाअव मिळवून देणे.
२) दलालांना दूर करुन किफायतशीर भावांचा पुर्ण फायदा घेवून कापूस उत्पादकांना अधिक उत्पन्न मिळवून देणे.
३) कापूस उत्पादकांना स्थिर उत्पन्न प्राप्त करुन देणे व त्यायोगे राज्यातील एकंदर कापूस उत्पादनात वाढ करुन स्थैर्य निर्माण करणे.
४) ग्राहक गिरण्यांना (Consumer Mills) शास्त्रशुध्द रितीने प्रतवारी केलेला कापूस पुरविणे.
५) कापूस खरेदी, प्रक्रिया व विक्री या कामी सहकारी संस्थांना पुर्णपणे गुंतवून एकंदर सहकारी संस्थाना बळकटी आणणे.
६) विक्री व सहकारी कर्ज वसुली हयांमध्ये परिणामकारकरित्या सांगड घालणे.
७) कापसाच्या वेगवेगळ्या प्रक्रिया म्हणजे जिनिंग व प्रेसिंग,सरकीचे गाळप, सूत कताई व विणाई इ.ची सांगड घालून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करणे जेणे करुन वाढीव उत्पादनाचा लाभ गिरणी कामगार व कापूस उत्पादक या दोघांनाही मिळू शकेल.

### संपर्क :

**महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित,**
प्रधान कार्यालय, कॉटन कॉम्प्लेक्स, अजनी चौक, नागपूर - ४४० ०१५
दुरध्वनी : २२२६६२४ / २२३०३५८, फॅक्स : (०७१२) - २२३०२१७.

# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ



- महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विभाग प्रकल्प
- अन्न सुरक्षा कायद्यासाठीचे नियोजन
- राष्ट्रीय कृषि विकास योजना
- कमॉडिटी स्पॉट एक्स्चेंजची सेवा पुरविणे
- वखार केंद्रालगत शीतसाखळीचे नियोजन
- कृषि सेवा केंद्राची स्थापना
- अत्याधुनिक पद्धतीने साठवणूक

# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

शेतीचा विकास दर वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने दूरदृष्टी ठेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा विचार करून शासकीय निधिअंतर्गत नवीन प्रकल्प हाती घेतलेले आहेत. या प्रकल्पांमध्ये शीतगृह, सायलो, क्लिनिंग, ग्रेडिंग, एन.सी.ई.एक्स, ई-वखार पावती, कंटेनर फ्रेट स्टेशन, सॅप ऑनलाईन संगणक प्रणाली, तात्काळ ऋण तारण योजना, हब अँड स्पोक मॉडेल इत्यादींमधील शहरी व ग्रामीण वखार केंद्रावर खालील योजनांतर्गत महामंडळचे कामकाज चालू आहे.

## १) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विभाग प्रकल्प :

शेतकऱ्यांना महामंडळाकडून साठवणुकीसाठी प्राधान्याने जागा उपलब्ध करून देण्यात येते. कृषि उत्पन्न बाजार समिती, पणन मंडळ व स्थानिक मार्केटमध्ये, महामंडळाच्या गोदामांमध्ये उपलब्ध असलेल्या रिक्त जागेची अद्ययावत माहिती सर्व स्तरांवर प्रसिद्ध करून शेतकऱ्यांना त्याद्वारे संबंधित वखार केंद्रावरील साठवणूक जागेच्या उपलब्धतेची माहीती देण्यात येते. यामुळे मार्केटमध्ये जागा उपलब्ध नसल्यामुळे धान्याची कमी दराने विक्री करावी लागणार नाही व त्यातून शेतकऱ्यांना नंतर फायदा घेता येईल. महामंडळाच्या साठवणुकीचा शेतकऱ्यांना फायदा कसा होईल, यादृष्टीने नियोजन आहे.

महामंडळाच्या मालकीच्या गोदामांपैकी ४० वखार केंद्रांमध्ये शेतकऱ्यांनी साठवणूक केलेल्या मालास राष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने, स्पॉट एक्सचेंज सुविधा कार्यान्वित करण्यात येत असून त्या दृष्टीने एन.सी.डी. एक्स. (स्पॉट)सोबत सामंजस्य करार सन २०१० मध्ये करण्यात आला आहे. महामंडळाने युनियन बँक ऑफ इंडियाशी प्रथम टप्प्यात ७० ठिकाणी शेतकऱ्यांसाठी त्वरित कर्ज मिळण्यासाठी करार केला आहे.

## २) अन्न सुरक्षा कायद्यासाठीचे नियोजन :

महामंडळ क्षेत्रीय महत्त्वाच्या मंडल स्तरांवर गोदामे बांधणार असून त्यातून १५ ते २० लक्ष मे. टन साठवणूक क्षमता वाढवीत आहे. ३१.५ लक्ष मे. टन वाढीव क्षमता निर्माण करण्याचे आव्हान राज्यासमोर आहे. यासाठी वखार महामंडळाने नियोजन केले असून त्यामध्ये क्षेत्रीय स्तरावर विविध कार्यकारी सोसायट्यांना अंब्रेलामध्ये अंतर्भूत करणे, वखार पावतीचे सक्षमीकरण करणे, सार्वजनिक वितरण प्रणाली मजबूत करण्यासाठी राज्यात वाढीव साठवणूक क्षमता निर्माण करणे, हे महामंडळाचे ध्येय आहे.

## ३) राष्ट्रीय कृषि विकास योजना :

महामंडळाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत महामंडळाच्या वखार केंद्रावर वखार पावतीवर अल्प दराचे तारण कर्ज देण्यासाठी, तसेच ऑनलाईन विक्री सुविधा देण्याकरिता गुणनियंत्रण प्रयोगशाळा, प्राईस इन्फॉर्मेशन टिकर्स, वजनकाटे, तसेच संगणक हार्डवेअर पुरवून शेतकऱ्यांना विक्री सुविधा देण्याकरिता नियोजन केले असून सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त झालेली आहे.

## ४) कमॉडिटी स्पॉट एक्स्चेंजची सेवा पुरविणे :

नॅशनल कमोडिटी एक्स्चेंजसोबत वर्ष २०१२ पर्यंत ४० ठिकाणी आणि २०१५ पर्यंत १०० ठिकाणी शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी नॅशनल स्पॉट एक्स्चेंजअंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील बाजारपेठ उपलब्ध करून देणे. (शासनाकडून जागतिक बँक प्रकल्पांतर्गत.)

## ५) कृषि सेवा केंद्राची स्थापना :

महामंडळाने इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.च्या मदतीने किसान सेवा केंद्राची उभारणी करून, सदर केंद्रावर शेतकरी/ उद्योजकांना खालील सेवा देण्याचे नियोजन केलेले आहे. पहिल्या टप्प्यात वखार महामंडळ व इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांनी महाराष्ट्रातील ७ जागा व्यावसायिक व तांत्रिक बाबींचा विचार करून निर्धारित केलेल्या आहेत. १) कराड, २) फलटण, ३) लोणंद, ४) पंढरपूर शहर ५) पंढरपूर-कराड रोड, ६) अहमदनगर (केडगाव) ७) ओझर (नाशिक)

सदर ठिकाणी महामंडळाची जागा उपलब्ध असून, त्या ठिकाणी पेट्रोल/ डिझेल

पंप उभारण्याचे नियोजन केलेले आहे.

६) अत्याधुनिक पद्धतीने साठवणूक :

महामंडळाची ज्या ठिकाणी जागा कमी आहे, जागेच्या किंमती जास्त आहेत, मात्र जेथे साठवणूक क्षमता निर्माण करणे शेतकऱ्यांच्या/राज्यातील अन्नधान्य साठवणुकीच्या दृष्टीने आवश्यक आहे अशा पनवेल, सिन्नर, अंबड, रांजणगाव, तळोदा, मुसळगाव या ठिकाणी महामंडळाने अत्याधुनिक स्वयंचलित यंत्रणा वापरून मल्टिस्टोरीड वेअरहौसिंग कॉम्प्लेक्स निर्माण करण्याचे नियोजन केले आहे.

वखार महामंडळ एका दृष्टीक्षेपात :

- शेतक-यांना वखारभाड्यात ५०% सवलत, तसेच गोदामांमध्ये २५% आरक्षण देण्यांत येते.
- प्रत्येक पंधरवड्यामध्ये किड प्रतिबंधात्मक व उपचारात्मक किटकनाशकांचा वापर करून मालाची शास्त्रशुध्द साठवणूक करण्यांत येते.
- सर्व साठवणुकीला १००% विमा संरक्षण देण्यांत येते. नुकसान झाल्यास योग्य ती भरपाई देण्यांत येते.
- हाताळणी व वाहतुकीची सुविधा मान्यताप्राप्त ठेकेदारांतर्फे पुरविण्यांत येते.
- आयातकांना व निर्यातकांना शुल्कबंध वखारींची सुविधा उपलब्ध करून देण्यांत येते.
- ठेवीदारांना दिलेली वखार पावती परक्राम्य लेख (Negotiable Instrument) आहे व ती बँकेकडे तारण ठेवून ठेवीदारांना बँकेकडून त्वरीत कर्ज मिळते. तारण कर्ज योजना राबविण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र, पंजाब नॅशनल बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युको बँक या बँकासोबत सामंजस्य करारनामा करण्यात आला आहे व इतर बँकांबरोबर करारनामा करण्याचे कामकाज चालू आहे.
- गोदामांच्या ऑनलाईन सुविधांमार्फत वखार पावती बँकांना देऊन त्यावर मालाच्या किंमतीच्या ७५% इतकी रक्कम अल्प दराने शेतक-यांस तात्काळ मिळवून देणे. सध्या ६० वखार केंद्रे ऑनलाईन सुविधेशी जोडली आहेत. राज्यातील लवकरच सर्व वखार केंद्रे ऑनलाईन सुविधेने जोडली जाणार आहेत.
- खाजगी कंपनी व व्यापारी यांचा औद्योगिक माल साठवणुकीसाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य सुविधा उपलब्ध करून देणे.
- महामंडळाची वखार पावती परक्राम्य लेख (Negotiable Instrument) आहे. ती बँकेकडे तारण ठेवल्यास ठेवीदारांना बँकेकडून पीक कर्जाप्रमाणे सवलतीचे व्याज दराने कर्ज उपलब्ध होण्यासाठीची नवीन तरतूद यासाठी दि. ३१/१२/२०१२ अन्वये केंद्र शासनाने तारण कर्जावर व्याज सहाय्यता योजना अंमलात आणली आहे. त्याद्वारे हंगामात गोदामातील शेतमाल साठवणुकीवर बँकेकडून किंमतीच्या ७५% अर्थसहाय्य लगेचच मिळणार असून नंतर बाजारभाव येईपर्यंत साठवणुक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. केंद्रशासनाच्या या धान्य तारण योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी व शेतक-यांना त्वरीत कर्ज मिळणेसाठी महामंडळाने बँकासोबत सामंजस्य करार केला आहे. याची प्रत राज्यातील प्रत्येक बँकेच्या शाखेत उपलब्ध आहे.

संपर्क :

**श्री. बी.एन. आंद्रे,**
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
गुलटेकडी, मार्केट यार्ड,
पुणे - ४११०३७.
फोन नं. : ०२० - ६६२६६८००, २४२६२९५१.
website : http://mswarehousing.com
Email : mswc2k@yahoo.com,
mswcinfo@mswarehousing.com

# विपणन व निरीक्षण संचालनालय



## • कृषि पणनची एकात्मिक योजना

# विपणन व निरीक्षण संचालनालय

## कृषि पणनची एकात्मिक योजना

कृषि पणनच्या सुविधा उभारणीसाठी राज्यसरकार,सहकारी संस्था आणि खाजगी क्षेत्रातून गुंतवणुकीसाठी सदर योजना केंद्र सरकारने सन २०१४ पासून सुरु केली आहे. यामध्ये साठवणुक क्षमतेत वाढ करणे, शेतमाल तारण योजना राबविणे, मुल्य साखळी विकास, कृषि पणनच्या माहितीची त्वरीत देवाण घेवाण, कृषि मालाच्या प्रत ठरविणे तसेच कृषि व्यवसायावर आधारीत प्रकल्पामध्ये खाजगी गुंतवणुक वाढविणे इ. उद्देश निश्चित करुन योजना आखण्यात आली. त्याचप्रमाणे योजनेसंदर्भात शेतकरी,उद्योजक,कृषि पणन क्षेत्रात काम करणारे विविध घटक यांचे करीता प्रशिक्षण आणि सर्वसाधारण जागृती करणेसाठीचा यात समावेश आहे. थेट पणन, कराराची शेती,खाजगी बाजार स्थापण्याबाबत ज्या राज्यांनी कृषि पणन कायद्यात दुरुस्त्या केलेल्या आहेत अशी सर्व राज्ये या योजनेचा लाभ घेवू शकतात.

### सुविधा :

- स्वच्छता, कटींग, दाणे काढणे, ब्लिचींग, प्रतवारी, पॅकींग, लेबलिंग, वॅक्सीग, पिकविणे, चिलींग इ. विविध प्रकारच्या मुल्य वृध्दीच्या बाबी करण्यासाठीच्या आवश्यक सोई सुविधा उभारणे.
- कृषि उत्पन्न बाजर समित्यांमध्ये सामुदायीक सुविधांची उभारणी तसेलिलाव ओटे,कृषि माल हाताळणीच्या सुविधा, निर्जंलीकरण, प्रतवारी, स्वच्छता, वजन करणे. इ. (या शिवाय इतर सुविधा जसे पार्कींग शेड, अंतर्गत रस्ते,कचरा व्यवस्थापन,कंपाऊंडवॉल, पिण्याचे पाणी इ. सुविधांसाठीही अनुदानाची तरतुद आहे.)
- उत्पादकांकडुन थेट ग्राहकांना /प्रक्रिया युनिट/मोठे खरेदीदार यांना कृषि मालाच्या थेट विक्रीसाठी आवश्यक सुविधांची उभारणी.
- इ-ट्रेडींग, कृषि पणन विस्तार सेवा, पणन माहिती इ. साठीच्या सोई सुविधा.
- साठवणुकीच्या सुविधा उदा.गोदाम तसेच सायलो (आवश्यक इतर सुविधांसह)
- सुगी पश्चात हाताळणीच्या फिरत्या सुविधा, प्रतवारी,पॅकींग,रिफर व्हॅन इ.

### लाभधारक :

- व्यक्ती,शेतक-याचा गट, शेतकरी उत्पादक कंपन्या,भागीदारी कंपन्या,महामंडळे, स्वयंसेवी संस्था, स्वयं सहाय्यता गट, सहकारी संस्था,सहकारी पणन महासंघ, पंचायत, बाजार समित्या, पणन मंडळ, वखारमहामंडळ,राज्य नागरी पुरवठा महामंडळ इ.

### प्रमुख अहर्ता :

- व्यापारी,सहकारी, प्रदेशिक ग्रामिण बँक,कृषि विकास वित्तीय कंपन्या, राज्य सहकारी बँक, राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक, शेड्यूल अर्बन को. ऑफ बँक, शेड्युल प्राथमिक सहकारी बँक,नाबार्ड पुर्नवित्तपुरवठा करु शकणा-या संस्था, राज्य वित्तीय महामंडळ इ. मार्फत वित्त पुरवठा घेतलेल्या प्रकल्पासाठी योजना लागू.

## साठवणुकीच्या सुविधा व्यतिरीक्त इतर सुविधा प्रकल्पांसाठी :

| अ.क्र. | तपशिल | अनुदान दर (भांडवली खर्चावर) | कमाल अनुदान मर्यादा (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १. | नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या,महिला, अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती लाभार्थीकिंवा त्यांच्या सहकारी संस्था | ३३.३३ % | ५००.०० |
| २. | इतर सर्व प्रकारचे लाभार्थी | २५.०० % | ४००.०० |

**संपर्क :**

कृषि पणन सल्लागार, (DMI)
विपणन व निरीक्षण संचालनालय,
कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग,

ए- ब्लॉक, सी. जी. ओ. कॉम्पलेक्स फरीदाबाद
१२१०००१ (हरीयाणा)
दुरध्वनी (०१२९) २४३४३४८,२४१५७१०
फॅक्स : (०१२९) २४१६५६८, २४१२८३५

उपकृषि पणन सल्लागार,
विपणन व निरीक्षण संचालनालय,
नवीन सी.जी.ओ. बिल्डींग, तिसरा मजला,
न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४००० २०
फोन नं. ०२२ - २२०३६८०१ / २२०३२६९९
ई मेल - dmiromah@nic.in

## अनुदान - साठवणूक सुविधा, प्रकल्प :

| अ. क्र. | तपशिल | अनुदान (एकुण भांडवली गुंतवणुकीवर) अनुदानाच्या मर्यादा % | अनुदानाच्या मर्यादा १००० मे. टन क्षमते पर्यंत रु. /मे.टन | अनुदानाच्या मर्यादा १००० मे. टन पेक्षा जास्त ते ३०००मे .टन पर्यंत रु. /मे. टन | अनुदानाच्या मर्यादा कमाल मर्यादा (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या, पंचायत, महिला, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, लाभार्थी किंवा त्यांच्या सहकारी संस्था/ स्वयं सहाय्यता गट. | ३३.३३ | ११६६.५५ | १०००.०० | ३००.०० |
| २. | इतर सर्व प्रकारचे लाभार्थी | २५.०० | ८७५.०० | ७५०.०० | २२५.०० |



# महाराष्ट्र राज्य छोट्या शेतकऱ्यांचा कृषि व्यापार संघ, पुणे

- समभाग भाग भांडवल योजना
- प्रकल्प विकास सुविधा

# महाराष्ट्र राज्य छोट्या शेतकऱ्यांचा कृषि व्यापार संघ, पुणे (SFAC)

महाराष्ट्र राज्य छोट्या शेतक-यांच्या कृषि व्यापार संघा मार्फत व्यापारक्षम कृषि प्रक्रिया उद्योग विकासासाठी समभाग भाग भांडवल अर्थ सहाय्य योजना..

### प्रस्तावना :

शेती हा देशातील खाजगी क्षेत्रामधील सर्वात मोठ्ठा व्यवसाय आहे. सर्वसामान्य लोकांच्या खाण्या-पिण्याच्या सवयींमध्ये होत असलेल्या बदलामुळे या क्षेत्राच्या विकासामध्ये भरपूर वाढ होत आहे. त्यामुळे मुल्यवर्धित अन्न पदार्थ उत्पादनाच्या वाढत्या मागणीमुळे शेती व्यवसायाच्या विकासाच्या वाढीला प्रचंड वाव आहे. या व्यवसायाच्या यशस्वी विकासासाठी नाविण्य व भागीदारीची अत्यंत गरज आहे. कृषि उद्योग हे शेती उत्पादनाच्या विक्रीसाठी पहिली बाजारपेठ असून त्याच्या वाढीसाठी व्यक्तिगत प्रयत्नांची गरज आहे. कृषि उद्योग प्रामुख्याने लघु व मध्यम उद्योगांनी व्यापलेला आहे. हे उद्योग विखुरलेले असल्यामुळे शेतीमाल पुरविण्याच्या संधी सहज उपलब्ध होतात. नविन कृषि उद्योग विकासासाठी असणारे प्रमुख अडथळे म्हणजे उच्च तंत्रज्ञानाची माहिती व पतपुरवठा उपलब्ध न होणे.

या पार्श्वभुमीवर शेतीकडे केवळ उपजिवीकेचे साधन म्हणून न पाहता नवीन तंत्रज्ञान व प्रशिक्षणाच्या सहाय्याने शेती मालाचे मुल्यवर्धन करणे आवश्यक आहे. कृषि पुरक व कृषि प्रक्रिया उद्योगांना चालना देणे त्यायोगे कृषि प्रक्रिया उद्योगांचे जाळे देशभर उभारणे अपेक्षित आहे. यासाठी केंद्र शासनाच्या स्तरावर केंद्रीय छोट्या शेतक-यांच्या कृषि व्यापार संघाची स्थापना करण्यात आली आहे. त्यांची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

### उद्दीष्टे :

- भागभांडवल उभारणीसाठी मदत करुन कृषि उद्योजकांना प्रक्रिया उद्योग स्थापन करण्यास सहाय्य करणे.
- बँकेस सादर करावयाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.
- या अनुषंगाने सन २००५ मध्ये राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य छोट्या शेतकऱ्यांच्या कृषि व्यापार संघाची स्थापना करण्यात आली आहे.
- समभाग भाग भांडवल योजना : (Venture Capital Assistance Scheme)
- राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज मंजूर केलेल्या उत्तम गुणवत्तेच्या कृषि प्रक्रिया उद्योगास छोट्या शेतक-यांचा कृषि व्यापार संघाकडून व्हेंचर कॅपिटल अर्थसहाय्य योजनेचा लाभ देण्यात येतो. भारतीय स्टेट बँकेच्या सहाय्यक बँका, विभागीय ग्रामीण बँका, राज्य आर्थिक महामंडळ, नाबार्ड या वित्तीय संस्थांद्वारे कर्ज मंजूर झालेल्या प्रकल्पास योजनेचा लाभ देता येईल.

### उद्दीष्टे :

- राष्ट्रीयकृत बँकांच्या सहकार्याने कृषि उद्योग उभारण्यास चालना देणे.
- कृषि उद्योग प्रकल्पामध्ये खाजगी गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देऊन त्याद्वारे ग्रामीण भागातील उत्पन्न व रोजगार वाढविणे.
- कृषि उद्योग प्रकल्पाद्वारे कच्च्या मालाचे उत्पादन व त्यावरील प्रक्रीया ही साखळी मजबूत करणे.
- कृषि उद्योग प्रकल्प उभारणीसाठी शेतकरी, शेतकरी उत्पादकांचा गट आणि कृषि पदवीधर यांना सहाय्य करणे.
- कृषि प्रक्रीया उद्योगासंदर्भात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

### पात्र प्रकल्प :

कृषि प्रक्रिया उद्योग, फलोत्पादन, पुष्पोत्पादन, औषधी व सुगंधी वनस्पती, मसाला पीके, रेशीम उद्योग, सेंद्रिय शेती प्रकल्प, गांडूळ खत उत्पादन प्रकल्प, मधुमक्षिका पालन, दुय्यम वन उत्पादन, मत्स्य व्यवसाय, कुक्कुट पालन ( मांस प्रक्रिया ) व दुग्ध प्रक्रिया उद्योग (वाईनरी प्रकल्प वगळून) या प्रकल्पांना अर्थसहाय्य देय राहील. सदर प्रकल्प हा बँक कर्जाशी निगडीत असावा.

### व्हेंचर कॅपिटल असिस्टंस योजनेंतर्गत अर्थसहाय्य उपलब्धता :

- बँकेने कर्ज मंजूर केलेल्या रु. १५ लाख व पुढील गुंतवणूक केलेल्या कृषि मालावर आधारित प्रक्रिया उद्योगास स्वगुंतवणुकीच्या २६ टक्के किंवा कमाल मर्यादा रु. ५० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहील.
- लाभधारकांच्या बँक कर्ज परतफेड कालावधीनंतर व्हेंचर कॅपिटल अर्थसहाय्याची एकरकमी परतफेड करणे आवश्यक राहील.

### लाभार्थी निवडीचे निकष :

या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी गट, उत्पादक गट, खाजगी संस्था, भागीदारी संस्था, स्वयंसहाय्यत्ता गट, कंपनी, कृषि निर्यात विभागातील कृषि उद्योजक व कृषि पदवीधर यांना अर्थसहाय्य देय राहील.

### प्रकल्प विकास सुविधा (Project Development Facility) :

उद्योजकास प्रकल्प अहवाल हा छोट्या शेतक-यांचा कृषि व्यापर संघाकडील मान्यताप्राप्त सल्ला संस्था किंवा कंपनी यांचेकडून तयार करुन घेणे बंधनकारक राहील. प्रकल्प अहवाल तयार करणेकरिता रु. १ लाख मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य सदर सल्ला संस्था किंवा कंपनी यांना अदा करण्यात येईल.

### संपर्क :

व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य छोट्या शेतकऱ्यांचा कृषि व्यापार संघ, पुणे.
(Maharashtra State Small Farmers Agri-business Consortium,Pune)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
कृषि भवन, पहीला मजला, के.बी. जोशी मार्ग, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
दुरध्वनी क्र. ०२०-२५५३३४३० E-mail: mdsfacmh@yahoo.co.in



# राष्ट्रीय शितसाखळी विकास केंद्र (एन.सी.सी.डी.)



- प्रशिक्षण

# राष्ट्रीय शितसाखळी विकास केंद्र (एन.सी.सी.डी.)

भारतात शितसाखळी विकासावरील कृती गटाने नाशिवंत फळे-भाजीपाला आणि इतर नाशिवंत व तत्सम कृषिमालाची नासाडी कमी करण्यासाठी व पर्यायाने शेतकरी व ग्राहकांच्या नफ्यात वाढ करण्यासाठी भारतात एकात्मिक शितसाखळीला प्रोत्साहन देऊन विकास करण्यासाठी राष्ट्रीय शितसाखळी विकास केंद्र (एन.सी.सी.डी.) या स्वायत्त गुणवत्ता केंद्राची नोंदणीकृत संस्था म्हणून स्थापना करण्याविषयी आपल्या अहवालामध्ये सूचविले होते.

शितसाखळी विकासावरील कृती गटाने सुचविल्याप्रमाणे भारतात नाशिवंत कृषि व तत्सम मालाकरीता एकात्मिक शितसाखळीला प्रोत्साहन व विकास करण्यासाठी राष्ट्रीय शितसाखळी विकास केंद्राची (एन.सी.सी.डी.) स्थापना करण्यात आली आहे. शितसाखळी पायाभूत सुविधांसाठी आंतरराष्ट्रीय प्रमाणके व सर्वोत्तम पद्धतीशी सुसंगत प्रमाणके व मापदंड यांची शिफारस करणे, मानव संसाधन विकासासाठी मार्गदर्शक तत्वे सूचविणे, शितसाखळी विकासासंबंधी योग्य धोरण आराखडा शिफारस करणे ही सदर केंद्राची मुख्य उद्दिष्टे आहेत.

एन.सी.सी.डी. ची दि. २७.०१.२०११ रोजी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० च्या कायद्याअंतर्गत संस्था म्हणून नोंदणी झालेली आहे. कॅबिनेट कमिटीने यास दि. ०९.०२.२०१२ रोजी कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

एनसीसीडीचे स्वरूप हे प्रतिनिधिक असून ते देशामध्ये शितसाखळी विकासासंबंधी योजनांची अंमलबजावणी करणा-या विविध मंत्रालयातंर्गत शासकिय विभाग, उद्योग, सीआयआय व फिक्की सारखे संघ, सेवा पुरवठादार, तज्ञ संस्था, उत्पादक संघ आदी भागधारकांचे प्रतिनिधित्व आहे.

भारतात शितसाखळी विकासावरील कृती गटाच्या दृष्टान्त अनुरुप कृषि मंत्रालयाने स्थापित केलेली एन.सी.सी.डी. ताजी फळे व भाजीपाला यांचा समावेश असलेल्या नाशिवंत अन्नपदार्थासाठी उभारण्यात येणा-या शितसाखळी पायाभूत सुविधांची तांत्रिक मानके शिफारस करण्यासाठी तसेच त्यांची तांत्रिक प्रगतीसह कालबद्ध पुनरावृत्ती अंगीकारण्यासाठी कटिबद्ध आहे. तसेच एन.सी.सी.डी. ही भारतात शितसाखळी क्षेत्रामध्ये सल्लासेवा बाबतची कामे, शीतगृहांचे प्रमाणिकरण व त्यांचे रेटिंग, संशोधन व विकास व देशातील शितसाखळी क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची गरज भागविण्यासाठी मानव संसाधन विकास कार्यक्रम आयोजनाचे कामकाज करेल. देशामध्ये एकात्मिक शितसाखळी पायाभूत सुविधांचा विकास करण्यासंबंधित प्रकरणामध्ये शासनाला सल्ला देण्याचे कामकाजही एनसीसीडी करेल. यामुळे निश्चितपणे नाशिवंत कृषीमालाचे काढणी पश्चात नुकसान कमी होणार असून सदरील कृषिमालाच्या स्थिर उपलब्धतेची खात्री मिळणार आहे. यामुळे उत्पादक शेतक-यांना त्यांच्या मालाला किफायतशीर भाव मिळेल व ग्राहकांना ताजी फळे व भाजीपाला त्यांना परवडणा-या किंमतीत उपलब्ध होईल.

## उद्दिष्टे :

१. काढणी पश्चात व्यवस्थापनासह शितसाखळी पायाभूत सुविधांसाठी आंतरराष्ट्रीय प्रमाणके व सर्वोत्तम पद्धतीशी सुसंगत प्रमाणके व मापदंड यांची शिफारस करणे आणि शितसाखळी उद्योगामार्फत पूरविण्यात येणा-या पायाभूत सुविधा, प्रक्रिया व सेवा यासाठीचे प्रमाणपत्र व बेंच मार्कींग याबाबत यंत्रणा सुचविणे.

२. संभाव्य गुंतवणूकदार / उद्योजक यांना प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निर्देशक मार्गदर्शक तत्त्वे सूचविणे.

३. शितसाखळीसंबंधी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी माहिती तंत्रज्ञानावर आधारित योग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करणे व मुल्यांकन करणे.

४. शितसाखळी क्षेत्रातील भागधारकांशी सल्लामसलत करुन शितसाखळी उद्योगाचा विकास करण्यासाठी आवश्यक संशोधन आणि विकासाचे कामकाज करणे व त्यामध्ये समन्वय साधणे.

५. मानव संसाधन विकास आणि क्षमतावृद्धीबाबतचे कामकाज सुरू करणे व त्यामध्ये समन्वय साधणे. यामध्ये शितसाखळी विकासासाठी संबंधित प्रशिक्षण कार्यक्रम,

अल्पकालीन / जास्त कालावधीचे अभ्यासक्रमाचे आयोजन करणे.

६. भागधारकांचे शितसाखळी विषयक शिक्षण, ज्ञानवृद्धी तसेच एकात्मिक शितसाखळीचे फायदे याविषयी जनजागृती करण्यासाठी प्रसिद्धी मोहिम राबविणे.

७. शितसाखळी विकासासंबंधी योग्य धोरण आराखडा शिफारस करणे.

८. नाशिवंत कृषी व तत्सम वस्तूंसाठी मल्टी मोडल वाहतूक सुविधा उपलब्ध करणे व त्यांचा विकास करणे. तसेच नॅशनल ग्रीन ग्रिड पेरिशेबल कमॉडिटीजची स्थापना करणे.

## प्रशिक्षण सहकार्य

राष्ट्रीय शितसाखळी विकास केंद्र (एन.सी.सी.डी.) प्रत्येक राज्यामध्ये राज्य नोडल अधिकारी यांचे माध्यमातून शीतगृहसंबंधी क्षमता वृद्धी व रायपनिंग चेंबर संबंधी कौशल्य विकासाबाबतचे प्रशिक्षण देते. सदर प्रशिक्षणासाठी राज्य नोडल अधिकारी यांचेकडे नावनोंदणी करावी लागते. राज्य नोडल अधिकारी म्हणून राज्यातील फलोत्पादन अभियानमधील अधिकारी नियुक्त करण्यात आलेले असून महाराष्ट्र राज्यात राज्य फलोत्पादन अभियानमधील श्री. एन. एम. कोळपकर, प्रकल्प व्यवस्थापक, काढणी पश्चात व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे हे आहेत.

सदर प्रशिक्षणाचा खर्च एन.सी.सी.डी. करत असून प्रशिक्षणस्थळी जाणे येणेचा खर्च प्रशिक्षणार्थींना अथवा त्यांचे कार्यालयास करावयाचा आहे.

## संपर्क :

Mr. N. H. Kolapkar,
Deputy Director,
Web. : http://www.nccd.gov.in
Mobile No : +91-9422431961,
+91-9404396119

# विदेश व्यापार संचालनालय, भारत सरकार



# विदेश व्यापार संचालनालय, भारत सरकार

भारत सरकारच्या विदेश व्यापार संचालनालयाच्या सन २०१५-२०२० साठीच्या निर्यातवृद्धी प्रोत्साहन योजना :

- यापूर्वीच्या विशेष कृषि व ग्रामीण उपज योजना, विशेष उत्पादन योजना या सारख्या पाच योजनांचे एकत्रिकरण.
- फळे, भाजीपाला, फुले, चहा, कॉफी, मसाले व प्रक्रिया पदार्थांच्या निर्यातीसाठी लागू
- निर्यातीची रक्कम प्राप्त झाल्यावर FOB रक्कमेवर प्राप्त यु. एस. डॉलरच्या प्रमाणात अनुदान सेवा निर्यात प्रोत्साहन योजना
- निर्यातीची रक्कम प्राप्त झाल्यावर FOB रक्कमेवर प्राप्त यु. एस. डॉलरच्या प्रमाणात अनुदान ३ टक्के ते ५ टक्के अनुदानाची योजना
- एक्सपोर्ट प्रमोशन कॅपिटल गुड्स योजनेअंतर्गत ९० टक्क्यांऐवजी ७५ टक्के एक्सपोर्ट अनिवार्य
- मेक इन इंडिया योजनेअंतर्गत देशांतर्गत उत्पादक व्यावसायिकांना प्रोत्साहनासाठी योजना
- आयात कॅपिटल गुड्ससाठी निर्यातीची अनिवार्यता ९० टक्क्यांऐवजी आता ७५ टक्के
- स्थानिक उत्पादित मालाला निर्यातीसाठी विशेष प्रोत्साहन

निर्यातदारांचे सोयीसाठी विदेश व्यापार संचालनालयाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने डिजीटाईज्ड स्वरूपात सादर करण्याची सोय केलेली आहे. यामुळे पॅनकार्ड, आयात-निर्यात परवाना क्रमांक, अपेडा नोंदणी प्रमाणपत्र इ. कागदपत्रे एकदा ऑनलाईन सादर केल्यावर प्रत्येक वेळी पुन्हा पुन्हा अपलोड करावयाची गरज नाही. तसेच मोबाईल, क्रमांक व ई-मेल आय. डी. पुरविल्यानंतर संचालनालयाकडून एस.एम. एस./ ईमेलद्वारे अपडेट्स येत राहतात. ई-गव्हर्नन्स च्या उद्देशाने आयात-निर्यातीबाबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे ऑनलाईन पुरविण्याबाबत संचालनालय आग्रही आहे.

उपरोक्त योजनांच्या विस्तृत माहितीसाठी व इतर तपशिलांसाठी dgft.gov.in या वेबसाईटवर संपर्क साधावा.

## संचालक विदेश व्यापार यांची महाराष्ट्रातील कार्यालये

**१)अतिरीक्त संचालक, विदेश व्यापार, भारत सरकार.**
निष्ठाभवन, ४८ विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दूरध्वनी-०२२-२२०१६४२१
ई-मेल-mumbai-dgft@nic.in
(सहसंचालक विदेश व्यापार, पुणे व नागपूर येथे समाविष्ट नसलेले जिल्हे)

**२) सहसंचालक, विदेश व्यापार, भारत सरकार.**
सी ब्लॉक, पी.एम.टी.कमर्शियल कॉम्प्लेक्स,
शंकरशेटरोड, स्वारगेट, पुणे-४११०३७
दूरध्वनी- ०२०-२४४४१५७७, २४४४९५९८
ई-मेल- pune-dgft@nic.in

**समाविष्ट जिल्हे :**
पुणे, अहमदनगर, जालना, बीड, कोल्हापूर, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, रत्नागिरी, सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदूर्ग, नाशिक

**३) सहसंचालक, विदेश व्यापार, भारत सरकार.**
नवीन सचिवालय इमारत-१, पूर्वभाग,
पहिला मजला, व्ही.सी.ए. मैदानासमोर,
सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
दूरध्वनी - ०७१२-२५४१२५६
ई-मेल- - nagpur-dgft@nic.in

**समाविष्ट जिल्हे :**
अकोला, अमरावती, बुलडाणा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, नागपूर, वर्धा, वाशिम व यवतमाळ.



# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना २००७-२००८ मध्ये सुरु करण्यात आली आहे. या अभियानाअंतर्गत राज्यात तृणधान्यामधील गहू व भात पिकांची निवड करण्यात आली आहे. या अभियानाअंतर्गत राज्यातील नाशिक, धुळे, अहमदनगर, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, परभणी व नागपूर या आठ जिल्ह्यांची गहू पिकासाठी निवड करण्यात आली असून सन २००७-२००८ पासून या जिल्ह्यांमध्ये अभियान राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय सुरक्षा अभियानाची अंमलबजावणी सन २०१५-१६ मध्ये करण्यासाठी केंद्र शासनाने रक्कम रु.२४४.६२ कोटी रक्कमेच्या कृति आराखड्यास मंजूरी दिली असून गहू, भात, कडधान्ये व भरडधान्य पिकांसाठी मंजूर कार्यक्रम अनुक्रमे रक्कम रु.३०.२६ कोटी, रु.४.७५ कोटी, रु.१८४.४३ कोटी व रु.२५.१७ कोटी आहे. सन २०१५-२०१६ मध्ये सदर अभियानासाठी अर्थ सहाय्य केंद्र व राज्य शासन ५०:५० टक्के या प्रमाणात करणार आहेत.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान : एकत्रित मार्गदर्शक सुचना (गहू, भात, कडधान्ये व भरडधान्यासाठी)**

१. प्रात्यक्षित क्षेत्र : एका लाभार्थी शेतकऱ्यास एकच प्रात्यक्षिक ०.४० हे. च्या मर्यादेत देण्यात येते.

२. बियाणे, खते, औषधे व तणनाशकांचा संपुर्ण खर्च भागविण्यासाठी प्रति प्रात्यक्षिक रु.२०००/-

३. निविष्ठांची किंमत (बी-बियाणे, खते, औषधे व तणनाशके) - रु.१,३२५/-

४. प्रकाशित साहित्य वाटप (हस्तलिखीते, पोस्टर्स, घडीपत्रिका इ.) - रु.१२५/-

५. पिक प्रात्यक्षिके भात - अनुदान प्रति हेक्टर -

- भात पुर्न:लागवड - रु.५,०००/-
- सघन (SRI भात) भात पुर्न:लागवड - रु.५,०००/-
- संकरीत भात - रु.६,८००/-
- भात + बांधावरील तुर - रु.११,१२५/-

६. पिक प्रात्यक्षिके गहू - अनुदान प्रति हेक्टर -

- सुधारीत तंत्रज्ञानावर आधारीत गहू प्रात्यक्षिक - रु.६,६००/-
- खरिप ज्वारी नंतर गहू - रु.८,६००/-
- खरीप बाजरी नंतर गहू - रु.८,०००/-
- सोयबीन नंतर गहू - रु.१२,४५०/-

७. पिक प्रात्यक्षिके कडधान्य - अनुदान प्रति हेक्टर -

- पिक प्रात्यक्षिक तूर - रु.५,४२५/-
- पिक प्रात्यक्षिक मूग - रु.५,०००/-
- पिक प्रात्यक्षिक उडिद - रु.४,९२५/-
- पिक प्रात्यक्षिक हरभरा - रु.७,४००/-

८. पिक प्रात्यक्षिके भरडधान्य - अनुदान प्रति हेक्टर -

- खरिप ज्वारी - रु.३,३००/-
- बाजरी - रु.३,२००/-
- मका - रु.५,०००/-
- नाचणी - रु.२,२७६/-
- रब्बी ज्वारी - रु.३,३००/-

९. गहू बियाण्यांच्या खरेदीसाठी रक्कम रु.५००/- प्रति क्विंटल किंवा किमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

१०. सूक्ष्ममुलद्रव्यासाठी रक्कम रु.५००/- प्रति क्विंटल किंवा किमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

११. जिप्समच्या वापरासाठी किंमतीच्या ५० टक्के रक्कम अधिक वाहतूक खर्च किंवा प्रति हेक्टर रु.५००/- या पैकी जे कमी असेल ती मदत लाभार्थ्यास देण्यात येईल.

१२. नॅपसॅक स्प्रेपंपासाठी रक्कम रु.३०००/- अथवा किंमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

१३. मशागत पाभर यंत्रासाठी रक्कम रु.१५,०००/- अथवा किंमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

१४. रोटाव्हेटर या यंत्रासाठी रक्कम रु.३०,०००/- अथवा किंमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

१५.पंपसेटसाठी रक्कम रु.१०,०००/- अथवा किंमतीच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

१६. निवडलेल्या जिल्ह्यात प्रति शेतकरी प्रशिक्षण (शेतीशाळा) साठी रक्कम रु.१७,०००/- आर्थीक तरतूद राहील.

१७. एकात्मिक किड / रोग व्यवस्थापनासाठी रक्कम रु.५००/- प्रति हेक्टर किंवा खर्चाच्या ५० टक्के या पैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील.

**लाभार्थींचे वर्गीकरण :**

१. योजनेअंतर्गत लाभार्थींची निवड - अल्प / अत्यल्प भू-धारकांना सर्वाधिक प्राधान्य.

२. किमान १६ टक्के अनुसूचित जाती प्रवर्गासाठी.

३. किमान ८ टक्के अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी.

४. एकूण लाभधारकांपैकी ३० टक्के हिस्सा महिला शेतकऱ्यांसाठी.

अधिक माहीतीसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.



# ॲग्रीकल्चरल ॲड प्रोसस्ड फूड प्रॉडक्टस् एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ॲथॉरीटी

# Agricultural & Processed Food Products Export Development Authority (APEDA)

- निर्यातपूरक सुविधा उभारणी
- बाजार विकास

# अपेडा

भारत हा कृषि प्रधान देश आहे, भारतात जगाच्या बाजार पेठेचा विचार करता दुसऱ्या क्रंमाकांची फळे व भाजीपाला उत्पादीत करणारा देश आहे. भारततुन कृषि मालाची निर्यात वाढावी तसेच या निर्यातीतुन शेतकऱ्याला अधिकचा बाजार भाव मिळावा यासाठी शासन प्रयत्नशिल असते, या अनुषंगाने कृषि आणि प्रकियायुक्त अन्नपदार्थ निर्यात विकास संस्था (अपेडा), महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ तसेच कृषि विभाग व इतर काही विभागही निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबवितात.

## अपेडा (अ‍ॅग्रीकल्चरल अ‍ॅन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस एक्सपोर्ट डेव्हलपमेंट अ‍ॅथोरीटी)

अपेडा हि संस्था केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या अखत्यारीत कृषि माल व कृषि मालावर प्रक्रिया केलेल्या उत्पादकांच्या निर्यातीस चालना मिळण्यासाठी १९८६ साली सुरु करण्यात आलेली आहे. अंदाजीत २२००० पेक्षा जास्त नोंदणीकृत निर्यातदार व शेती संबंधीत ५५० विविध उत्पादने अपेडा संस्थेमार्फत निर्यातीस प्रोत्साहन देण्यात येते. अपेडाने अनुसुचीत केलेल्या कृषि मालाचे प्रमाणीकरण आणि दर्जा हा घटक निर्यातीमध्ये मुख्य धोरण ठेवल्यामुळे अपेडा अनुसूचित उत्पादनांनी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात रक्कम रु. १,३६,९२० करोडची निर्यात उलाढाल केलेली आहे.

जागतिक स्तरावरील स्पर्धेमध्ये भारतीय उत्पादनाला स्थान मिळविण्याच्यादृष्टीने अपेडा संस्था उत्प्रेरकाचे कामकाज करते. कृषि मालाचा दर्जा सुधारणे व त्यासाठी आवश्यकत्या सोयी सुविधा उभारणे हे अपेडाच्या विविध धोरणापैकी एक धोरण आहे. अपेडा ही संस्था पुरवठा व विपणन साखळीमध्ये शेतीतील विविध काम पासून ते अंतीम ग्राहकांपर्यंत माल पोहोचेपर्यंतच्या टप्प्यांमधील विविध पातळ्यांवर काम करते. अपेडा संस्था नियमीतपणे उत्पादक व निर्यातदार यांचेशी संवाद साधून शासनास निर्यातीचे धोरण ठरविण्यासाठी माहिती उपलब्ध करून देते. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत देशाच्या कृषी, प्रक्रिया व अन्य उत्पादनांच्या पुरवठा क्षमतेबाबत माहिती पुरविणे हे अपेडा संस्थेच्या विविध कामांपैकी एक काम आहे.

भारतातील मुबलक साधन संपत्ती तसेच विविध नैसर्गीक प्रकृतींमुळे अनेक प्रकारचे कृषि मालाचे उत्पादन बहुतांशपणे वर्षभर प्राप्त होते. अपेडा या संस्थेचे भारतामध्ये ५ विभागीय स्तरीय कार्यालये असून त्यामार्फत भारतीय कृषि मालाचा गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठमध्ये सदर मालाला योग्य स्थान मिळवून देण्याचेही काम करते.

**संपर्क :**

**डॉ. सुधांशू, उपसरव्यवस्थापक,**
अ‍ॅग्रीकल्चरल अ‍ॅन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस एक्सपोर्ट डेव्हलपमेंट अ‍ॅथोरीटी (अपेडा)
४ था मजला, बँकींग कॉम्प्लेक्स बिल्डींग-२, सेक्टर-१९ ए,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०५.
www.apeda.gov.in
Ph.No - +91- 022-27840949/27845442/27840350
Fax - +91- 022-27842273
Mobile No - 9920437633
E-mail - apedamum@apeda.gov.in

| योजनेचे नाव<br>भाग-१ | उपलब्ध अनुदान |
|---|---|
| अ) अपेडा, इतर शासकीक अथवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेमार्फत निर्यातपूरक सामायिक सुविधा उभारणी | अपेडामार्फत ९० टक्के अनुदान व १० टक्के इतर शासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेमार्फत जागेव्यतिरीक्त खर्चासाठी. जागाखरेदीसाठी या योजनेअंतर्गत अनुदान उपलब्ध होणार नाही. |
| ब) पी. पी. पी. तत्वावर सार्वजनिक क्षेत्रातील सामायिक सुविधा उभारणी | मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचे कामकाज सुरू आहे. |
| भाग-२<br>अ) विशेष वाहतूक वाहन खरेदी (प्राणिज उत्पादने, फलोत्पादन अथवा फुलोत्पादनासाठी) | अपेडामार्फत ४० टक्क्यापर्यंत अनुदान.<br>अनुदान मर्यादा रू. ७.५० लाख |
| ब) अपेडा निर्धारीत उत्पादनांसाठी अर्थसहाय्य<br>१.अंतर्गत साठवणुकरीता तसेच ग्रेडिंग क्लिनींगसाठी शेड उभारण्यास अर्थसहाय्य. | ४० टक्के व रु. १० लाख मर्यादित अनुदान |
| २ (अ) यांत्रीक उपकरण, ग्रेडिंग, वॉशींग वॅक्सींग, रायपनींग, पॅकेजींग, इत्यादी स्थापीत करणे | ४० टक्के व रु. २५ लाख मर्यादित अनुदान |
| २ (ब) प्रशितकरण, शीतगृह व हाताळणी सुविधा उभारणी करणे. | ४० टक्के व रु. २५ लाख मर्यादित अनुदान |
| २ (क) फ्यूमिगेशन, एक्सरे स्क्रीनिंग, हॉट वॉटर ट्रिटमेंट, वॉटर सॉफ्टनिंग प्लँट व इतर तपासणी साठी सुविधा उभारणी करणे. | ४० टक्के व रु. २५ लाख मर्यादित अनुदान |

| | |
|---|---|
| २ (व) वरील दिलेल्या योजनापैकी किमान दोन किंवा जास्त सुविधा असलेले एकात्मीक काढणी पश्चात यंत्रणा उभे करणे. | ४० टक्के व रु. २५ लाख मर्यादित अनुदान |
| ३. केळी व इतर उत्पादनांसाठी (किमान ५० हेक्टर क्षेत्रासाठी) बागेवर केबल-कार द्वारे हाताळणी यंत्रणा उभारणे (अपेडा मार्फत निर्धारीत केल्यानुसार) | ४० टक्के व रु. ५० लाख मर्यादित अनुदान |
| ४. बाष्पं उष्णव्यवस्थापन, इलेक्ट्रॉनिक्स बिम प्रकिया, रेडिओधर्मी सुविधा उपलब्ध करणे. | ४० टक्के व रु. ५० लाख मर्यादित अनुदान |
| ५. प्रदुषण नियंत्रण, खाद्य प्रकियेनंतर निघालेल्या दुषीत पदार्थावर प्रकिया, पर्यावरण संरक्षणासाठी अर्थसहाय्य | ४० टक्के व रु. ३५ लाख मर्यादित अनुदान |
| भाग-३ | |
| विशिष्ट प्रकारच्या उदा. अधिकतम नमी (९५ टक्के पेक्षा जास्त) असलेले शितगृहे, नियंत्रीत पध्दतीच्या साठवणुक इत्यादी सुविधा स्थापीत करणे. | ४० टक्के व रु. ३५ लाख मर्यादित अनुदान |

## बाजार विकास :

| योजनेचे नाव<br>अ. पॅकेजिंग विकास | उपलब्ध अनुदान |
|---|---|
| भाग–१ | |
| पॅकेजिंग मानके व डिझाईनमध्ये विकास व सुधारणा | अपेडासाठी १०० टक्के अंतर्गत योजना |
| भाग–२ | |
| निर्यातदारांकडून अपेडामार्फत विकसीत केलेल्या पॅकेजिंगची मानके व स्पेसिफिकेशननुसार पॅकेजींगच्या साहित्याचा वापर | पॅकेजींग साहित्याच्या २५ टक्के व रु. ५ लाख मर्यादेत अनुदान |
| निर्यातीसाठी सर्वेक्षण, सल्ला सेवा, डाटाबेस तयार करणे व बाजारपेठ शोधण्याकरीता शास्त्रोक्त अभ्यास | अभ्यास करण्यासाठी अर्थसहाय्य. |
| भाग–१ | |
| उत्पादने व पायाभूत सुविधा आधारीत बाजार माहितीचे संकलन व प्रसारण | अपेडासाठी १०० टक्के अंतर्गत योजना |
| भाग–२ | |
| व्यवहार्यता अभ्यासाकरिता अर्थसहाय्य | ५० टक्के व रु. १० लाख मर्यादेत अनुदान |
| भाग–३ | |
| निर्यातक्षम उत्पादन करणाऱ्या संस्था, व्यापारी संस्था इत्यादीना सर्वेक्षण व बाजार पेठेचा अभ्यास करण्याकरीता अर्थसहाय्य | बाजार विकास सहाय्य योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार |

| योजनेचे नाव<br>अ. पॅकेजिंग विकास | उपलब्ध अनुदान |
|---|---|
| क- निर्यातवृद्धी व बाजार विकास<br>भाग १ | |
| महोत्सव / ट्रेड फेअर / बाजार वृद्धीसाठी अपेडा मार्फत आयोजित साहित्य पुरवठा, नमुने, उत्पादन माहितीपत्रके, वेबसाईट उभारणी, जाहीरात करणे | अपेडासाठी १०० टक्के अंतर्गत योजना |
| भाग २ | |
| अपेडामार्फत प्रसारीत जाहीरात, उत्पादनांची माहितीपत्रके, प्रसिद्धी साहित्य व फिल्म्स | अपेडासाठी १०० टक्के अंतर्गत योजना |
| भाग ३ | |
| जाहीरातींद्वारे ब्रँड प्रसिद्धी (भारतीय उत्पादनांसाठी) भारतीय उत्पादनांसाठी ब्रँड प्रसार, आंतरराष्ट्रीय छपाई व इलेक्ट्रॉनिक जाहीरात क्षेत्रात जाहीरात | २५% किंवा रू.५० लाख पैकी कमीत कमी या मर्यादेत अपेडा व वाणिज्य मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, एका निर्यातदारास जास्तीत जास्त ३ सलग वर्षांसाठी अनुदानास पात्र |
| भाग ४ | |
| आयातदार-निर्यातदार बैठका, उत्पादन निर्यातवृद्धी, प्रतिनिधीमंडळ दौरे, व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमधे सहभाग | बाजार विकास योजनांनुसार निर्यातदारांसाठी अपेडामार्फत १०० अर्थसहाय्याने |
| भाग ५ | |
| जगातील विशेष व्यापार क्षेत्रामधे बाजार सुविधा केंद्रांची उभारणी शोरूम्स / वेअरहाऊस स्थापनेसाठी लीज व भाडे तत्वावर जागा घेऊन निर्धारीत उत्पादनांसाठी ठराविक बाजारपेठेसाठी कामकाज. अशा आस्थापना एक किंवा जास्त सक्षम एजन्सीच्या माध्यमातून करण्यात यावी. | या योजनेनुसार पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी अनुक्रमे ७५%, ५०% व ३३% एवढी रक्कम लिज भाडे रक्कमेवर अनुदान दिले जाते. एका आर्थिक वर्षात एका क्षेत्रासाठी कमाल मर्यादा रू.१०० लाख एकापेक्षा जास्त उत्पादनांसाठी शोरूम / वेअरहाऊस असल्यास प्रत्येक बाजारपेठेसाठी रू.५०० लाख प्रतिवर्ष अपेडा, प्रगतीचा आढावा घेऊन तीनपेक्षा पुढील वर्षांसाठी लीज भाडे रक्कमेच्या २५%टक्के रक्कमेसाठी अनुदानाबाबत अपेडा विचार करू शकेल. |

| योजनेचे नाव<br>दर्जावृद्धी व दर्जा सुधारणा | |
|---|---|
| भाग १ | |
| दर्जा तपासणीची यंत्रणा उभारणी | ५० टक्के व रु. २५ लाख मर्यादेत अनुदान, अनुदानास पात्र दर्जा सुधारणा मानकांची उभारणी आवश्यक |
| भाग २ | |
| ISO, HACCP, BRC, GAP या सारख्या दर्जा सुधारणा व प्रमाणिकरणासाठी सल्लासेवा प्राप्त करणे | ५० टक्के व रु. ५ लाख मर्यादेत अनुदान |
| भाग ३ | |
| अपेडा मान्यताप्राप्त प्रयोगशाळांची सुधारणा | ५० टक्के खाजगी प्रयोगशाळांसाठी<br>७५ टक्के राज्य शासन/विद्यापीठांच्या प्रयोगशाळांसाठी<br>१०० टक्के केंद्र शासकीय प्रयोगशाळांसाठी<br>उपरोक्त योजना रु. ७५ लाख या कमाल मर्यादेमध्ये. |
| भाग ४ | |
| माती, पाणी, किटकनाशक अंश, प्राण्यांची औषधे, संप्रेरक, विषारी उत्पादने, जड धातूंचे अंश इ. पदार्थांची अपेडा निर्धारीत कृषि व प्रक्रिया उत्पादनांमध्ये तपासणीसाठी अनुदान. | ५० टक्के अथवा प्रत्येक नमुन्यास रू. ५०००/- या कमाल मर्यादेत (अपेडा निर्धारीत निरीक्षण योजनांनुसार) |
| भाग ५ | |
| स्त्रोतशोधासाठी आंतरराष्ट्रीय मानकांची स्विकार (ए) ग्लोबल कंपनी प्रिफिक्स नंबर (GCP) | २५ टक्के किंवा रू. १ लाख या कमाल मर्यादेत |
| (बी) इलेक्ट्रॉनिक प्रॉडक्ट कोड (EPC/RFID) | २५ टक्के किंवा रू. १ लाख या कमाल मर्यादेत |
| (सी) शेतकरी क्षेत्रासाठी GLN किंवा ICS ची स्थापना | २५ टक्के किंवा रू. १.५ लाख या कमाल मर्यादेत प्रति ICS (ICS हा सुमारे ५०० शेतकऱ्यांचा गट असेल जो सेंद्रिय प्रमाणिकरणात सहभाग घेईल) |
| (डी) सामुग्री खरेदी (हाताळणी योग्य) शेतीवर वापर योग्य | उत्पादनांच्या किंमतीच्या २५ टक्के अथवा रु. २.५० लाख यापैकी जी कमी असेल ती प्रति निर्यातदार/प्रमाणिकरण यंत्रणा/प्रयोगशाळा यानुसार. |

| | |
|---|---|
| भाग १ | |
| (ए) तांत्रिक व व्यवस्थापकीय क्षमता वृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत भारतात किंवा परदेशात विशेष प्रशिक्षण | १. अपेडा आयोजित कार्यक्रमांसाठी १०० टक्के व रू. १.५ लाख या मर्यादित प्रति लाभार्थी प्रतिनिधी (अपेडा नोंदीत संस्थेचा)<br>२. निर्यातक्षम उत्पादनांच्या सूचित शेतकरी क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी १०० टक्के. |
| (बी) निर्यातदारांच्या कर्मचाऱ्यांसाठी निर्यातपूरक तांत्रिक क्षमतावृद्धीसाठी | रू. २०,००० प्रति व्यक्ति, एका संस्थेकडील ५ कर्मचाऱ्यांसाठी. तसेच प्रति व्यक्ति प्रति दिवस रू. ५००० या कमाल मर्यादेत. |
| भाग २ | |
| चर्चासत्र/समुद्र प्रशिक्षण अथवा दौरे भारतात किंवा भारताबाहेर किंवा माहिती संकलनासाठी आयोजित करणे | ५० टक्के राष्ट्रीय चर्चासत्रासाठी रू. १ लाख व आंतरराष्ट्रीयसाठी रू. २ लाख या कमाल मर्यादेत |
| भाग ३ | |
| (ब) अपेडा अर्थसहाय्यीत चर्चासत्रांसाठी | ५० टक्के किंवा रू. ५ लाख या मर्यादेत. |

योजनेच्या अधिक तपशिलासाठी www.apeda.gov.in या वेबसाईचा संदर्भ घ्यावा.



# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

- एकात्मिक काढणीपश्चात व्यवस्थापन
- फलोत्पादन पिकांसाठी पणन सुविधा
- पायाभूत सुविधा

# एकात्मिक काढणीपश्चात व्यवस्थापन

१) पॅक हाऊस (Pack House)

अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. ४.०० लाख
बांधकाम क्षेत्र :- ९ मी. X ६ मी.
देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या ५० टक्के

**उद्देश :-**

१. उत्पादित फलोत्पादन, औषधी व सुगंधी मालाची शेतावरच साफसफाई, प्रतवारी व आवश्यक वजनाचे / आकाराचे पॅकिंग करुन तात्पुरती साठवणुक करणे.
२. फळे, फुले, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती यासारख्या नाशवंत मालाचे आयुष्य व दर्जा वाढविणे.
३. कच्च्या मालावर प्राथमीक प्रक्रिया करुन उत्पादनाचे मुळ रुपात बदल न करता गुणात्मक वाढ करणे.
४. मध्यस्थांची संख्या कमी करुन प्रत्यक्ष उत्पादकाला वाजवी भाव मिळवुन देणे व ग्राहकांना योग्य दरात माल उपलब्ध करुन देणे.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

पॅक हाउसची उभारणी करण्यासाठी असणारे अर्थसहाय्य ग्राह्य भांडवली खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २.०० लाख देय आहे.

**खर्चाच्या प्रमाणात अनुदानाचा तपशील :-**

पॅक हाऊस उभारणीसाठी आर्थिक मापदंडाप्रमाणे रु. ४.०० लाख खर्चापैकी ६०० चौ.फुट (९ मी. X ६ मी.) क्षेत्रफळाच्या बांधकामासाठी रु. ३.०० लाख व इतर सोई सुविधा उपलब्ध करण्यासाठी (प्लास्टीक क्रेट्स, वजन काटे, ट्रॉली, घमेले, कटर, प्रतवारी व पॅकिंगसाठी आवश्यक फर्निचर इ.) रु. १.०० लाख भांडवली खर्च ग्राह्य धरण्यात येईल.

**पात्र लाभार्थी :-**

**वैयक्तिक लाभार्थी :-**

पॅक हाऊस उभारणीसाठी वैयक्तिक लाभार्थ्यासाठी असणारे देय अनुदान बँक कर्जाशी निगडीत असून, प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २.०० लाख अनुदान देय आहे. सदरील अनुदान बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात लाभार्थींच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येईल.

**इतर लाभार्थी :-**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील. अशा लाभाथीनांही प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २.०० लाख अनुदान देय आहे.

**२) एकात्मिक पॅक हाऊस कन्व्हेअर बेल्ट, संकलन व प्रतवारी केंद्र, वॉशिंग व ड्राईंग यार्ड आणि भारत्तोलन, इ. सुविधांसह** (Integrated pack house with facilities for conveyer belt, sorting, grading units, washing, drying and weighing)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. ५०.०० लाख
- बांधकाम क्षेत्र :- ९ मी X १८ मी.
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के
ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के

**उद्देश :-**

१. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती मालाची काढणी झाल्यानंतर / प्राथमीक प्रक्रिया केल्यानंतर त्यांचे अवश्यकतेनुसार प्रतवारी व पॅकींगकरुन पुढील कार्यवाही करणे.
२. मोठया प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या मालाची आवक वाढून भाव कोसळणे या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
३. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचा दर्जा कायम ठेवुन आयुष्य वाढविणे.
४. बाजारपेठेमध्ये ठराविक संख्येने सतत फलोत्पादित औषधी व सुगंधी वनस्पतींचा पुरवठा करणे.
५. ग्राहकाला आवडीप्रमाणे सातत्याने उत्कृष्ट दर्जाच्या मालांचा पुरवठा करणे.

६. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पतीचा टिकाऊपणा वाढविणे.

७. सेंद्रिय पध्दतीने उत्पादित केलेल्या शेतमालाचा ग्राहकास पुरवठा करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमता विचारात घेवुन ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. १७.५० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २५.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील. सदरील अनुदान बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात लाभार्थीच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येईल

**पात्र लाभार्थी :-**

- **वैयक्तीक लाभार्थी -**

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

- **इतर लाभार्थी -**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ,स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## ३. पुर्व शितकरण गृह (Pre-cooling Unit)

- अधिकत्तम ग्राहक प्रकल्प खर्च - रू. २५ लाख.
- प्रति युनिट कमाल प्रकल्प क्षमता - ६ मे.टन.
- देय अनुदान - ग्राहक भांडवली खर्चाच्या

१. सर्व साधारण क्षेत्र - ३५ टक्के.

२. डोंगराळ व आदीसूचित क्षेत्र - ५० टक्के.

**उद्देश :-**

१. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती मालाची काढणी झाल्यानंतर / प्राथमीक प्रक्रिया केल्यानंतर त्यातील उष्णता (Field Heat) कमी करणे आणि अवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करणे.

२. मोठया प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या मालाची आवक वाढून भाव कोसळणे या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

३. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचा दर्जा कायम ठेवुन आयुष्य वाढविणे.

४. बाजारपेठेमध्ये ठराविक संख्येने सतत फलोत्पादित औषधी व सुगंधी वनस्पतींचा पुरवठा करणे.

५. ग्राहकाला आवडीप्रमाणे सातत्याने उत्कृष्ट दर्जाच्या मालांचा पुरवठा करणे.

६. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पतीचा टिकाऊपणा वाढविणे.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमता विचारात घेवुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ८.७५ लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १२.५० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील. सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

- पात्र लाभार्थी :-
- वैयक्तीक लाभार्थी :-

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :-**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

### ४. शीतखोली (स्टेजिंग) Cold room (Staging)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. १५.०० लाख / प्रती युनिट
- प्रति युनिट कमाल प्रकल्प क्षमता :- ३० मे.टन
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के

**अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमता विचारात घेवुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ५.२५ लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. ७.५० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

**पात्र लाभार्थी :**

**वैयक्तीक लाभार्थी :**

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

### ५) फिरते पुर्व शितकरण गृह (Mobile Pre-cooling Unit)

- अधिकत्तम ग्राहक प्रकल्प खर्च - रू. २५ लाख
- देय अनुदान - ग्राहक भांडवली खर्चाच्या

१. सर्व साधारण खर्च ३५ टक्के.

२. डोंगराळ व आदीसूचित क्षेत्र - ५० टक्के.

**उद्देश :-**

१. फिरते पुर्व शितकरण गृह हे फिरते केंद्र असुन शेतकऱ्यांच्या शेतावर जावून फलोत्पादीत, औषधी व सुगंधी वनस्पती मालाचे पूर्व शितकरण करणे अपेक्षित आहे.

२. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती मालाची काढणी झाल्यानंतर / प्राथमीक प्रक्रिया झाल्यानंतर त्यातील उष्णता (Field Heat) कमी करणे आणि अवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करणे.

३. मोठया प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या मालाची आवक वाढून भाव कोसळणे या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

४. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचा दर्जा कायम ठेवुन आयुष्य वाढविणे.

५. बाजारपेठेमध्ये ठराविक संख्येने सतत फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचा पुरवठा करणे.

६. ग्राहकाला आवडीप्रमाणे सातत्याने उत्कृष्ट दर्जाच्या मालांचा पुरवठा करणे.

७. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचा टिकाऊपणा वाढविणे.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ८.७५ लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १२.५० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

**पात्र लाभार्थी :**

**वैयक्तीक लाभार्थी :**

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## ६) शितगृह (नवीन/विस्तारीकरण/अधुनिकीकरण)

(Cold storage units - construction / expansion / Modernization)

| अ.क्र. | घटक | मापदंड | कमाल मर्यादा | अनुदान सर्वसाधारण क्षेत्र | अनुदान डोंगराळ व आधिसूचित क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | नवीन शितगृह युनिट प्रकार- १ (एकसारख्या तापमानात १ राहणाऱ्या उत्पादनासाठी) (प्रती चेंबर २५० टन) | रु. ८००० प्रती मे. टन | ५००० मे. टन प्रती लाभार्थी | ३५ टक्के जास्तीत जास्त रु. १४०.०० लाख | अधिसूचित क्षेत्र ५० टक्के जास्तीत जास्त रु. २००.०० लाख |
| २. | शीतगृह युनिट प्रकार - २ (एकापेक्षा अधिक उत्पादने व तापमानासाठी) २ कमीत कमी ६ चेंबर्स पेक्षा जास्त (प्रती चेंबर २५० टन) | रु. १०,००० प्रती मे.टन | ५००० मे. टन प्रती लाभार्थी | ३५ टक्के जास्तीत जास्त रु. १७५.०० लाख | अधिसूचित क्षेत्र ५० टक्के जास्तीत जास्त रु. २५०.०० लाख |
| ३. | शीतगृह युनिट प्रकार - २ (नियंत्रित वातावरणासाठी ३ नविन तंत्रज्ञान राबविणे) | रु. १०,००० प्रती मे.टन | ५००० मे. टन प्रती लाभार्थी | ३५ टक्के जास्तीत जास्त रु. १७५.०० लाख | अधिसूचित क्षेत्र ५० टक्के जास्तीत जास्त रु. २५०.०० लाख |

### उद्देश :

१. मोठया प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या मालाची आवक वाढून भाव कोसळणे या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

२. फळे, फुले व भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती यासारख्या नाशवंत मालाचा दर्जा कायम ठेवुन आयुष्य वाढविणे.

३. प्रक्रिया प्रकल्प धारकांना वर्षभर कच्च्या मालाचा पुरवठा करणे.

४. ग्राहकाला आवडीप्रमाणे सातत्याने फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती मालाचा पुरवठा करणे.

### अर्थसहाय्याचे स्वरुप :

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. १४०.०० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २००.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

### पात्र लाभार्थी :

### वैयक्तीक लाभार्थी :

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

### इतर लाभार्थी :

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## ७) नविन तंत्रज्ञान राबविणे व शितसाखळी आधुनिकीकरण :

(Technology induction and modernisation of cold-chain)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. २५०.०० लाख
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्व साधारण क्षेत्र ३५ टक्के.

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के.

### समाविष्ठ बाबी :-

शितसाखळी आधुनिकीकरणामध्ये PLC उपकरणे, पॅकेजिंग लाईन्स, डॉक लेव्हलर्स, ॲडव्हान्सड ग्रेडसर, पर्यायी तंत्रज्ञान, स्टॅकिंग पध्दत, आधुनिकीकरण इन्सुलेशन आणि रेफ्रिजरेशन याबाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

### अर्थसहाय्याचे स्वरुप:-

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचारकरुन ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ८७.५० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १२५.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

### पात्र लाभार्थी :-

### वैयक्तीक लाभार्थी –

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

### इतर लाभार्थी –

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## ८) शितवाहन (Refrigerated Transport Vehicles)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. २६.०० लाख
- कमाल क्षमता :- ९ मे. टन (४ मे.टन क्षमतेपेक्षा कमी शितवाहनास अनुदान देय असणार नाही.)
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्व साधारण क्षेत्र ३५ टक्के.

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के.

### उद्देश :

१. वाहतुकीदरम्यान फळे, फुले, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती यासारख्या नाशवंत मालाचे दर्जा टिकवून ठेवून आयुष्य वाढविणे व होणारे नुकसान टाळणे.

२. किमान ४.०० मे.टन ते कमाल ९.०० मे.टन क्षमते पर्यन्तच्या शीतवाहनाकरिता अनुदान देय राहील.

३. वाहन खरेदी तसेच वाहनावर उपलब्ध करुन घ्यावयाच्या रेफ्रिजरेशन व इतर अनुषंगिक सुविधांसाठी अनुदान देय राहील.

### अर्थसहाय्याचे स्वरुप :

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ९.१० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १३.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

### पात्र लाभार्थी :

### वैयक्तीक लाभार्थी :

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

### इतर लाभार्थी :

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## ९) प्राथमिक / फिरते प्रक्रिया केंद्र (Primary / Mobile Minimal processing unit)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. २५.०० लाख
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्व साधारण क्षेत्र ४० टक्के

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५५ टक्के

प्राथमिक प्रक्रियेमध्ये काजु प्रक्रिया केंद्र, वाळवणे, पल्प काढणे, भूकटी करणे इ. तसेच बेदाणा तयार करणे नैसर्गिक रंग, सुंगधी तेल इ. सुका भाजीपाला व फळे, ताजे कापलेली फळे व भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती यांचे पॅकींग, पल्पींग व कॅनींग इत्यादी घटकांचा विचार होवू शकतो.

**उद्देश :**

१. फळे, फुले, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती सारख्या नाशवंत मालाचे आयुष्य व दर्जा वाढविणे.

२. मोठया प्रमाणावर उत्पादीत होणाऱ्या फलोत्पादन, औषधी व सुगंधी वनस्पती मालाची आवक वाढून भाव कोसळणे या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

३. कच्च्या मालावर प्रक्रिया करुन गुणात्मक वाढ / मुल्यवर्धन करण्यासाठी चालना देणे.

४. फलोत्पादन, औषधी व सुगंधी वनस्पतीवर आधारित स्वयंरोजगार निर्मितीस चालना दणे.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के किंवा कमाल रु. १०.०० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५५ टक्के किंवा कमाल रु. १३.७५ लाखापर्यंत अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

**पात्र लाभार्थी :**

**वैयक्तीक लाभार्थी :**

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## १०) रायपनिंग चेंबर (Ripening chamber)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. १.०० लाख प्रती मे. टन
- प्रति युनिट कमाल प्रकल्प क्षमता :- ३०० मे. टन
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्व साधारण क्षेत्र ३५ टक्के

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के

**उद्देश :**

१. इथिलिन सारख्या नैसर्गिक संप्रेरकाचा (Natural Harmone) उपयोग करुन केळी, आंबा, पपई, इ.फळ पिकांना गरजेनुसार पिकविता येतो.

२. फळांतील रस, गर, साल इ. एकसंघ पिकत असल्यामुळे फळांचा टिकाऊपणा वाढतो.

३. फळांच्या वजनामध्ये कमीत कमी घट आणि फळांची गोडी , चव व आकर्षकपणा वाढतो.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. १०५.०० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित

क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १५०.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

**पात्र लाभार्थी :**

**वैयक्तीक लाभार्थी :**

वैयक्तीक लाभार्थ्यांसाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## ११) शेतावरील कमी उर्जा वापरणारे थंड साठवणुक गृह - ८ मे.टन (Evaporative / low energy cool chamber -8 M.T.)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. ५.०० लाख
- प्रति युनिट कमाल प्रकल्प क्षमता :- ८ मे. टन
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या ५० टक्के

**उद्देश :**

१. भारतासारख्या देशात शितगृहात फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती माल ठेवण्याची व्यवस्था शेतावरच नसल्यामुळे, मोठया प्रमाणावर उत्पादनाचे नुकसान होते. देशातील / राज्यातील ग्रामीण भागामध्ये विद्युत (इलेक्ट्रीसीटी) ची मोठया प्रमाणावर असलेली कमतरता व अनियमीतता आणि शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थीती लक्षात घेता, कमी खर्चाची-कमी उर्जा लागणारी शितगृह ''इव्हॅपोरेटीव्ह कुलींग'' तत्वावर उभी करणे.

२. यामध्ये चारही बाजुने दोन समांतर भिंतीचे बांधकाम केले जाते, दोन भिंतीमधिल गॅप वाळुने भरला जातो. सदरील भिंती ओव्हरहेड पाण्याच्या टाकीच्या सहाय्याने ओल्या ठेवल्या जातात.

३. चेंबरची जमीनी कडील बाजु लाकडी फळयांनी आवश्यकते नुसार तयार करतात, त्यामध्ये सोईनुसार अंतर (गॅप) ठेवले जाते. चेंबरमधील हवा बाहेर काढण्यासाठी एक्झॉस्ट फॅनचा वापर केला जातो.

४. अशा प्रकारच्या चेंबरमध्ये तापमान कमी राहुन आर्द्रता संतुलीत करता येवू शकते यामुळे फलोत्पादीत, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचे आयुष्यमान वाढते.

५. या प्रकारच्या चेंबरमध्ये संत्रा, मोसंबी, लिंबु, केळी, बटाटा, टोमॅटो इ.ची साठवणुक होवू शकते. अशा प्रकारच्या चेंबरचा वापर पूर्व शितकरण गृह म्हणुन होवू शकतो.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २.५० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

**पात्र लाभार्थी :**

**वैयक्तीक लाभार्थी :**

वैयक्तीक लाभार्थ्यांसाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून **(Credit Linked Back Ended Subsidy)** बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृतकंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## १२) कमी किमतीचे फळ-भाजीपाला साठवण केंद्र (Preservation unit - low cost)

• अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :-

अ) रु. २.०० लाख - नविन युनिट

ब) रु. १.०० लाख - जुन्या युनिटचे नुतनिकरण करण्यासाठी

• देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या ५० टक्के

**उद्देश :**

काही फळे-भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती आहे त्या स्वरुपात विक्री केल्यास पाहिजे तेवढा फायदा शेतकऱ्यांना होत नाही, तसेच ज्यावेळी मालाची आवक जास्त होते त्यावेळी भाव ढासळले जातात. अशा परिस्थितीमध्ये कमी खर्चात मालाची जतवनुक करणे (Preservation) हा या घटकयोजनेचा मुख्य उद्देश.

**उदाहरणार्थ :**

१. कडक उन्हाचा उपयोग करुन फळांचा रस, गर वाळविणे आणि नंतर बाटलीमध्ये उकळुन किंवा योग्य ती रसायने वापरुन भरुन ठेवणे.

२. विविध प्रकारचे लोणचे, चटणी इ. तयार करणे.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

**पात्र लाभार्थी :**

**वैयक्तीक लाभार्थी :**

वैयक्तीक लाभार्थ्यांसाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृतकंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

## १३) कमी खर्चाचे कांदा साठवणुक गृह / कांदा चाळ - २५ मे. टन (Low cost onion storage structure - 25M.T.)

• अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. १.७५ लाख / प्रती युनिट

• प्रति युनिट कमाल प्रकल्प क्षमता :- २५ मे. टन

• देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या ५० टक्के

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

कांदा चाळी बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. ३५००/- प्रति मे.टन याप्रमाणे २५ मे.टन क्षमतेपर्यंतच्या चाळीसाठी जास्तीत जास्त रु. ०.८७५ लाख अर्थसहाय्य देण्यात येईल. हे अर्थ सहाय्य बँक कर्जाशी निगडीत आहे.

**पात्र लाभार्थी :**

**वैयक्तीक लाभार्थी :**

वैयक्तीक लाभार्थ्यांसाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

**इतर लाभार्थी :**

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृतकंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

### १४) पुसा शुन्य उर्जा आधारीत शितगृह - १०० किलो. (Puse zero energy cool chamber -100 kg.)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. ४०००/ युनिट
- प्रति युनिट कमाल प्रकल्प क्षमता :- १०० किलो
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या ५० टक्के

भारतासारख्या देशात शेतावरच थंड ठिकाणी फलोत्पादित माल ठेवण्याची व्यवस्था नसल्यामुळे, मोठया प्रमाणावर उत्पन्नाचे नुकसान होते. देशातील / राज्यातील ग्रामीण भागामध्ये विद्युत (इलेक्ट्रीसीटी) ची मोठया प्रमाणावर असलेली कमतरता आणि शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थीती लक्षात घेता, कमी खर्चाची-कमी उर्जेची थंड साठवणुक गृह उभी करणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

#### अर्थसहाय्याचे स्वरुप :

पुसा शुन्य उर्जा आधारीत थंड साठवणुक (गृह - १०० किलो) बांधण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. २०००/- अर्थसहाय्य देण्यात येईल. काम पूर्ण होवून प्रकल्प कार्यान्वीत झाल्याची खात्री झाल्यावर अनुदान अदा करण्यात येईल.

#### पात्र लाभार्थी :

वैयक्तीक लाभार्थी, राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या इत्यादी.

### १५) एकात्मिक शीतसाखळी कार्यपध्दती (Integrated Cold Chain supply System)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. ६००.०० लाख
- प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी वरील घटक क्र. १ ते १४ मधील किमान दोन घटकांचा
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या समावेश असणे आवश्यक आहे.

#### अर्थसहाय्याचे स्वरुप :

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. २१०.०० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. ३००.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

#### पात्र लाभार्थी :

#### वैयक्तीक लाभार्थी :

वैयक्तीक लाभार्थ्यासाठी सदर अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

#### इतर लाभार्थी :

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील ३ वर्षाचे पुरावे सादर करावे लागतील.

# फलोत्पादन पिकांसाठी पणन सुविधा

## १) टर्मीनल मार्केट (Terminal Markets)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च - रु. १५०.०० कोटी (सार्वजनिक व खाजगी भागीदारीत- PPP)
- देय अनुदान - ग्राहय भांडवली खर्चाच्या २५ ते ४० टक्के जास्तीत जास्त रु. ५०.०० कोटी

### उद्देश :

फळे व भाजीपाला तसेच इतर फलोत्पादीत पिकांच्या उत्पादन वाढीची प्रेरणा कायम ठेवण्यासाठी आवश्यक मुलभुत बाजार विषयक सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने फलोत्पादीत उत्पादनांच्या विपणन व्यवस्थेचा विकास करण्यासाठी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातून (PPP) गुंतवणुकीस चालना देणे अपेक्षित आहे. यासाठी सध्या अस्तीत्वात असलेल्या पणन व्यवस्थेमधील त्रुटी कमी करुन फळे व भाजीपाला विक्रीसाठी टर्मिनल मार्केट मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर येथे स्थापन करणे प्रस्तावित आहे. अशा प्रकारच्या बाजारपेठामार्फत प्रतवारी, गुणवत्ता प्रमाणिकरण यांना चालना देवून शेतकऱ्यांना आपल्या फलोत्पादीत उत्पादनासाठी किफायतशीर दर मिळवुन देणे तसेच उत्पादक, ग्राहक, उद्योजक, पणन साखळीत समाविष्ट होणारे इतर मध्यस्त यांना कृषि पणन अनुषंगीक आवश्यक उपाययोजना व पद्धती बाबत जागृती निर्माण करणे अपेक्षित आहे.

### सदर घटकांतर्गत खालील प्रमाणे पणन सुविधांचा विकास करणे अपेक्षित आहे.

१. फलोत्पादीत मालाचे संकलन, वाळविणे, निवड, प्रतवारी, प्रमाणीकरण, विविध गुणवत्ता प्रमाणीकरण (एस.पी.एस., हासप इ.) लेबलिंग, पॅकींग, रायपनिंग चेंबर्स, शितगृह, किरकोळ / घाऊ क विक्री सुविधा.
२. गाळे, दुकाने, चढाई-उतराई, संकलन/लिलाव यासाठी ओटे, प्राथमीक प्रक्रिया सुविधा इ.
३. उत्पादकांकडून ग्राहक / प्रक्रिया प्रकल्पधारक / घाऊ क व्यापारी यांना थेट विक्री
४. सुधारीत ए. पी. एम. सी. ऍक्टचे धर्तीवर बाजारपेठेची स्थापना.
५. पर्यायी विक्री व्यवस्थांचा विकास.
६. शेतकऱ्यांना राहण्याची, बँकिंगची, पोस्ट ऑफिसेस, इंटरनेट, दुरध्वनी इ.ची पुरविणे
७. सांडपाणी व कचरा व्यवस्थापन.

### अर्थसहाय्याचे स्वरुप :

टर्मीनल मार्केट बांधण्यासाठी येणा-या खर्चाच्या २५ ते ४० टक्के जास्तीत जास्त रु. ५०.०० कोटी अर्थसहाय्य देण्यात येईल. हे अर्थसहाय्य बँक कर्जाशी निगडीत आहे.

## २) होलसेल मार्केट (Wholesale Markets)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च रु. १००.०० कोटी
- देय अनुदान - ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्वसाधारण क्षेत्र - २५ टक्के
ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ३३.३३ टक्के

### उद्देश :

फळे व भाजीपाला तसेच इतर फलोत्पादीत पिकांच्या उत्पादन वाढीचा वेग कायम ठेवण्यासाठी आवश्यक मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने फलोत्पादीत उत्पादनांच्या विपणन व्यवस्थेचा विकास करण्यासाठी खाजगी क्षेत्रातुन गुंतवणुकीस चालना देणे अपेक्षित आहे. यासाठी सध्या अस्तीत्वात असलेल्या पणन व्यवस्थेमधील त्रुटी कमी करुन फळे व भाजीपाला मार्केट स्थापन करणे प्रस्तावित आहे. अशा प्रकारच्या बाजारपेठामार्फत प्रतवारी, गुणवत्ता प्रमाणिकरण यांना चालना देवून शेतकऱ्यांना आपल्या फलोत्पादीत उत्पादनासाठी रास्त किंमत मिळवुन देणे तसेच उत्पादक, ग्राहक, उद्योजक, पणन साखळीत समाविष्ट होणारे इतर मध्यस्त यांना कृषि पणन अनुषंगीक आवश्यक उपाययोजना व पद्धती बाबत जागृती निर्माण करणे अपेक्षित आहे.

**सदर घटकांतर्गत खालील प्रमाणे पणन सुविधांचा विकास करणे अपेक्षित आहे.**

१. फलोत्पादीत मालाचे संकलन, वाळविणे, निवड, प्रतवारी, प्रमाणिकरण, विविध गुणवत्ता प्रमाणिकरण लेबलिंग, पॅकींग, रायपनिंग चेंबर्स, शितगृह, किरकोळ / घाऊक विक्री सुविधा.

२. गाळे, दुकाने, चढाई-उतराई, संकलन/लिलाव यासाठी ओटे, प्राथमीक प्रक्रिया सुविधा इ.

३. उत्पादकांकडून ग्राहक / प्रक्रीया प्रकल्पधारक / घाऊ क व्यापारी यांना थेट विक्री.

४. सुधारीत ए.पी.एम.सी. ॲक्टच्या धर्तीवर बाजारपेठेची स्थापना.

५. पर्यायी विक्री व्यवस्थांचा विकास.

६. शेतकऱ्यांना राहण्याची, बँकिंगची, पोस्ट ऑफिसेस, इंटरनेट, दुरध्वनी इ.सेवा पुरवीणे.

७. सांडपाणी व कचरा व्यवस्थापन.

### अर्थसहाय्याचे स्वरुप :

सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा कमाल रु. २५.०० कोटी आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३३.३३ टक्के किंवा कमाल रु. ३३.३३ कोटी अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील. सदरील अर्थसहाय्य बँक कर्जाशी निगडीत आहे.

## ३) अपनी मंडी / ग्रामीण बाजार (Rural Markets / Apni Mandies / Direct Markets)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च - रु. २५.०० लाख
- देय अनुदान - ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्वसाधारण क्षेत्र - ४० टक्के

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५५ टक्के

### उद्देश :

राज्यात कृषि क्षेत्रात झालेल्या कामगिरीमुळे विविध फळपिके भाजीपाला यांच्या उत्पादनात व उत्पादकतेत लक्षणीय वाढ झाली आहे. फलोत्पादीत उत्पादने ही नाशवंत स्वरुपाची असुन त्यांची तात्काळ विक्री होणे आवश्यक असते. मध्यस्थांचे वर्चस्व कमी करुन शेतकऱ्यांना जादा पैसे मिळवुन देण्यासाठी तसेच ग्राहकासही वाजवी किंमतीत शेतीमाल उपलब्ध करुन देण्यासाठी शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत पणन सुविधा उभारणीसाठी अर्थसहाय्याची योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत ग्रामस्तरापासून जिल्हा स्तरापर्यंत ग्रामीण बाजार/अपनी मंडी/थेट बाजारासाठी, विक्रीसाठी ओटे, शेड व गाळे बांधणे, शितगृहाद्वारे किंवा इतर योग्य पध्दतीची साठवण क्षमता निर्माण करणे, मालाची प्रतवारी, पॅकिंग, मोजमाप, लिलाव केंद्र, सांडपाणी व्यवस्था, टाकावू मालाचा निचरा /चक्रिकरण सुविधा, पिण्याचे पाणी, इत्यादी सुविधा स्थापन करणेसाठी अर्थसहय्य देय राहील.

### अर्थसहाय्याचे स्वरूप :

ग्रामीण बाजार/अपनी मंडी/थेट बाजारासाठी येणाऱ्या खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० टक्के किंवा कमाल रु. १०.०० लाख तर डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ५५ टक्के किंवा कमाल रु. १३.७५ लाख इतके अनुदान देय राहील. सदरील अर्थसहाय्य बँक कर्जाशी निगडीत आहे.

### पात्र लाभार्थी :

या बाबीचा लाभ शेतकरी सहकारी संस्था /स्थानिक स्वराज्य संस्था जसे ग्रामपंचायत, सहकारी समिती व नगरपालिका वगैरे यांचेमार्फत चालविले जाणारे ग्रामीण/ आठवडी बाजार / विविध पीक उत्पादक संघ यांना देय राहील. राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वतः उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्टया सक्षम असलेबाबतचे पुरावे सादर करावेत.

## ४) वातावरण नियंत्रीत रिटेल बाजार / विक्री दालन (Environmentally Controlled Retail Markets / Outlets)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च - रु. १५.०० लाख / प्रती युनिट
- देय अनुदान ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के

### उद्देश :

देशात वाढणारे शहरीकरण, शहारांमधील व्यक्तींचे वाढते उत्पन्न, जीवनशैली इ. मुळे देशात रिटेल मार्केटची वाढ होत आहे. अशा प्रकारच्या रिटेल मार्केट मधुन फलोत्पादीत उत्पन्नांची सुविधा असलेली दालने सुरु करण्याच्या दृष्टिकोनातून तसेच स्वतंत्ररित्याही अशी दालने सुरु करण्याच्या दृष्टिकोनातून सदरील योजना राबविणे प्रस्तावित आहे. सदर योजनेअंतर्गत अनुदानासाठी भांडवलीखर्च ग्राहय धरला जाईल उदा. बांधकाम, शितसाखळी सुविधा, इलेक्टॉनिक वजन काटे, प्लॅस्टीक क्रेट्स, तापमान नियंत्रण यंत्रणेसह रॅक्स इ.

### अर्थसहाय्याचे स्वरूप :

वातावरण नियंत्रित रिटेल बाजार / विक्री दालन उभारणी करण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी ३५ टक्के किंवा कमाल रु. ५.२५ लाख तर डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ५० टक्के किंवा कमाल रु. ७.५० लाख इतके अनुदान देय राहील. सदरील अर्थसहाय्य बँक कर्जाशी निगडीत आहे.

### पात्र लाभार्थी :

वैयक्तीक लाभार्थी, शेतकरी समुह, शेतकरी संघ, राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट इत्यादी सदरील घटक योजना बँक कर्जाशी निगडीत आहे परंतु अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च लाभार्थी संस्था स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थीकदृष्ट्या सक्षम असल्याचे पुरावे सादर करावेत.

## ५) स्थाई / फिरते / विक्री केंद्र - शित चेंबरच्या सुविधेसह (Static / Mobile Vending Cart / Platform with Cool Chamber)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च - रु. ३००००/-
- देय अनुदान - ग्राहय भांडवली खर्चाच्या ५० टक्के

ग्राहकांच्या सुविधेसाठी लोकवस्तीमध्ये / लोकवस्ती जवळ कमी खर्चाचे स्थाई / फिरते भाजीपाला विक्री हातगाडी / केंद्र स्थापन करुन योग्य दरामध्ये आणि आवश्यक त्या वेळेस ग्राहकांना फळे व भाजीपाला पुरविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेमध्ये कुलचेंबरच्या सुविधेसह हातगाडी, विक्री कट्टा, वजनकाटे, इ. भांडवली खर्च अनुदानासाठी ग्राहय धरला जाईल.

### अर्थसहाय्याचे स्वरूप :

कुल चेंबरच्या सुविधेसह स्थाई / फिरते / विक्री केंद्र येणा-या खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १५०००/- इतके अनुदान देय राहील. काम पूर्ण होवून प्रकल्प कार्यान्वीत झाल्याची खात्री झाल्यावर अनुदान अदा करण्यात येईल.

### पात्र लाभार्थी :

वैयक्तीक लाभार्थी, स्वयंसहाय्य महिला / पुरुष बचत गट, उत्पादकांच्या सहकारी संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृतकंपन्या इत्यादी.

# पायाभूत सुविधा

## १) फलोत्पादीत मालाचे संकलन, प्रतवारी व पॅकिंग केंद्राची उभारणी (Functional Infrasturcture for Collection, Sorting / Grading, Packing units etc)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च - रु. १५.०० लाख
- देय अनुदान - ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्वसाधारण क्षेत्र - ४० टक्के

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५५ टक्के

विविध प्रकारची फळे, भाजीपाला व इतर फलोत्पादीत उत्पादने हंगामी व नाशवंत स्वरुपाची आहेत. हंगामात शेतकऱ्याला वैयक्तीकरित्या या मालाची बाजारातील मागणीनुसार प्रतवारी, मुल्यवर्धन /पॅकीग करुन बाजारात पाठविणे शक्य होत नाही तसेच आर्थिकदृष्टयाही किफायतशीर ठरत नाही. यामुळे शेतक-यास आपल्या मालाचा उचित मोबदला मिळत नाही. शेतक-यांनी उत्पादीत केलेल्या मालाचे एकत्रित संकलन व मुल्यवर्धन करुन थेट प्रक्रिया उद्योजक/ निर्यातदार / टर्मिनल मार्केट / केंद्रीय लिलाव केंद्र या बाजार पेठेत एकत्रितपणे उपलब्ध करुन दिल्यास शेतकऱ्याला आपल्या मालाचा रास्त मोबदला मिळणे शक्य आहे. या अनुषंगाने ग्रामीण भागात अशा संकलन, प्रतवारी व पॅकींग केंद्राची उभारणी करणेसाठी अर्थसहाय्याची योजना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राबविण्यात येत आहे.

अशा प्रकारच्या संकलन, प्रतवारी व पॅकींग केंद्रामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेच्या मागणीनुसार उत्पादन आराखडा तयार करण्यास प्रवृत्त करणे व त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान प्रशिक्षण / विस्तारसेवा फलोत्पादीत शेतकऱ्याकडे पोहचविणेही अपेक्षित आहे. सदर निर्माण होणाऱ्या सुविधेचा वापर योग्य प्रकारे होण्यासाठी समूह पध्दतीने फलोत्पादन पिकांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचा गट तयार करुन त्यांच्या मालाचे संकलन व प्रतवारी करण्यात यावी.

### अर्थसहाय्याचे स्वरुप :

ग्रामीण भागात फलोत्पादन पिकाच्या प्रमुख उत्पादन क्षेत्राजवळ अशा संकलन, प्रतवारी व पॅकींग केंद्राची उभारणी करणे आवश्यक आहे. या अंतर्गत उत्पादीत मालाचे संकलन, प्रतवारी, हाताळणी, पॅकींग, साठवणुक सुविधा, गुणवत्ता प्रमाणीकरण सुविधा, वाहतुक, घाऊक व थेट विक्री सुविधासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० टक्के किवा कमाल रुपये ६.०० लाख अर्थसहाय्य देय राहील. डोंगराळ व आदिवासी क्षेत्रामध्ये अनुदानाची मर्यादा ५५ टक्के कमाल रु. ८.२५ लाखपर्यंत देय राहील.

### पात्र लाभार्थी :

### वैयक्तीक लाभार्थी :

वैयक्तीक उद्योगजकांसाठी हा घटक बँक कर्जाशी निगडीत असुन बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

### इतर लाभार्थी :

राज्य सहकारी संस्था, सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, स्वयंसहाय्यता गट - ज्यामध्ये किमान २५ सदस्य असतील, शेतकरी महिला गट तसेच सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृतकंपन्या या संस्था / कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांनी आर्थीकदृष्टया सक्षम असल्याचे पुरावे सादर करावेत.

## २) गुणवत्ता नियंत्रण / पृथ:करण लॅब (Quality Control / Analysis Lab)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च - रु. २००.०० लाख
- देय अनुदान - ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सार्वजनिक क्षेत्र : १०० टक्के

ब) खाजगी क्षेत्र : ५० टक्के

देशामधील नागरीकांचे वाढते उत्पन्न आणि शिक्षण सुविधामुळे खाद्यपदार्थाच्या पौष्टीकतेबाबत, गुणवत्तेबाबत जागरुकता वाढलेली आहे. वाढते जागतीकीकरण, दळणवळण इ. मुळे फलोत्पादीत माल देशांतर्गत व देशाबाहेरही विक्री केला जावु

लागला आहे. फलोत्पादीत मालाची देशाबाहेर विक्री करतांना विविध गुणवत्ता तपासण्या कराव्या लागतात जसे हॅसप, FSA साठी गुणवत्ता चाचण्या GAP, Phyto Sanitary Certificate, Residue Testing, Metal detection, Pest disease detection इ. च्या चाचण्या होणे आवश्यक आहे. यासाठी Quality Contral Lab प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी बांधकाम व मशिनरी या बाबी अनुदानासाठी ग्राहय धरण्यात येतील. लॅबसाठी अनुभवी व शिक्षीत कर्मचारी वृंद संस्थेकडे असणे बंधनकारक असुन लॅबने आवश्यक असणारे राज्य, केंद्र व जागतीक स्तरावरील परवाने गरजेनुसार प्राप्त करणे अत्यावश्यक व बंधनकारक आहे. अपेडा, NBL सारख्या मान्यताप्राप्त शासकीय यंत्रणेकडून मानांकन (Acreditation) करुन घ्यावे लागेल तसेच लॅबची सुविधा शेतकऱ्यांना माफक दरात पुरविणेबाबत लॅब धारकांनी मंडळाशी / शासनाशी करार करावा लागेल. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार ISO Certification जसे ISO 17025 करुन घ्यावे लागेल.

### अर्थसहाय्याचे स्वरुप :

सार्वजनिक क्षेत्रासाठी ही योजना १०० टक्के अनुदान किंवा कमाल रु. २००.०० लाख तर खाजगी क्षेत्रासाठी ५० टक्के किंवा कमाल रु. १००.०० लाख अनुदान देय आहे.

### पात्र लाभार्थी :

### वैयक्तिक लाभार्थी :

वैयक्तिक उद्योगजकांसाठी हा घटक बँक कर्जाशी निगडीत असुन बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

### इतर लाभार्थी :

सहकारी, नोंदणीकृत संस्था, विश्वस्त संस्था, फलोत्पादन संघ, सार्वजनिक क्षेत्रातील नोंदणीकृत कंपन्या खाजगी कंपन्यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वत: उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांनी आर्थीकदृष्टया सक्षम असल्याबाबत पुरावे सादर करावे लागतील.

### संपर्क :

मा. व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य फलोत्पादन औषधी व वनस्पती मंडळ,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५
फोन क्रं. ०२०-२५५३४८६०
email - info@mahanhm.in

# राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT)
# हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर (HTC) तळेगांव दाभाडे, जि. पुणे.



## ऊती संवर्धन प्रशिक्षण

### प्रशिक्षणामधील अंतर्भुत घटक

- ऊती संवर्धन प्रयोगशाळा ओळख
- मिडीया तयार करणे
- मायक्रो प्रपोगेशन
- विपणन व प्रकल्प
- उपकरणे वापरण्याची पद्धत व कार्य
- प्रयोगशाळा स्वच्छता व काळजी
- प्रायमरी व सेकंडरी हार्डनिंग रोपांचे नियोजन

सदरचे प्रशिक्षण हे पाच दिवसाचे असून त्यामध्ये जेवण, राहण्याची व्यवस्था व अभ्यासक्रम साहित्य इ. सोयी पुरविण्यात येत असून त्यासाठी रु. ७५०० / – प्रति प्रशिक्षणार्थी शुल्क आकारण्यात येते.



## ऊती संवर्धन प्रयोगशाळा प्रकल्प

(M. Sc, B.Sc. Biotech Student)

**कालावधी १ ते २ महिने**

टिश्युकल्चर (G9) केळीची व ऊसाची एक डोळा पद्धतीने बनविलेली कोईम्बतुर ८६०३२ व २६५ वाणाची उत्कृष्ठ रोपे वर्षभर उपल्बध आहेत.



अधिक माहितीसाठी लॉगऑन करा
(www.nipht.org)


**राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे**

सी. आर. पी. एफ. कॅम्प शेजारी तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे, पीन : ४१० ५०६

फोन : (०२११४) २२३९८०, २२६०८७

मो.नं. ७५८८५९२१२९,९४२२०३०७७५, E-mail : htc_td@yahoo.co.in



# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

प्लॉट नं. आर-७, मार्केट यार्ड, गुलटेकडी,
पुणे - ४११ ०३७.
दूरध्वनी - (०२०) २४५२८१००, २४५२८२००
Web. : www.msamb.com

पणन टोल फ्री क्रमांक : 1800 233 0244

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे